• पुणे, रविवार, १३ एप्रिल २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 135 • वर्ष ४ थे, अंक १३५ • किंमत ₹ ६ • पाने : १२

राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News

रायगड प्रेरणास्थळ बनवणार

गृहमंत्री अमित शाह यांची घोषणा

• शिंदेशाही पगडी, कवड्यांची माळ, सन्मानचिन्ह आणि पुस्तके देऊन अमित शाहांचा सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

रायगड : शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक झाला ती हीच जागा आहे. शिवाजी महाराज यांचा जन्म झाला ती ही जागा आहे. शिवाजी महाराजांनी शेवटचा श्वास घेतला ती ही जागा आहे. बालशिवाजीपासून ते छत्रपतीपर्यंतचा इतिहास या पवित्र भूमीत आहे. रायगड पर्यटन नव्हे तर प्रेरणास्थळ बनवण्यासाठी आमचे सरकार कटीबद्ध आहे. सातवीपासून ते बारावीपर्यंतचे विद्यार्थी या ठिकाणी आले पाहिजे. त्यांनी महाराजांच्या कार्यापासून प्रेरणा घेतली पाहिजे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी सांगितले. किल्ले रायगडावर शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथिनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

उदयनराजे भोसले यांनी यावेळी चार-पाच प्रमुख मागण्या केल्या. शिवाजी महाराज, मां जिजाऊ आणि छत्रपती संभाजी महाराजांबाबत कायदा करा, त्यांच्या अवमान करणाऱ्याला दहा वर्षे जामीन मिळाला नाही पाहिजे अशा कायदा करा, तसेच छत्रपती शिवाजी महाराज तसेच अनेक युगपुरुषांचा शासन मान्य इतिहास प्रकाशित करण्यात यावा जेणेकरुन समाजा-समाजामध्ये तेढ निर्माण होणार नाही.

पुढे बोलताना उदनराजे म्हणाले की, सिनेमॅटिक लिबर्टीबाबत सेन्सॉर

» पान ७ वर

> स्वत:ला अलमगीर म्हणणारा व्यक्ती महाराष्ट्रात पराजित झाला. त्याची समाधी महाराष्ट्रात आहे. शिवचरित्र प्रत्येक भारतीयांना शिकवले गेले पाहिजे. प्रत्येक मुलाला शिकवले पाहिजे. शिवाजी महाराजांना महाराष्ट्रापर्यंत मर्यादित ठेवू नका. हात जोडून विनंती करतो. देश आणि जग त्यांच्याकडून प्रेरणा घेत आहे.
>
> — अमित शाह

महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांची खैर नाही : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

आमच्या उदयन महाराज यांनी सरकारकडे काही मागण्या केल्या आहेत. त्या संदर्भात योग्य ती कारवाई करायची आहे. सरकार ती करेलच. पण छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारख्या महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांना खरेतर टकमक टोकावरून लोटले पाहिजे. पण आपल्याकडे लोकशाही आहे. त्यामुळे या प्रकरणी निश्चित असे काही नियम तयार केले जाणार आहेत. शिवाजी महाराजांचा प्रमाण इतिहास राज्य सरकारकडून तयार केला जाईल. हे काम सरकार आपल्या हातात घेईल. अरबी समुद्रातील स्मारक सुप्रीम कोर्टात अडकले होते. पण आता ते सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाकडे पाठवले होते. आम्ही शिवरायांचे मावळे आहोत. हार मानणार नाही. सरकार हा खटला हायकोर्टात लढून ते स्मारक मोकळे करून घेईल. कोणत्याही परिस्थितीत शिवरायांचे स्मारक झाले पाहिजे हा प्रयत्न आपला असेल.

राष्ट्रपतींनाही वेळ पाळावीच लागणार!

सर्वोच्च न्यायालयाने कान टोचले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : तामिळनाडू सरकार विरुद्ध तामिळनाडूचे राज्यपाल प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निर्णय दिला. या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने राज्यपाल आणि राष्ट्रपतींनी राज्यांच्या विधानसभांनी मंजूर केलेल्या विधेयकावर ठराविक कालावधीत निर्णय घेणे बंधनकारक असल्याचे म्हटले आहे. पहिल्यांदाच सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतींना ठराविक कालावधीत निर्णय घेणे बंधनकारक करण्याचा निर्णय दिला. सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केले की, संविधानात कोणत्याही प्रकारे अमर्यादित नकाराधिकाराचा अधिकार दिलेला नाही.

जर राष्ट्रपती आणि राज्यपाल जाणीवपूर्व विधेयकांवर निर्णय घेत नसतील तर त्यांच्या निष्क्रियतेची न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी करता येऊ शकते. न्यायमूर्ती जेबी पारडीवाला आणि न्यायमूर्ती महादेवन यांच्या पीठासमोर या प्रकरणी सुनावणी झाली. न्यायालयाने म्हटले की, जर एखादं विधेयक राज्यपालांकडून राष्ट्रपतींकडे कलम २०१ अन्वये पाठवण्यात आलं तर राष्ट्रपतींनी त्यावर ३ महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा. जर याला उशीर झाला तर राष्ट्रपतींनी त्याचं कारण सांगणे आणि राज्य सरकारला सूचना देणे बंधनकारक असेल.

तसेच कलम २०० अंतर्गत राज्यपालांनाही कोणतेही विधेयक अनिश्चित कालावधीसाठी विचाराधीन ठेवता येणार नाही. राज्यपालांचे कर्तव्य आहे की विधेयकांवर त्यांनी वेळेत निर्णय घ्यावा आणि कामकाजात अडथळा आणू नये असेही सर्वोच्च न्यायालयाने बजावले.

जम्मू-काश्मीरमध्ये मोठी चकमक; ३ दहशतवादी ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

जम्मू-काश्मीर : अखनूरमध्ये दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत ९ पंजाब रेजिमेंटचे जेसीओ कुलदीप चंद शहीद झाले. शुक्रवारी रात्री उशिरा अखनूरच्या केरी बट्टल भागात ही चकमक झाली. सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला. त्याचवेळी किश्तवाड जिल्ह्यातील जंगलात झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी ३ दहशतवाद्यांचा खात्मा केला. रात्रीपासून ऑपरेशन सुरू होते. अधिकाऱ्यांनी सांगितले की, मारले गेलेले तिन्ही दहशतवादी जैश-ए-मोहम्मदचे होते. त्यात टॉप कमांडर सैफुल्लाहचाही समावेश आहे. सीमेपलीकडून पाकिस्तानी रेंजर्सनी शस्त्रसंधीचे उल्लंघन केले. दहशतवाद्यांनी घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला. ज्याला भारतीय सैन्याने चोख प्रत्युत्तर दिले. संशयास्पद हालचाली लक्षात

» पान ७ वर

मुंबईप्रमाणे इतर शहरांवरही राणाचा हल्ल्याचा कट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : मुंबईतील '26/11'सारखे हल्ले देशाच्या इतर शहरांतही घडवून आणण्यासाठी दहशतवादी तहव्वूर राणाने कट रचल्याचा संशय आहे, असा युक्तिवाद राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) शुक्रवारी न्यायालयात केला. दहशतवादी राणाला गुरुवारी भारतात आणल्यानंतर रात्री उशिरा दिल्लीतील पतियाळा न्यायालयात हजर करण्यात आले. एनआयएने राणाची 20 दिवस कोठडी मागितली. न्यायाधीश चंद्रजित सिंग यांनी राणाला 18 दिवसांसाठी एनआयएच्या कोठडीत पाठवण्याचा निर्णय मध्यरात्रीनंतर उशिरा दिला.

आता एनआयए राणाची कसून चौकशी करणार आहे. त्याला मुंबईतही आणले जाणार आहे. राष्ट्रीय तपास संस्थेने गुरुवारी सायंकाळी अधिकृतपणे राणाला अटक केली. त्याला अमेरिका येथून यशस्वीपणे प्रत्यार्पित करून भारतात आणण्यात आले होते. यानंतर दिल्लीतील एका विशेष न्यायालयाने त्याला १८ दिवसांच्या एनआयए कोठडीत पाठवले आहे.

२३० हून अधिक फोन कॉल

• भारतामध्ये वास्तव्यात असताना हेडलीने इमिग्रेशन व्यवसायाच्या आडवाटा वापरल्या आणि तो राणाशी सातत्याने संपर्कात राहिला. या काळात राणा आणि हेडली यांच्यात 230 हून अधिक फोन कॉल झाले होते, असेही अधिकाऱ्याने सांगितले.

'वृक्षपुरुष' हरपला; पद्मश्री दरीपल्ली रामैया यांचे निधन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

तेलंगणा : तेलंगणा राज्यात एक कोटी झाडे लावणारे 'वृक्षपुरुष' पद्मश्री दरीपल्ली रामैया यांचे शनिवारी निधन झाले. वयाच्या ८७ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. तेलंगणातील खम्मम जिल्ह्यातील रेड्डीपल्ली या मुळगावी हृदयविकाराने त्यांचे निधन झाले. रामैया यांना खम्मम जिल्ह्यात ग्रीन वॉरियर, चेट्टू (वृक्ष) रामय्या, वनजीवी म्हणून ओळखले जात होते. गेल्या अनेक दशकात एक कोटी झाडे लावल्याबद्दल रामैया यांना २०१७ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी रामैया

» पान ७ वर

अनोखा आनंद

महाराष्ट्र माझा आंबा महोत्सव : महाराष्ट्र नवनिर्माण सेने तर्फे बालगंधर्व रंगमंदिर येथे शेतकरी ते ग्राहक "महाराष्ट्र माझा आंबा महोत्सव" मधे लहान मुला-मुलींसाठी भारतातील लोकप्रिय "आंबे खा स्पर्धा" आयोजित केली होती. या स्पर्धेत एकूण ३५ लहान मुला-मुलींनी सहभाग घेत आंब्यावर चांगला ताव मारला.

दिल्लीत धुळीचे वादळ!

५० देशांतर्गत विमानांना विलंब

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

दिल्ली : दिल्ली आणि एनसीआरच्या काही भागाला शुक्रवारी संध्याकाळी धुळीच्या वादळाचा तडाखा बसला. या वादळामुळे इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय (आयजीआय) विमानतळावरील विमान वाहतूक ठप्प झाली. यामुळे शेकडो प्रवासी विमानतळावर अडकून पडले आहेत.

यामुळे विमानतळावर मोठा गोंधळ उडाला. शुक्रवारी संध्याकाळपासून शनिवार सकाळपर्यंत इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण घेणाऱ्या सुमारे ५० देशांतर्गत विमानांना विलंब झाला. तर सुमारे २५ विमानांचा मार्ग बदलण्यात आला. धुळीच्या वादळामुळे सात विमान उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. दरम्यान, प्रवाशांनी या झालेल्या गैरसोयीबद्दल सोशल मीडियावर संताप व्यक्त केला.

अनेक प्रवाशांनी बोर्डिंग गेटवरील गर्दी आणि विमान कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांकडून झालेल्या गैरवर्तनाचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. विमानतळावर मोठा गोंधळ उडाला असून चेंगराचेंगरीसाठी परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून आले आहे.



अमृत भारत स्टेशन योजनेत पुण्याला 'आधुनिक सेवा'

योजना

पुण्यातील १२ रेल्वे स्थानकांचे रूप पालटणार

या योजनेमुळे स्थानकांवर प्रवाशांसाठी वेटिंग लाऊंज, फूड कोर्ट्स, स्वच्छतागृहे, लिफ्ट्स, एस्कलेटर्स आणि डिजिटल सुविधांसारख्या आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : भारतीय रेल्वेच्या 'अमृत भारत स्टेशन' योजनेंतर्गत महाराष्ट्रातील एकूण १३२ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेद्वारे देशभरातील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येणार असून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामध्ये पुणे जिल्ह्यातील १२ रेल्वे स्थानकांचा समावेश आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत शुक्रवारी झालेल्या पत्रकार परिषदेवेळी ही माहिती देण्यात आली.

या योजनेत छत्रपती शिवाजी

महाराज टर्मिनस, दादर (मध्य आणि पश्चिम), अंधेरी, टिळक टर्मिनस, पुणे, नाशिक रोड, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, परभणी, सोलापूर, सातारा, सांगली, आदी महत्त्वाच्या स्थानकांचा समावेश आहे. याशिवाय उपनगरीय आणि ग्रामीण भागातील अनेक स्थानकांनाही यात स्थान देण्यात आले आहे.

या योजनेमुळे स्थानकांवर प्रवाशांसाठी वेटिंग लाऊंज, फूड कोर्ट्स, स्वच्छतागृहे, लिफ्ट्स, एस्कलेटर्स आणि डिजिटल सुविधांसारख्या आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत. तसेच, स्थानकांचे सौंदर्यीकरण आणि शहराशी अधिक सुसंगत दळणवळण व्यवस्था विकसित केली जाणार आहे.

- या पुनर्विकासात पुणे जंक्शन, शिवाजीनगर स्टेशन, लोणावळा स्टेशनसह नऊ स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे.
- बारामती स्टेशन (११ कोटी ४० लाख रुपये),
- दौंड (४४ कोटी),
- केडगाव (१२ कोटी ५० लाख),
- आकुर्डी (३४ कोटी),
- चिंचवड (२० कोटी ४० लाख),
- देहू रोड स्टेशन (८ कोटी ५ लाख),
- तळेगाव स्टेशन (४० कोटी ३४ लाख),
- हडपसर स्टेशन (२५ कोटी रुपये)
- उरुळी स्टेशनच्या विकासासाठी १३ कोटी रुपये मंजूर

रद्द कार्यक्रमाचे पैसे परत मिळण्यासाठी लढा

पुणे : कोरोनापूर्वी आणि कोरोना सुरू झाल्यानंतर अनेकांनी त्याच्या घरातील लग्न, मुंज, वाढदिवस, डोहाळे जेवण अशा विविध कार्यक्रमांसाठी हॉल बुक केलेले होते. मात्र, कोरोनामुळे ते कार्यक्रम रद्द झाल्याने तेव्हा भरलेले पैसे परत मिळावे म्हणून त्यासाठी अनेक ग्राहकांचा न्यायालयीन लढा सुरू झालेला आहे.कोरोनाचा संसर्ग वाढू नये म्हणून २०२० मध्ये व त्यानंतर टप्प्या-टप्प्याने काही कालावधीसाठी कोणताही सार्वजनिक कार्यक्रम घेण्यासाठी काही नियम व अटी ठरवून देण्यात आल्या होत्या. कार्यक्रमासाठी किती माणसे उपस्थित असतील, हे देखील निश्चित करण्यात आले होते. त्यामुळे निर्बंध असलेल्या काळातील अनेक कार्यक्रम पुढे ढकलण्यात आले किंवा रद्द केले होते. मात्र, या कार्यक्रमांसाठी हॉलचे पैसे आधीच भरलेले होते. हे पैसे त्यावेळी परत मागण्यात आले; पण हॉल चालकांनी कार्यक्रम रद्द केला तर आमचे पण नुकसान होईल. त्यामुळे नंतर तुम्ही उपलब्ध असलेल्या तारखांना तुमचा कार्यक्रम घ्या, अशी विनंती आयोजकांना केली होती. त्यानंतर काहींनी नंतर कार्यक्रम आयोजित केले. मात्र, काहींना परत कार्यक्रम घेणे शक्य न झाल्याने त्यांनी हॉल चालकांकडे पैशांची मागणी केली होती. त्याबाबत चर्चेतून मार्ग न निघाल्याने पैसे परत मिळावे, म्हणून काहींनी ग्राहक आयोगात धाव घेतली

तरुणाला धमकावून दुचाकी चोरी

पुणे : हडपसर भागात तरुणाला धमकावून त्याची दुचाकी चोरून नेल्याची घटना घडली. याबाबत २८ वर्षीय तरुणाने हडपसर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. तरुण हडपसर भागात राहायला आहे. मंगळवारी (ता. ८) रात्री तो हडपसर भागातील क्रेझी कॅफेसमोर थांबला होता. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या तीन चोरट्यांनी त्याला धमकाविले. त्याच्याकडील दुचाकी ताब्यात घेतली. दुचाकी चोरून चोरटे पसार झाले.

१७ एप्रिलला काही भागात पाणी पुरवठा बंद

पुणे : आगम मंदिर येथे मुख्य दाब जलवाहिनीमधून होणारी गळती थांबविणे आणि राजमाता भुयारी मार्ग येथे स्थापत्य विषयक तातडीच्या देखभाल-दुरुस्तीच्या कामासाठी गुरुवार, दि. १७ एप्रिल २०२५ रोजी पुणे महापालिकेचा खालील भागांचा पूर्ण दिवस पाणीपुरवठा बंद राहणार आहे. महापालिकेच्या जलविभागाने दिलेल्या माहितीनुसार, या भागांमध्ये शुक्रवारी, दि. १८ एप्रिल २०२५ रोजी उशिरा व कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी याची नोंद घेऊन आवश्यक पाणीसाठा करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पाणीपुरवठा बंद राहणारे भाग : निलगिरी चौक, चिंतामणी ज्ञानपीठ ते त्रिमूर्ती चौक, भारती विद्यापीठ, भारती विहार, चंद्रभागानगर, सावंतविहार, सावंत गार्डन, वंडर सिटी, कदम प्लाझा, झान्सी गार्डन, माणिक मोती, नारायणी धाम परिसर, दत्तनगर, संतोषनगर, आंबेगाव बुद्रुक गावठाण, आंबेगाव खुर्द, जांभूळवाडी रोड, धबाडी व परिसर.

दहावीनंतर काय या विषयावर व्याख्यान

पुणे : 'आयआयबी करिअर इन्स्टिट्यूट' आणि पुणे शहर माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघातर्फे २० एप्रिलला सकाळी १० ते दुपारी तीन या वेळेत स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा मंच येथे विद्यार्थी व पालकांसाठी मेळाव्याचे आयोजन केले आहे. व्याख्याते नितीन बानगुडे-पाटील यांचे 'दहावीनंतर काय' या विषयावर व्याख्यान होणार असल्याची माहिती इन्स्टिट्यूटचे महेश लोहारे आणि मुख्याध्यापक संघाचे कार्याध्यक्ष शिवाजी कामठे यांनी शुक्रवारी दिली. आयआयबी इन्स्टिट्यूट आणि मुख्याध्यापक संघातर्फे गुणवत्ता संवर्धन अभियान आयोजित केले होते.

कानून के हात लंबे होते है...!

पुणे शिंदवणे रोड येथील घटनेत एका इसमाला अज्ञात आरोपींनी कोयत्याने वार करून जिवे मारण्याचा प्रयत्न केलेला होता. या घटनेतील आरोपी अखेर एक महिन्यानंतर उरुळी कांचन पोलिसांच्या हाती लागले. सदर गुन्ह्यामध्ये काहीएक धागादोरा नसताना उरूळी कांचन पोलिसांनी कौशल्यपूर्ण तांत्रिक तपास करून सदर आरोपींना अटक केली

तरुणाच्या खूनाचा प्रयत्न; तिघे अटकेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : शिंदवणे रोड येथील घटनेत एका इसमाला अज्ञात आरोपींनी कोयत्याने वार करून जिवे मारण्याचा प्रयत्न केलेला होता. या घटनेतील आरोपी अखेर एक महिन्यानंतर उरुळी कांचन पोलिसांच्या हाती लागले. सदर गुन्ह्यामध्ये काहीएक धागादोरा नसताना उरूळी कांचन पोलिसांनी कौशल्यपूर्ण तांत्रिक तपास करून सदर आरोपींना अटक केली आहे.

समीर आसलम शेख (वय २५), चेतन सोमनाथ जाधव (वय १८ वर्षे ६ महिने), निगम उर्फ नॅगी जगदीश निशाद (वय १८ वर्षे, ११ महिने, सर्व रा. लोणी काळभोर ता. हवेली) असे आरोपींची नावे आहेत. तर दोन आरोपी अद्यापही फरार आहेत.

दरम्यान, शिंदवणे (ता. हवेली) गावच्या हद्दीतील चिंतामणी वॉशिंग सेंटरजवळ बुधवारी (ता. ५) सकाळी साडेसहाच्या सुमारास तीन जणांनी एकाच्या डोक्यात कोयत्याने वार केल्याची घटना घडली होती. या घटनेत निखिल एकनाथ खेडेकर (वय ३२, रा. शिंदवणे, खेडेकर आळी, ता. हवेली) हे जखमी झाले होते. याप्रकरणी उरुळी कांचन पोलिस स्टेशनमध्ये तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुण्याचे 'तळीराम' ही 'दानशूर'च...!

करापोटी शासनाला तब्बल तीन हजार कोटींचा 'आहेर'; गेल्या वर्षीच्या तुलनेत घसघशीत वाढ

> कोणत्याही परिस्थितीत बेकायदा दारुची विक्री खपवून घेतली जाणार नाही, त्यांच्या विरोधात कडक मोहिम राबविण्याच्या सूचना सर्व पथकांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार यापुढील कालावधीत या कारवाईत सातत्य ठेवण्यात येणार आहे, त्यामध्ये कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही.
>
> **-चरणसिंह राजपूत,** अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग

दान करण्यात पुणेकर नेहमीच अव्वल समजले जातात; दान करण्यात त्यांचा हात कोणीही धरु शकत नाही. त्यामुळेच पुणेकरांचे 'दान' पुणेकरांच्या खाद्यपदार्थाप्रमाणेच जगात एक नंबरला आहे. त्यामुळेच पुणेकरांचा झेंडा अटकेपार रोवला गेला आहे. मात्र; हे वास्तव असले तरीही पुणेकरांनी नको त्या प्रकरणात चक्क राज्य शासनाला घसघशीत दान दिले आहे. पुण्याच्या तळीरामांनी गेल्या वर्षभरात दारुच्या महसूलापोटी राज्य शासनाला तब्बल तीन हजार कोटी रुपयांचा 'आहेर' केला आहे, यातून राज्य शासनाला महसूल मिळाला असला तरीही सुसंस्कृत पुणेकरांसाठी ही बाब निश्चितच समाधानकारक अशी नाही; त्यातून तरुण पिढी बरबाद झाल्याशिवाय राहणार नाही. राज्य शासनाच्या उत्पादन शुल्क विभागाने जाहीर केलेली ही आकडेवारी सुसंस्कृत पुणेकरांच्या डोळयात निश्चितच अंजन घालणारी आहे.

अशी घातली महसूलाला 'गवसणी'

- बेकायदा दारु विक्री आणि वाहतूक: ५ हजार ५१५ गुन्हे दाखल
- ५ हजार ८९१ आरोपी अटकेत
- बेकायदा ढाबे: ४५५ गुन्हे दाखल
- ८ लाख १९ हजार रुपयांचा दंड वसूल
- २१ पथकांची प्रभावी कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : दारूच्या माध्यमातून राज्य शासनाला महसूल मिळवून देण्यात पुणेकर नेहमीच अग्रेसर समजले जात आहेत, विशेष म्हणजे यंदा तर या महसूलाची हद्दच झाली असून पुणेकरांनी दारुच्या माध्यमातून राज्य शासनाला तब्बल तीन हजार कोटी रुपयांचा महसूल मिळवून दिला आहे. विशेष म्हणजे गेल्या वर्षीपेक्षा यावर्षीच्या महसूलात तब्बल दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे.

आर्थिक वर्ष संपल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने यासंदर्भातील महसूलाची आणि कराची आकडेवारी प्रसिध्द केली जाते,त्यानुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक चरणसिंह राजपूत यांनी यासंदर्भातील आकडेवारी जाहीर केली आहे. त्यानुसार एकट्या पुणे शहर आणि जिल्ह्यातून तब्बल तीन हजार कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे, गेल्या आर्थिक वर्षात याच माध्यमातून उत्पादन शुल्क विभागाला २ हजार ७२९ कोटी रुपयांचा महसूल मिळाला होता.

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत ग्रामीण आणि शहरी भागातीलही हॉटेल आणि ढाब्यावर मोठ्या प्रमाणावर बेकायदा दारुची विक्री होत असल्याच्या तक्रारी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे आल्या होत्या. त्यानुसार त्यांना पायबंद घालण्यासाठी तब्बल २१ पथकांची स्थापना करण्यात आली आहे. या पथकांनी सर्वच विभागात धडक मोहिम राबवित बेकायदा दारु विक्रेत्यांना अक्षरश: जेरीस आणले असून त्यामाध्यमातूनही महसूल काही प्रमाणात वाढला आहे अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक चरणसिंह राजपूत यांनी दैनिक 'राष्ट्र संचार' शी बोलताना दिली.

गेल्या वर्षभराच्या कालावधीत ५६९ बेकायदा मद्यालयांवर कारवाई करण्यात आली आहे

पीएमपी प्रवासी संख्या १२ वरून १० लाखांवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीएच्या हद्दीत दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे या भागात पीएमपी बससंख्या वाढविणे गरजेचे आहे; परंतु बस कमी असल्याने प्रवाशांवर परिणाम होत आहे. गेल्या वर्षी दिवसाला १२ लाखांच्या पुढे गेलेली प्रवासी संख्या आता दहा लाखांवर आली आहे. शिवाय गर्दी असताना अनेक मार्गांवर बसची कमतरता आहे. त्यामुळे प्रवासी संख्येत घट झाली आहे.

अपुरी बससंख्या, मार्गावर वेळेवर बस नसणे, जुन्या बस रस्त्यात बंद पडणे, वेळेचे नियोजन नसणे या विविध कारणांमुळे पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) गेल्या आर्थिक वर्षांत दोन कोटी २९ लाख प्रवासी संख्येत घट झाली आहे. शिवाय प्रवासी घटल्याने यंदा ४७ कोटी रुपये उत्पन्न कमी मिळाले. यामुळे पीएमपीची संचालन तूट वाढणार आहे.

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीएच्या हद्दीत पीएमपीकडून प्रवासी सेवा देण्यात येते. पीएमपीच्या दैनंदिन १ हजार ७०० बस शहरातील विविध मार्गांवर धावतात. गेल्या काही वर्षांपासून दरवर्षी पीएमपीची संचालन तूट वाढत आहे. त्यामुळे पीएमपीची आर्थिक कोंडी होत आहे. त्यामुळे ही तूट भरून काढण्यासाठी दोन्ही महापालिकांना अतिरिक्त पैसे द्यावे लागत आहेत. पीएमपीची संचालन तूट वाढल्यामुळे खर्च कमी करण्याकडे भर दिला जात आहे; पण प्रत्येक महिन्यात प्रवासी संख्या कमी होत गेल्याचे दिसत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे पीएमपीच्या ताफ्यातील कमी झालेली बससंख्या. येत्या काळात बससंख्या वाढणार आहे. त्यामुळे उत्पन्नात वाढ होईल का? हे पाहावे लागणार आहे.

गेल्या वर्षी पीएमपीच्या ताफ्यातील बसची घटना घडली होती. शिवाय स्वमालकीच्या ३२७ बसला १२ वर्षे पूर्ण झाली तरी मार्गावर सोडण्यात आले होते. त्यामुळे या बस सतत बंद पडत आहेत. त्याचा मनस्ताप प्रवाशांना सहन करावा लागत आहे. शिवाय बसची संख्या कमी झाल्यामुळे काही मार्गांवरील फेऱ्या कमी झाल्या आहेत. यामुळे पीएमपीच्या उत्पन्नावर परिणाम झाल्याचे दिसून आले.

पुण्यातील पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी ३ लाख रुपयांचे जिंकले बक्षीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक), लोहेगाव, शासकीय पॉलिटेक्निक, आवसारी पुणे, जीएच रायसोनी पॉलिटेक्निक कॉलेज, नागपूर, राजगड ज्ञानपीठाचे तांत्रिक कॅम्पस, भोर, भारती विद्यापीठ परिसर, पॉलिटेक्निक, पुणे आणि एआयएसएसएमएस पॉलिटेक्निक, पुणे येथील विद्यार्थ्यांनी जीएच रायसोनी इंटरनॅशनल स्किल टेक युनिव्हर्सिटी, पुणे यांनी आयोजित केलेल्या कौशल्यसेतू २०२५ प्रकल्प, पोस्टर आणि पेपर सादरीकरण स्पर्धेत ३ लाख रुपयांचे बक्षीस जिंकले. या कार्यक्रमात पुण्यातील ४२५ डिप्लोमा इंजिनिअरिंग आणि पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना, तांत्रिक कौशल्य आणि शैक्षणिक उत्कृष्टता प्रदर्शित केल्या.

राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) चे प्राचार्य डॉ. काशीनाथ मुंडे आणि जीएच रायसोनी इंटरनॅशनल स्किल टेक युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. एम. यू. खरात यांच्या हस्ते नुकतेच या स्पर्धेचे उद्‌घाटन झाले. या स्पर्धेने तरुण तंत्रज्ञांच्या उत्कटतेचा आणि सर्जनशीलतेचा गौरव केला. "या विद्यार्थ्यांनी दाखवलेला उत्साह आणि कल्पकता भारताच्या तांत्रिक परिदृश्याचे उज्ज्वल भविष्य प्रतिबिंबित करते," असे उद्‌घाटन समारंभात डॉ. खरात यांनी सांगितले.

राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) चे प्राचार्य डॉ. काशीनाथ मुंडे म्हणाले, पुणे शहर व जिल्ह्यातील डिप्लोमा इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचे सादरीकरण केले. नवोपक्रम आणि तांत्रिक उत्कृष्टतेला चालनासाठी जीएच रायसोनी इंटरनॅशनल स्किल टेक युनिव्हर्सिटी, पुणे यांननी महत्वपूर्ण स्पर्धा आयोजित केली. परिणामी विद्यार्थ्यांना एक चांगले व्यासपीठ मिळाले.

राजारामबापू इन्स्टिट्यूट, शासकीय पॉलिटेक्निक, आवसारी, राजगड ज्ञानपीठाचे तांत्रिक कॅम्पस, भोर आणि जीएच रायसोनीच्या विद्यार्थ्यांना नवोपक्रमासाठी सन्मानित करण्यात आले

सुदर्शन कंपनीसह कर्मचाऱ्यांचे सामाजिक भान कौतुकास्पद

मंत्री आदिती तटकरे यांचे प्रतिपादन; सुदर्शन केमिकल्सतर्फे २३५ विद्यार्थ्यांना 'सुधा सितारा' शिष्यवृत्ती प्रदान

सुदर्शन केमिकलच्या वतीने सुधा सीएसआर अंतर्गत मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते रोहा व महाड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील २३५ विद्यार्थ्यांना 'सुधा सितारा' शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : "आर्थिक दुर्बल घटकातील गरजू व हुशार मुलींना दत्तक घेऊन त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचा सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज व सुधा सीएसआर फाऊंडेशनचा उपक्रम स्तुत्य आहे. सुदर्शन कंपनीसह येथील कर्मचाऱ्यांनी जपलेले सामाजिक भान कौतुकास्पद आहे. हा उपक्रम आता केवळ 'सुधा सितारा' राहिला नाही, तर खऱ्या अर्थाने 'सुधा सितारे' झाला आहे," असे प्रतिपादन राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी केले. हुशार व गरजू विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार करण्यासाठी सुधा सितारा शिष्यवृत्ती संजीवनी ठरत असल्याचेही अदिती तटकरे म्हणाल्या.

सुदर्शन केमिकलच्या वतीने सुधा सीएसआर अंतर्गत मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते रोहा व महाड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील २३५ विद्यार्थ्यांना 'सुधा सितारा' शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यामध्ये १८५ मुली, ४९ मुले व १२ दिव्यांग विद्यार्थ्यांचा समावेश आहे. राठी स्कुलमध्ये आयोजित शिष्यवृत्ती प्रदान सोहळ्यावेळी सुदर्शन केमिकल्सच्या पीपल्स प्रॅक्टिस हेड शिवालिका पाटील, सुदर्शन रोहा साईट हेड विवेक गर्ग, सीएसआर हेड माधुरी सणस आदी उपस्थित होते.

राजेश राठी म्हणाले, "संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टयांना अनुसरून सुधा सीएसआर महिला सक्षमीकरण, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि सामाजिक विकास या क्षेत्रात कार्यरत आहे. या सीएसआर कार्यक्रमातून आजवर लाखो लोकांच्या आयुष्यात बदल घडवण्याचे काम झाले आहे. शिवालिका राजे यांनी सांगितले की, सुदर्शन कंपनीत 'डायव्हर्सिटी अँड इन्क्लुजन' अंतर्गत उपक्रम राबवले जात आहेत. आपण समाजातही हेच मूल्य रुजवत आहोत. यावेळी सुधा सीएसआर उपक्रमांतर्गत, मुलींप्रमाणेच मुलांना आणि दिव्यांगांना दत्तक घेऊन मदत केली जात आहे. या वर्षीच्या सुधा सितारा उपक्रमाची व्याप्ती संपूर्ण रायगड जिल्ह्यात झाली, याचा आनंद आहे.

प्रास्ताविकात माधुरी सणस म्हणाल्या, "सामाजिक जाणिवेतून २०१९ मध्ये या उपक्रमाला सुरुवात केली. गेल्या पाच वर्षात शेकडो मुलींना सुधा सितारा शिष्यवृत्ती दिली आहे. गरजू मुलामुलींना शिक्षण आणि मेंटॉरशिप देऊन त्यांना सक्षम करण्यासाठी सुदर्शन केमिकल्समधील कर्मचाऱ्यांनी या मुलामुलींचे पालकत्व स्वीकारले आहे."

विवेक गर्ग यांनीही उपस्थितांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात याआधी शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थिनींच्या यशोगाथा ऐकून उपस्थित भारावून गेले. विद्यार्थी, त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुदर्शन कंपनी आणि त्यांचे कर्मचारी समाजातील विषमतेची दरी कमी करण्यासाठी खूप चांगले काम करत आहेत, अशी भावना पालक व विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.



> गुणवत्तेवर आधारित हा उपक्रम आहे. मुलींमधील गुणवत्ता हेरून त्यांना अर्थसहाय्य व प्रोत्साहनपर मार्गदर्शन देण्याची ही कल्पना विलक्षण आहे. गेल्या पाच वर्षांत जवळपास सहाशे विद्यार्थ्यांना याचा लाभ झाला आहे. हा उपक्रम सातत्याने सुरू राहावा. संपूर्ण रायगड जिल्ह्यात हा उपक्रम राबविण्याला जातोय, याचा आनंद आहे. यामुळे मुलींचा आत्मविश्वास वाढेल.
>
> **— आदिती तटकरे ,** महिला व बालकल्याण मंत्री

सफाई कामगारांच्या सन्मानासाठी...

कचरा वेचणाऱ्या महिला, सफाई कामगार यांच्या कामाचं महत्त्व वादातीत आहे. ते स्वच्छतेचे, पर्यावरणाचे पाईक आहेत. पण या समुदायाला योग्य तो सन्मान मिळत नाही. त्यांना साधी सुरक्षाही मिळत नाही. त्यांच्या घरात मूलभूत सोयींचीही वानवा असते. ही परिस्थिती नलिनी शेखर यांना बोचत होती. शहरांच्या स्वच्छतेत मोलाची भर घालणाऱ्या या कामगारांसाठी काहीतरी करण्याच्या इच्छेतून 'हसिरू दल' ही संस्था सुरू झाली.

'पर्यावरणाचे पाईक' असा 'हसिरू दल' या कन्नड शब्दाचा अर्थ. आपला परिसर आणि पर्यायाने शहर स्वच्छ ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात ते सफाई कामगार. मात्र त्यांच्या कामाची दखल घेतली जात नाही. हे लोक झाडूने रस्ता झाडत असतात. घराघरातला कचरा गोळा करतात. पण त्यांचा मान काही राखला जात नाही. सफाई कामगारांनी संप केला किंवा काही दिवस सुट्टी घेतली तर परिसरात घाण साचलेली असते. एवढं होऊनही त्यांच्या कामाचं मोल कोणाच्या लक्षात येत नाही. समाजातला हा घटक उपेक्षित रहातो. असंख्य अनोळखी चेहरे आपल्यासाठी झटत असतात आणि आपण मात्र त्यांना साधा सन्मानही देऊ शकत नाही.

बंगळूरूच्या नलिनी शेखर यांना ही बाब खटकत होती. सफाई कामगाराचं रोजंदारीवर चालणारं काम, त्यांच्या घरातली मूलभूत सुविधांची वानवा याची त्यांना खंत वाटायची. समाजातली ही दरी कमी करण्यासाठी त्यांनी 'हसिरू दल' या सफाई कामगारांसाठी काम करणाऱ्या सेवभावी संस्थेची स्थापना केली. २०११ मध्ये ही संस्था सुरू झाली. कचरा वेचणाऱ्यांच्या सुरक्षेसाठी तसंच त्यांना मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी ही संस्था काम करते. आजवर या संस्थेने दहा हजार सफाई कामगारांच्या आयुष्यावर प्रभाव टाकला आहे. दर आठवड्याला या संस्थेचे कार्यकर्ते सफाई कामगारांच्या जवळपास चार हजार कुटुंबांना भेटी देतात.

मानिनी

कचरा व्यवस्थापनाचे नियम अस्तित्त्वात येण्याआधीपासूनच नलिनी कचरा वेचणाऱ्यांसोबत काम करायच्या. घनकचरा व्यवस्थापनविषयक कायदा येण्याच्या सात वर्षं आधी म्हणजे १९९३ मध्ये त्यांनी कचऱ्याच्या विभागणीबाबत सफाई कर्मचाऱ्यांशी संवाद साधला होता. लग्नानंतर त्या काही काळ पुण्यात वास्तव्यास होत्या. त्यावेळी एसएनडीटी विद्यापीठात प्राध्यापिका असताना सफाई कामगार हा आपल्या समाजातला सर्वात दुर्लक्षित घटक असल्याचं त्यांच्या लक्षात आलं आणि या घटकाच्या कल्याणासाठी काम करण्याचा विचार त्यांच्या मनात आला. अनेक लहान मुलंही कचरा वेचण्याचं काम करत असल्याने नलिनी यांनी त्यांच्या आयुष्यात बदल घडवण्यासाठी कंबर कसली.

'हसिरू दल'ने सफाई कामगारांच्या आयुष्यात बदल घडवला आहे. त्यांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी ही संस्था झटते. त्यांच्या प्रयत्नांमुळे बंगळूरू महानगरपालिकेचे कचरा व्यवस्थापनासाठीचे वर्षाला ८४ कोटी रुपये वाचतात. सफाई कामगारांनी स्वावलंबी व्हावं, त्यांना उद्योजकतेचे धडे मिळावेत यासाठीही ही संस्था प्रयत्नशील आहे. 'हसिरू दल'ला आपला आवाका वाढवायचा आहे. देशभरातल्या सफाई कामगारांपर्यंत पोहोचायचं आहे. समाजातल्या या दुर्लक्षित घटकासाठी कार्यरत असणाऱ्या नलिनी शेखर याचं कार्य वाखाणण्याजोगं आहे.

लिप केअर

जपा ओठांचं सौंदर्य

ओठांना फक्त थंडीतच जपायचं असं नाही तर प्रत्येक ऋतूत त्यांची काळजी घ्यायला हवी. ओठांवरची त्वचा खूप पातळ आणि नाजूक असते. तिचा उन्हापासून बचाव व्हायला हवा. यासाठी किमान ३० एसपीएफ असणाऱ्या लिप बामचा वापर करा. ओठांमध्ये नैसर्गिक तेल नसल्यामुळे त्यातला ओलावा टिकवण्यासाठी बाह्य उपाय करावे लागतात. झोपण्याआधी मेक अप रिमूव्हरने लिपस्टिक काढून टाका. रात्रभर ओठांना ओलावा देणारा लिप बाम लावा. ओठांवरून वारंवार जीभ फिरवू नका. यामुळे ओठ अधिक कोरडे पडतात.

कसं निवडायचं सिरम

क्लिंजर आणि मॉईश्चरायझरच्या मधला टप्पा म्हणजे सिरम. त्वचेची काळजी घेण्यासाठी आणि उजळवण्यासाठी सिरमचा वापर करायला हवा. बाजारात वेगवेगळ्या प्रकारची सिरम उपलब्ध आहेत. त्यामुळे कोणतं सिरम घ्यायचं, असा प्रश्न पडणं अगदी साहजिक आहे. त्यातच महाग म्हणजे चांगलं का, हा प्रश्न स्वत:लाच विचारून बघा. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे आपल्या त्वचेच्या पेशी पुनरूज्जीवीत व्हायला कमीत कमी २८ दिवसांचा काळ लागतो. आसपासचं वातावरण आणि जीवनशैली यामुळे हा कालावधी वाढूही शकतो. त्यामुळे स्कीन केअर प्रोडक्टचा प्रभाव जाणून घेण्यासाठी ते महिनाभर तरी वापरायला हवं. आपल्या त्वचेनुसार योग्य सिरमची निवड कशी करावी, याबाबत...

स्किन केअर

* कोरडी त्वचा असलेल्यांनी हायअॅल्युरॉनिक अॅसिडवालं सिरम निवडावं. या अॅसिडमुळे त्वचेतलं पाण्याचं प्रमाण कमी होत नाही. त्वचेतला ओलावा टिकून राहतो.
* उन्हाशी संपर्क, चुकीची जीवनशैली तसंच अनुवांशिक कारणांमुळे त्वचा काळवंडते. अशा वेळी 'क' जीवनसत्त्व असलेली म्हणजे एल अॅस्कॉर्बिक अॅसिड असलेली सिरम वापरावीत. या घटकामुळे तुमची त्वचा उजळते.
* अँटी एजिंग क्रीम्समुळे त्वचा पहिल्यासारखी झाली नाही तरी त्वचेचं तारूण्य आणि तजेला टिकून राहण्यास मदत होते. त्वचेचं तारूण्य टिकवण्यासाठी नाईट सिरम वापरा.
* संवेदनशील त्वचा असलेल्यांनी ड्राय ऑईल ट्राय करावं. त्यात कोल्ड प्रेस्ड सुपरफुड सीड ऑईल्स असणं गरजेचं असतं. हलकी सिरम वापरावीत.
* सर्वसामान्य त्वचेचं वरदान लाभलं असेल आणि त्वचेचा पोत अधिक सुधारावा असं वाटत असेल तर ग्लायकोलिक अॅसिडवाली सिरम वापरावी. अशा सिरममुळे मृत त्वचा दूर होते. यामुळे त्वचेवरची छिद्रं बंद होत नाहीत.

सध्या बऱ्याच समारंभांमध्ये वेलकम ड्रिंकने पाहुण्यांचं स्वागत केलं जातं. विविध प्रकारचे ज्यूस, सरबतं, फ्रूट पंच यांची रेलचेल असते. घरगुती कार्यक्रमात किंवा सहज घरी आलेल्या पाहुण्यांच्या स्वागतासाठी तुम्हीही वेगवेगळ्या पेयांचा शोध घेत असाल. अशावेळी गारेगार किवी स्मूदी पाहुण्यांची रसना तृप्त करू शकते. साधी, सोपी आणि झटपट होणारी ही रेसिपी तुम्हीही करून बघा.

रसगंधा

साहित्य: २-३ किवी फ्रूट, ५० ग्रॅम खडीसाखर, पाव लीटर दूध, कोणत्याही फ्लेवरचं आईस्क्रीम, सजावटीसाठी चेरी, स्ट्रॉबेरी, सुकामेवा, किवीचे पातळ काप यापैकी काहीही.

कृती: किवी फळाची सालं काढून घ्या. ज्यूसरच्या भांड्यात किवी, दूध, खडीसाखर आणि आईस्क्रीमचा गोळा घाला. फिरवून घ्या. हे सगळे घटक एकजीव होऊन छान शेक तयार व्हायला हवा. आता ही स्मूदी एका भांड्यात किंवा जारमध्ये काढून घ्या. ग्लासमध्ये ओता. चेरी, स्ट्रॉबेरीचे तुकडे, सुक्यामेव्याचे काप, ब्लॅकबेरी, किवीचे पातळ काप यापैकी कशानेही सजावट करा. किवी या फळात अनेक आरोग्यदायी घटक असतात. यातल्या फायबरमुळे लवकर भूक लागत नाही. रक्तातल्या साखरेचं प्रमाणही किवीमुळे नियंत्रणात रहातं. यामुळे किवी स्मूदी हा हेल्दी आणि टेस्टी ऑप्शन आहे.

स्मार्ट टिप्स

साड्यांचा असाही वापर

जुन्या साड्यांचं काय करावं, हा प्रश्न महिलांना कायमच भेडसावत असतो. काही जणी या साड्यांचा पंजाबी ड्रेस किंवा इव्हिनिंग गाऊन शिवतात. हे प्रकारही ट्राय करून झाले असतील तर या साड्यांचा थोडा हटके वापर करता येईल. कल्पनाशक्ती

लढवून साड्यांपासून सुंदर पडदे तयार करा. रंगीबेरंगी साड्यांचा वापर करून तुम्ही घराची रंगत वाढवू शकता. साड्यांच्या छान बेडशीट्स करता येतील. यामुळे तुमच्या बेडरुमला रॉयल लूक मिळेल. कलात्मकता असेल तर साड्यांपासून छान कलाकृती तयार करता येतील. साड्यांपासून लँप शेड, कुशन कव्हर, टेबल मॅटही तयार करता येतील.

चलती ट्रेंडी टॉप्सची

छानसा टॉप तुमचा संपूर्ण लूक बदलून टाकतो. योग्य अॅक्सेसरीज आणि बॉटम कॅरी करून तुम्ही उठून दिसू शकता. सोबर टॉप्सपासून स्टायलिश टॉप्सपर्यंत प्रचंड व्हरायटी तुम्हाला पहायला मिळते. अशाच काही हटके टॉप्सवर नजर टाकू या.

स्टाईल स्टेटमेंट

* भरजरी आणि टेक्स्चर्ड पॅटर्नची आवड असेल तर तुम्ही नक्षीकाम केलेले टॉप्स निवडू शकता. बॉटमवर त्याच रंगाचा टॉप घालता येईल किंवा ड्युअल टोनही कॅरी करता येईल.
* पिवळ्या रंगाच्या टॉप्सची कायमच चलती असते. या रंगात स्टायलिश पॅटर्न्सची निवड करा. वेगवेगळे कट्स ट्राय करा.
* फ्लेअर्ड किंवा घेरवाले टॉप्स हा सुद्धा मस्त ऑप्शन आहे. वेगवेगळे प्रिंट्स, स्ट्राईप्स, चेक्समध्ये खेळा. स्लीव्हजचे वेगळे पॅटर्नही ट्राय करा.
* साध्या प्लेन व्हाईट टॉपलाही स्टायलिश बनवता येईल. ट्रेंडी गळे, नव्या जमान्याच्या स्लीव्हज असणारे व्हाईट टॉप्स निवडा.
* थोडा बोल्ड लूक आवडत असेल तर ऑफ शोल्डर कट्सवाले टॉप्स घ्या. डेनिम्स, शॉर्टस, स्कर्ट किंवा ट्राउजर्सवर ते घालता येतील.

लाईफस्टाईल

भाज्या ठेवा ताज्या

मैत्रिणींनो, आपण एकाच वेळी बऱ्याच भाज्या आणतो. या भाज्यांचा ताजेपणा टिकवून ठेवण्यासाठी बरेच उपाय केले जातात. फ्रीजमध्ये ठेवल्यानंतर भाज्यांना सुरकुत्या पडतात. त्या शिळ्या दिसू लागतात. अशावेळी त्यांचा ताजेपणा टिकवून ठेवण्यासाठी विविध उपाय करता येतील. हिरव्या पालेभाज्या कागदावर किंवा फडक्यावर पसरवून ठेवा. त्यांची पानं एकमेकांपासून लांब ठेवा. भोपळी मिरची, वांगी, काकडी या भाज्या सुती कापडात किंवा पिशवीत ठेवा. बटाटे लसणासोबत ठेवल्याने बराच काळ ताजे रहातात. टॉमेटो प्लास्टिक पिशवीत ठेऊन पिशवीला छोटी छिद्र पाडा.

जबाबदार कर्मचारी बना

ऑफिसमध्ये तुम्ही समर्पित भावनेने काम करता. कामाच्या वेळा पाळता, सहकाऱ्यांशी तुमचे चांगले संबंध असतात. एवढ्या गुणांवरून तुमची गणना चांगल्या कर्मचाऱ्यांमध्ये होऊ शकते का? खरं तर नाही. कारण ऑफिसमध्ये काही नियम पाळावे लागतात. योग्य वर्तणूक असावी लागते. प्रत्येक ऑफिसमधलं वातावरण वेगळं असतं. स्टार्टअप्स, कॉर्पोरेट विश्वात कर्मचाऱ्यांची विशेष काळजी घेतली जाते. त्यांना मोकळीकही असते. मात्र काही गोष्टींचं पालन केलं तर तुमचा सन्मान अधिक वाढू शकतो. ऑफिसमधल्या काही एटिकेट्सविषयी...

एटिकेट्स

* प्रत्येकाची वैयक्तिक स्पेस जपायला हवी. सहकाऱ्यांच्या खाजगी बाबीत फार लक्ष घालू नये. त्यांना वैयक्तिक प्रश्न विचारू नयेत. एखाद्या मैत्रिणीला मिठी मारणं आवडत असेल तर दुसरीला अशी जवळीक नको वाटत असेल. प्रत्येकाचं व्यक्तिमत्त्व वेगळं असतं. त्यामुळे ऑफिसमधल्या प्रत्येक सहकाऱ्याचं निरिक्षण करून त्यांच्यासोबत कसं वागायचं हे ठरवा.
* ऑफिस हे मैत्री करण्याचं उत्तम ठिकाण असतं. विविध विषयांवर गप्पा मारता येतात. मात्र काही विषय ऑफिसच्या भिंतींबाहेर ठेवणंच योग्य असतं. कोणत्याही जाती किंवा धर्मावर शेरेबाजी करू नका. वैयक्तिक अपमान होईल असे विनोद करू नका. वैयक्तिक अडचणींची चर्चा ऑफिसमध्ये नकोच. राजकीय, धार्मिक टिपणी टाळा. वरिष्ठांबाबतही फार चर्चा करू नका. यामुळे तुम्हाला कोणी कंटाळवाणं समजणार नाही तर जबाबदार कर्मचारी म्हणून तुम्ही ओळखल्या जाल.

* स्टार्ट अप्स, कॉर्पोरेट जगतात ड्रेसकोड्चं बंधन नसतं. पण फार कॅज्युअल कपडे घालू नयेत. ऑफिसमध्ये कपड्यांबाबत नियम नसले तरी आपण फार भडक दिसणार नाही याची काळजी घ्यावी. कपड्यांच्या निवडीमुळे तुमची प्रतिमा खराब होऊ शकते. वरिष्ठ, व्यवस्थापनावर चुकीचा प्रभाव पडतो. ही बाब पुरुष आणि महिला अशा दोघांनाही लागू पडते.
* स्मार्टफोनचा मोह टाळा. ऑफिसमध्ये गरजेपुरता फोन वापरा. मोबाईल डाटा बंद करून ठेवा. शक्य असेल तर फोन ड्रॉवरमध्ये ठेऊन द्या. फोन सायलंट मोडवर ठेवा. यामुळे तुमच्या सहकाऱ्यांना त्रास होणार नाही. तसंच कामंही झटपट होतील.

तंत्र फेस मास्क वापराचं

बाजारात विविध प्रकारचे फेस मास्क मिळतात. मात्र आपल्या गरजेनुसार आणि त्वचेच्या प्रकारानुसार त्याची निवड करायला हवी. फेस मास्क निवडताना कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यायला हवं याविषयी...

उद्देशानुसार फेस मास्कचा प्रकार बदलतो. म्हणजे त्वचेला ओलावा देण्यासाठी, मृत त्वचा काढण्यासाठी, त्वचा उजळवण्यासाठी वेगळा फेस मास्क वापरायचा असतो. त्यामुळे फेस मास्क लाऊन आपण काय साधणार आहोत, हे आधी समजून घ्या. त्वचेला ओलावा द्यायचा असेल तर मॉईश्चरायझिंगचे घटक असणाऱ्या फेस मास्कचा वापर करा. चेहरा उजळवायचा असेल तर क जीवनसत्त्व किंवा कॉजिक अॅसिडयुक्त फेस मास्क निवडा. मृत त्वचा काढण्यासाठी रेटिनॉल किंवा अ जीवनसत्त्व असणारा फेस मास्क विकत घ्या. फेस मास्कमधले प्रमुख घटकच त्यात शोषले गेलेले असतात. इतर फक्त नावालाच असतात. दुसरं म्हणजे फेस मास्ककडून वास्तववादी अपेक्षा ठेवा. त्यानुसार त्यातले घटक निवडा.

ब्युटी टॉक

कोरडी त्वचा असणाऱ्यांनी क्रीम किंवा शीट मास्क वापरावा. यामुळे तुमच्या त्वचेला अतिरिक्त ओलावा मिळतो. तेलकट त्वचा किंवा मुरुमांचा त्रास असेल मड किंवा क्ले मास्कची निवड करावी. यामुळे तुमचा चेहरा नितळ दिसू लागतो. क्ले मास्क अतिरिक्त तेल शोषून घेतो. पण त्याचा अतिवापर टाळावा. त्वचेवरची रोमछिद्र उघडण्यासाठी चारकोल फेसमास्क वापरता येईल. संवेदनशील त्वचा असेल तर नैसर्गिक घटकांनी बनवलेला फेस मास्क वापरा. मास्क चेहऱ्यावर फार वेळ ठेऊ नका. सुरूवातीला मास्क २० मिनिटं ठेवा. मग हळूहळू वेळ वाढवा. शीट किंवा नाईट मास्क आठवड्यातून एकदा वापरायचे असतात. हायड्रेटिंग मास्क आठवड्यातून तीन किंवा चार वेळा वापरता येतात. फेस मास्क वापरण्याआधी चेहरा क्लिंजिंग क्रीमने स्वच्छ धुवून घ्या. यामुळे चेहऱ्यावरची मृत त्वचा, धूळ निघून जाईल आणि फेस मास्क अधिक परिणामकारक ठरेल.

रिकाम्या पोटी काय खावं?

महिला फिटनेसच्या बाबतीत दक्ष झाल्या आहेत. उत्तम आरोग्यासाठी तसंच वजन कमी करण्यासाठी सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी पौष्टिक असं काहीतरी खाण्याचा सल्ला बरेच तज्ज्ञ देतात. काही धने-जिऱ्याचं पाणी प्यायला सांगतात तर काही लिंबू आणि मध घालून पाणी पिण्याचा सल्ला देतात. अशा वेळी सकाळी उठल्यानंतर नेमकं काय खावं, याबाबतचं मार्गदर्शन...

हेल्थ टॉक

* रात्री भिजवलेले मेथीदाणे सकाळी रिकाम्या पोटी चावून खा. यामुळे पोटाच्या तक्रारी आणि गुडघेदुखीची समस्या दूर व्हायला मदत होईल.
* फळांमध्ये तुम्ही सफरचंद खाऊ शकता. सफरचंदात क जीवनसत्त्व कमी प्रमाणात असलं तरी अँटीऑक्सिडंट्स आणि फ्लेवोनाइड्स भरपूर प्रमाणात असतात. रिकाम्या पोटी खाल्ल्याने सफरचंदातले हे घटक शरीरात उत्तम प्रकारे शोषले जातात.
* रिकाम्या पोटी दोन लसूण पाकळ्या चावून खा. यामुळे तुम्हाला भरपूर ऊर्जा मिळते. लसणातल्या औषधी घटकांमुळे अनेक विकारांपासून बचाव होतो.
* सकाळी उठल्यानंतर ओवा घातलेलं पाणी प्या. यामुळे पोटाचे विकार चार हात लांब रहातील. तसंच वजन कमी होण्यासोबतच मधुमेहालाही दूर ठेवता येईल. ओव्यामुळे हृदयविकारालाही आळा बसू शकतो. महिलांच्या आरोग्यासाठी ओवा गुणकारी समजला जातो.
* सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी चहा-कॉफी पिणं टाळा. चहापेक्षाही सकाळी कॉफी पिऊ नका. चहा-कॉफीमुळे शरीरात अॅसिडची निर्मिती होते. कॉफीतल्या कॅफेनमुळे पोटाचा अल्सर होऊ शकतो.
* रिकाम्या पोटी टॉमेटो खाऊ नये. यात अॅसिडचं प्रमाण जास्त असल्यामुळे त्रास होऊ शकतो.
* रताळंही रिकाम्या पोटी खाऊ नये. यातल्या पेक्टिन आणि टॅनिनसारख्या घटकांमुळे गॅस्ट्रिक अॅसिडची समस्या वाढते.
* सकाळी उठल्यानंतर अनेक जणी केळं खातात. मात्र हे चुकीचं आहे. केळ्यातलं मॅग्नेशियम शरीरातल्या कॅल्शियम आणि मॅग्नेशियमचं संतुलन बिघडवतं.
* रिकाम्या पोटी दही खाऊ नये. यामुळे पोटात गोळे येणं, पोटदुखी अशा समस्या उद्भवू शकतात.

माझं काही चुकतंय का?



आठ महिन्यांपूर्वी माझं लग्न झालं. आमचं अरेंज मॅरेज आहे. माझे पती आणि सासू-सासरे खूप प्रेमळ आहेत. पण मी वरचेवर माझ्या आईवडिलांना भेटू नये, असं माझ्या सासूबाईंचं मत आहे. माझं त्यांना भेटायला जाणं सासूबाईंना आवडत नाही. आमचं नुकतंच लग्न झाल्याने मी जास्तीत जास्त वेळ सासरी घालवावा असं त्यांना वाटतं. दुसरीकडे मला माझ्या आई-वडिलांची खूप आठवण येते आणि दर वीकेंडला त्यांना भेटण्याचा माझा प्रयत्न असतो. दुर्दैवाने सासरे आणि पतीचा सासूबाईंना पाठिंबा आहे. हे सर्व जण माझ्यात अपराधीपणाची भावना जागवत आहेत. मी काय करू?

– वैवाहिक जीवन प्रसंगी

समुपदेशन

आव्हानात्मक असू शकतं. पण तू काही गोष्टी करू शकतेस. आईवडिलांची आठवण येत असल्याचं तू पतीला स्पष्टपणे सांग. नव्या घरात रुळायला थोडा वेळ लागणार असल्याचंही त्यांना सांग. आधी तुझ्या अपेक्षा नवऱ्याला सांग. मग सासूबाईंशी मोकळेपणाने बोल. तुझ्या नव्या कुटुंबासोबत चांगला वेळ घालव. त्यांना समजून घे. यामुळे तुझे त्यांच्याशी चांगले संबंध प्रस्थापित होतील. एकमेकांना समजून घेणं सोपं जाईल. गरज लागली तर समुपदेशकांनाही भेट. आईवडिलांची आठवण येणं आणि त्यांना भेटायला जाणं यात काहीच गैर नाही. मुलगी म्हणून तू तुझी जबाबदारी पार पाडायला हवी. त्यामुळे अपराधीपणाची भावना मनातून काढून टाक.

रुग्णवाहिका चालकांच्या वेगांवर नियंत्रणाची गरज

रुग्णवाहिकांमुळे जीव वाचण्याऐवजी जीव गमावण्याची वेळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

शिक्रापूर : अपघात ग्रस्थांना तातडीची मदत मिळवून देण्यासाठी रुग्णवाहिका महत्वाची मानली जात असून रुग्णवाहिकेमुळे अनेकांना जीवदान मिळू शकते तर काहींना रुग्णवाहिकेमुळे जीव देखील गमवावा लागतो अशी स्थिती निर्माण झालेली असून पुणे नगर महामार्गावर रुग्णवाहिका चालकांच्या वेगांवर नियंत्रण आणण्याची गरज निर्माण झाली आहे.

अपघात समयी कोठही नागरिक प्रथम रुग्णवाहिकेशी संपर्क करुन रुग्णवाहिका बोलावून घेत अपघात ग्रस्ताला रुग्णालयात दाखल करत असतात त्यामुळे रुग्णवाहिका अत्यावश्यक सेवेत आहे, अनेकदा काही ठिकाणी अपघात झाल्यास रुग्णवाहिका चालकांच्या चढाओढ मुळे एकाच वेळी भरधाव वेगाने तीन चार रुग्णवाहिका सदर ठिकाणी दाखल होतात परंतु रस्त्याने अपघाताच्या दिशेने एक दोन रुग्णवाहिका चाललेल्या असल्याचे दिसून येत असताना सुद्धा काही रुग्णवाहिका चालक मोठ्या वेगाने समोरच्या रुग्णवाहिकेला ओहरटेक करुन समोर जाण्याचा प्रयत्न करतात अशातच अनेकदा रुग्णवाहिकांचे अपघात होतात, शिक्रापूर परिसरात दोन दिवसांपूर्वी नुकतेच एम एच १२ डब्ल्यू जे १७९५ या रुग्णवाहिकेच्या धडकेत दोघांचा जीव जाऊन पाच जण गंभीर झाल्याची घटना घडली तर यापूर्वी शिक्रापूर परिसरात पुणे नगर महामार्गावर एम एच १२ पी क्यू ७८८३ या रुग्णवाहिकेच्या धडकेत युवक जखमी झाला, एम एच १२ डी डब्ल्यू ६०७३ या रुग्णवाहिकेच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी झाले, तसेच अहमदनगर येथून गरोदर महिलेला घेऊन चालालेली एम एच १४ सि एल १०६० हि रुग्णवाहिका रस्त्यावर उलटून महिला जखमी झाली, तसेच एम एच १२ एस एफ ८९५० हि रुग्णवाहिका घेऊन जाणाऱ्या मध्यधुंद चालकाची युवकाला धडक बसून युवक जखमी झाला, तसेच एम एच १६ क्यू ८०५४ या रुग्णवाहिकेच्या धडकेत दुचाकीचालक ठार होऊन रुग्णवाहिकेचा चक्काचूर झाल्याच्या गंभीर घटना घडल्या आहेत, मात्र सर्व अपघात हे रुग्णवाहिका चालकांचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने झाल्याचे समोर आले असून अनेकदा काही ठिकाणी रुग्णवाहिका चालक मोठ्याने सायरनचा आवाज करत नागरिकांना त्रास होईल अशा पद्धतीचे कृत्य करत असतात, यापूर्वी पुणे नगर महामार्गावर अनेक रुग्णवाहिका चालकांचे रुग्णवाहिकेवरील नियंत्रण सुटून अपघात होऊन काही जणांना गंभीर दुखापत होऊन काहींना जीव गमवावा लागला, मात्र रुग्णवाहिका चालकाने नियमांचे पालन तसेच नियंत्रण ठेवून वाहन चालवले तर अपघात होणार नाही आणि जीव वाचवण्या ऐवजी जीव गमवायची वेळ देखील येणार नाही त्यामुळे रुग्णवाहिका चालकांनी वेगांवर नियंत्रण ठेवून नियमांचे पालन करण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

शिक्रापूर ता. शिरुर परिसरात पुणे नगर महामार्गावर झालेले रुग्णवाहिकांचे अपघात. (छायाचित्र – शेरखान शेख)

रुग्णवाहिका चालकांनी काळजी घ्यावी – ऋत्विक चौरे (किमया ॲम्बुलन्स सर्व्हिस)

● रुग्णवाहिका चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करुन, गर्दीवर नियंत्रण ठेवून विशेष खबरदारी घेत रुग्णवाहिका चालवणे गरजेचे असून त्यांनी स्वतःची देखील काळजी घ्यावी त्यामुळे नागरिकांना त्रास आणि काही अपघात होणार नाही असे किमया ॲम्बुलन्स सर्व्हिस समुहाचे ऋत्विक चौरे यांनी सांगितले.

● रुग्णवाहिका चालकांनी नियमांचे पालन करावे – मिलिंद देवरे (पोलीस हवालदार वाहतूक विभाग) रुग्णवाहिकांना अत्यावश्यक असल्यास काही नियमांमध्ये थोडीफार सूट आहे, मात्र रुग्णवाहिका चालकांनी सर्व नियमांचे पालन करणे गरजेचे आहे, महामार्गावर सर्व्हीस रोड नसल्याने मोठी गर्दी असते त्यामुळे कोठे अपघात झाल्यास त्यांनी काळजी घेऊन रुग्णवाहिका चालवणे गरजेचे असल्याचे वाहतूक विभागाचे पोलीस हवालदार मिलिंद देवरे यांनी सांगितले.

भिमराव यशवंत टिळेकर यांचे अपघाती निधन

उरुळी कांचन : थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक व टिळेकर वाडी

येथील रहिवासी भिमराव यशवंत टिळेकर (वय- ७३) यांचे शुक्रवारी सकाळी अपघाती निधन झाले. मिळालेल्या माहितीनुसार भिमराव टिळेकर हे सकाळी ट्रॅक्टर घेऊन शेतात गेले होते. शेतात जात असताना ट्रॅक्टर वरील त्यांचे नियंत्रण सुटले व ट्रॅक्टर त्या ठिकाणी पलटी झाला. दरम्यान, या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला.त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. भवरापूरचे पोलीस पाटील चंद्रकांत टिळेकर यांचे ते वडील होत. दरम्यान, टिळेकरवाडी येथील श्री दत्त सेवा ट्रस्टची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. तसेच काही दिवस ट्रस्टचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले होते. भिमराव टिळेकर यांच्या निधनाने उरुळी कांचन, टिळेकरवाडीसह भवरापूर परिसरावर शोक कळा पसरली.

कोरेगाव भीमात जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

शिक्रापूर : कोरेगाव भीमा ता. शिरुर येथील स्मशान भूमिजवळ आठवडे बाजाराचे कडेला सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांच्या पथकाने छापा टाकत कारवाई करुन रवींद्र गंगाराम साळवे व शाम हरीछंद्र रजपूत यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. कोरेगाव भीमा ता. शिरुर येथील स्मशान भूमिजवळ आठवडे बाजाराचे कडेला काही इसम नागरिकांकडून पैसे घेऊन सोरट नावाचा जुगार खेळवत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांना मिळाली त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र पानसरे, पोलीस हवालदार महेंद्र पाटील, अमोल दांडगे यांनी सदर ठिकाणी जाऊन छापा टाकला असता त्यांना दोन इसम जुगार खेळवत असताना दिसून आले, यावेळी पोलीस आल्याचे लक्षात येताच दोघे पळून जाऊ लागले मात्र पोलिसांनी त्यांना जागेवर पकडत जुगाराचे साहित्य व व रोख रक्कम जप्त करत दोघांना ताब्यात घेतले, याबाबत पोलीस हवालदार अमोल अंबादास दांडगे रा. शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी रवींद्र गंगाराम साळवे व शाम हरीछंद्र रजपूत दोघे रा. नाणेकर चाळ गुरुदत्त नगर पिंपरी पुणे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार उद्धव भालेराव हे करत आहे.

सोनिया-राहुल गांधी अडचणीत!

दिल्ली : सक्तवसुली संचालनालयाने (ED) नॅशनल हेराल्ड प्रकरणात काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि त्यांचे पुत्र लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी अडचणीत आले आहेत. त्यांच्याशी संबंधित असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (AJL) या कंपनीच्या ७०० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या मालमत्तेचा ताबा घेण्याची प्रक्रिया ईडी ने शनिवारी (१२ एप्रिल २०२५) सुरू केली आहे. या मालमत्तांमध्ये दिल्ली, मुंबई आणि लखनौ येथील प्रमुख व महत्त्वाच्या जागांचा समावेश आहे. यामध्ये राजधानी दिल्लीतील बहादूरशहा जफर मार्गावरील हेराल्ड हाऊस या प्रतिष्ठित इमारताचीही समावेश आहे. ईडीने सांगितले की, ही कारवाई AJL मनी लॉन्डरिंग प्रकरणाच्या अनुषंगाने केली जात आहे.

चॅटजीपीटी हे जगभरात प्रभावी चॅटबॉट

अमेरिका : ओपन एआयने विकसित केलेले चॅटजीपीटी हे जगभरात प्रभावी चॅटबॉट ठरले आहे. आता सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्राम, टिकटॉकला मागे टाकत ChatGPT हे जगातील सर्वाधिक डाउनलोड झालेले ॲप बनले आहे. ही आकडेवारी ॲप फिगर्सच्या रिपोर्टमधून समोर आली आहे. अमेरिकेतील एआय स्टार्टअप कंपनी 'ओपनएआय'ने त्यांचा 'चॅटजीपीटी' हा चॅटबॉट २०२२ मध्ये लॉंच केला होता. अल्पावधीतच चॅटजीपीटीने जनरेटिव्ह ए. आय. किती प्रभावी आहे हे जगाला दाखवून दिले.यूजर्समध्ये घिब्ली स्टाईल स्टुडिओ आर्ट तयार करण्याचा ट्रेंड व्हायरल झाला. यामुळे कोट्यवधी यूजर्स या ॲपकडे वळले. यामुळे चॅटजीपीटी ॲप विक्रमी संख्येने डाउनलोड करण्यात आले. "आमच्या अंदाजानुसार, मार्चमध्ये चॅटजीपीटी ४.६ कोटी (४६ दशलक्ष) वेळा डाउनलोड झाल्याचे दिसून आले. मार्चमधील हा आकडा इन्स्टाग्रामपेक्षा जरा जास्त आहे," असे ॲप फिगर्सने त्यांच्या अहवालात म्हटले आहे.

आळंदीतील आध्यात्मिक शिबिराची साधकांसाठी आगळीवेगळी पर्वणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

आळंदी : वारकरी संप्रदायातील महान संत ज्ञानेश्वर यांच्या वास्तव्याने पावन झालेल्या आळंदीच्या भूमीत प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या हिमालयीन समर्पण ध्यान योग शिबिराला भारतासह जगभरातून हजारो साधकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी देवाची, पुणे आणि श्री शिवकृपानंद स्वामी फाउंडेशन, गुजरात यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १० ते १२ एप्रिल २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले होती. सुमारे १५ ते २० हजार साधकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून आध्यात्मिक अनुभूती घेतली.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी दीपप्रज्वलन सोहळा आमदार अशोक पवार, डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील, ओडिशा पोलिस दलातील आयपीएस, महासंचालक अधिकारी श्री दीक्षित, संदीप पाटील, आयपीएस, पोलीस महानिरीक्षक, अति नक्षलविरोधी अभियान, महाराष्ट्र राज्य, श्री शिवकृपानंद स्वामी फाउंडेशनचे संचालक अंबरीश मोडक, चंदेली महाराज, जोग महाराज शिक्षण संस्थेचे सचिव यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीच्या पवित्र सान्निध्यात हिमालयातील गूढ आणि दिव्य चैतन्याचे दर्शन देणारे हे शिबिर, उपस्थित भक्तांसाठी अध्यात्मिक शांती, आत्मानुभूती आणि अंतर्मुखतेचा एक अद्वितीय प्रवास ठरले. गेली दोन दिवस हे आध्यात्मिक शिबिर साधकांसाठी अत्यंत आगळीवेगळी पर्वणी ठरले.



संतभूमीत हिमालयाचे चैतन्य :

● आळंदी सारख्या संतपरंपरेने पावन झालेल्या भूमीत हिमालयाच्या दिव्य ऊर्जेची अनुभूती देणारे हे शिबिर भक्तांच्या स्मरणात दीर्घकाळ रेखाटले जाईल, यात शंका नाही. हे शिबिर म्हणजे भक्तांसाठी एक आत्मिक पर्वणीच ठरली.

स्वामीजींचे प्रवचन आणि आध्यात्मिक संदेश :

शिबिरात श्री शिवकृपानंद स्वामीजींनी आपल्या प्रभावी वाणीने श्रोत्यांच्या अंतःकरणात आध्यात्मिक प्रकाश जागवला.

त्यांच्या प्रवचनातील काही मोलाचे संदेश:

- -"समाजातील विविध धर्म उपासना पद्धती आहेत, खरा धर्म मनुष्यधर्म आहे."
- -"परमात्मा ही विश्वचेतना आहे, जी निर्मळ माध्यमातून प्रकट होते. भारतात जिवंत परमात्म्याची -परिकल्पना गुरूच्या रूपात मान्य केलेली आहे."
- -"गुरु म्हणजे अंतर्मुखता देणारा दीपस्तंभ. जीवनात आध्यात्म्याचे बीज पेरले गेले तरच -सकारात्मक परिवर्तन शक्य आहे."
- -"ध्यान म्हणजे वर्तमानात राहणे, अपेक्षांविना जगणे. नियमित ध्यान साधनेने जीवनातील सर्व -समस्या दूर होऊ शकतात."
- -प्रवचनाच्या समाप्तीला स्वामीजींनी "मैं एक पवित्र आत्मा हूँ, मैं एक शुद्ध आत्मा हूँ" या मंत्राद्वारे सर्व साधकांकडून सामूहिक ध्यान करून घेतले.

"समेवर येताना" काव्य संग्रहाचे शानदार प्रकाशन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

सासवड : ग्रामीण जीवन, शेती, माती, नाती यांवर भावस्पर्शी लेखनातून भाव उलगडणाऱ्या कवी अनिल कदम यांच्या समेवर येताना या कविता संग्रहाचे प्रकाशन

सासवड येथील कन्हाबाई मंदिरात संपन्न झाले. जेष्ठ समाजवादी नेते रावसाहेब पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला रानकवी हनुमंत चांदगुडे, सासवड साहित्य परिषद अध्यक्ष ॲड दिलीप निरगुडे, राष्ट्रपती पदक विजेते नंदकुमार सागर, उद्योजक मच्छिंद्र कुंभारकर व ज्येष्ठ कवी चंद्रकांत चाबुकस्वार प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते.

कविता संग्रहातील पाऊस,भोग व कविता यांचे डॉ ऋता खांडेकर, कल्पना नागनुर व स्नेहल देशपांडे यांनी केलेले वाचन यामुळे प्रकाशन सोहळा विशेष लक्षवेधी ठरला. अनिल कदम यांनी प्रास्तविकात माझ्या कवितेला सांभाळणाऱ्या सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. ॲड दिलीप निरगुडे, नंदकुमार सागर, मच्छिंद्र कुंभारकर, प्रा सुभाष तळेकर, हेमंत ताकवले, हनुमंत चांदगुडे दिलीप वाल्हेकर शंकर कसबे यांनी अनिल कदम यांच्या काव्य प्रवासासाठी मनोगतातून शुभेच्छा दिल्या. वहिवरची कविता पुस्तकात येते तेव्हा तीच अस्तित्व निर्माण होते अशा शब्दांत कवी हनुमंत चांदगुडे यांनी मनोगत व्यक्त केले. चंद्रकांत चाबुकस्वार यांनी आई माझी रुक्मिणी बाप पांडूरंग व जाणीव या रचना सादर करत रसिकांच्या टाळ्या मिळवल्या. अध्यक्षीय भाषणात रावसाहेब पवार यांनी ग्रामीण भागातील साहित्यिक कवितेच्या रूपाने पुढे येत आहेत ही चांगली बाब असुन आपली मराठी भाषा संवर्धन करत असल्याचा अभिमान आहे असे सांगितले. आजच्या लेखक, कवींना स्वतःच्या खर्चातून पुस्तके छापून घ्यावी लागतात याबद्दलची खंतही पवार यांनी बोलून दाखवली.

डॉ किरण गाढवे यांनी सुत्रसंचालन केले तर डॉ नीलेश जगताप यांनी उपस्थितांचे आभार मानले. मोहन बागडे संजय काटकर, कल्याणी चिंबळकर, रेश्मा कामथे ,अमोल बागडे, नसरीन अन्सारी, अमोल बेलसरे क्षितीज निरगुडे यांसह पुरंदर कलामंचच्या सदस्यांनी या देखण्या कार्यक्रमाचे आयोजन केले.

ॲड अण्णासाहेब खाडे, कुंडलिक मेमाणे, आबा बागडे, हितेंद्र गद्रे, सुनिल चौधरी, किरण पुरंदरे, सुधाकर जगदाळे, दत्ता कड, वसंतराव ताकवले, संगीता कड, तानाजी सातव, भालचंद्र बुधकर, संदिप इनामके, इंदिरा पवार यांसह मोठ्या संख्येने साहित्यप्रेमी या प्रसंगी उपस्थित होते.

विमानतळ प्रकल्प बाधित ग्रामस्थांचा शासनाच्या बैठकीवर बहिष्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

सासवड : पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, पारगाव, एखतपूर, मुंजवडी, खानवडी, कुंभारवळण अशा सात गावांमध्ये शासनाने विमानतळ प्रकल्प करण्याचे जाहिर केल्यानंतर त्यादृष्टीने कामांचा सपाटा लावला आहे. नागरिकांचे मतपरिवर्तन करणे तसेच शासनाची भूमिका मांडणे आणि स्थानिक नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी प्रत्येक गावात बैठकांचा धडाका सूर करण्यात आला आहे. मात्र स्थानिक ग्रामस्थांनी त्यास तीव्र विरोध केला असून शासकीय अधिकाऱ्यांच्या बैठकीवर बहिष्कार टाकला आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांना कोणत्याही चर्चेविना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे.

मागील पंधरवड्यात शासनाने विमानतळ प्रकल्पांतर्गत येणाऱ्या सातही गावांचा ड्रोन सर्व्हे करण्यासाठी निविदा प्रसिद्ध केली होती. त्यानंतर आता पुन्हा नव्याने जमिनीवरील सर्व्हे करण्यासाठी निविदा प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे एकीकडे पाऊल टाकत असतानाच दुसरीकडे शासकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून चर्चेचे दरवाजे उघडे करण्यात आले आहेत. त्यासाठी गावोगावी बैठकांचा धडाका लावण्यात आला आहे.

भूसंपादन विभागाचे उपजिल्हाधिकारी कल्याण पांढरे, पुरंदरच्या प्रांताधिकारी वर्षा लांडगे, भोर विभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे, पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी, भूमी अभिलेख अधीक्षक स्मिता गौड तसेच यांच्यासह नायब तहसीलदार, विविध विभागांचे अधिकारी पोलीस फौजफाटा घेवून प्रत्येक गावात आढावा घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. मागील आठवड्यापूर्वी सुरुवातीला एखतपूर - मुंजवडी गावात बैठक घेतली. त्यास नागरिकांनी उपस्थिती दाखवीत जमीन देण्यास नकार दिला होता.

त्यानंतर सासवड येथे तीन दिवसांचे उपोषण केले होते. अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने उपोषण मागे घेतले. तसेच जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याशी चर्चाही केली मात्र त्यामधून कोणतेच सामाधान झाले नाही त्यामुळे विरोधाची भूमिका कायम ठेवण्यात आली. दरम्यान वनपुरी येथे आयोजित केलेल्या बैठकीत अपवाद वगळता नागरिकांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच शनिवारी १२ रोजी खानवडी आणि कुंभारवळण येथे बैठक आयोजित केली मात्र गावातील तिकडे फिरकले नसल्याने अधिकाऱ्यांना पुन्हा रिकाम्या हाताने परतावे लागले आहे.

कुंभारवळण येथे ग्रामस्थांच्या प्रतीक्षेत असलेले शासकीय अधिकारी.

पान १ वरून

रायगड प्रेरणास्थळ...

बोर्डाची स्थापना करावी. म्हणजे एखाद्या कल्पनेतून कादंबरी होते. पण त्याला ऐतिहासिक पुरावे नसतात. त्यामुळे अलिकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज आदी युगपुरुषांबाबत गैरसमज निर्माण केले जात आहेत. त्यामुळे एका सेन्सॉर बोर्डाची निर्मिती करावी.

पालकमंत्री पदाचा तिढा कायम : "छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा दर्जासाठी कशा प्रकारे समावेश होईल? यासाठी आमची चर्चा झाली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्वांचा अगदी खेळीमेळीच्या वातावरणात संवाद होता. अमित शाह यांची ही भेट कौटुंबिक होती, राजकीय नाही. या भेटीत अमित शाह यांच्याबरोबर मनमोकळेपणाने चर्चा झाली. तसेच अमित शाह यांच्या जेवणात महाराष्ट्रीयन पदार्थांचा समावेश होता", असे सुनील तटकरे म्हणाले.

जम्मू-काश्मीरमध्ये मोठी...

आल्यानंतर भारतीय सुरक्षा दलांनी गोळीबार केला. दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत लष्कराचा एक अधिकारी शहीद झाला. त्यानंतर संपूर्ण परिसराला घेराव घालण्यात आला. अतिरिक्त सैन्य तैनात करुन शोध मोहीम त्वरीत सुरू आहे. याच भागात ११ फेब्रुवारी रोजी दहशतवाद्यांनी केलेल्या आयईडी स्फोटात एका कॅप्टनसह दोन लष्करी जवान शहीद झाले होते.

'वृक्षपुरुष' हरपला; पद्मश्री...

यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. त्यांच्या निधनाने समाजाचे कधीही भरून न येणारे नुकसान झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. निसर्ग आणि पर्यावरणाशिवाय मानवजातीचे अस्तित्व अशक्य आहे.

जाहीर निवेदन

तमाम लोकांना या निवेदनाद्वारे कळविण्यात येते की, मी नीता वासुदेव शिंदे रा. सर्वे नंबर ५, पीडीसीसी बँकजवळ, केशवनगर, मुंढवा, पुणे ४११०३६ या ठिकाणी राहत असून, माझे पती वासुदेव सिताराम शिंदे यांच्या नावावर MH 12KE5865 अल्टो 800 एल एक्स आय सीएनजी बी एस आय व्ही तिचा इंजिन नंबर FBDN5078925 व चासी नंबर MA3EUA61SOO293815 रजिस्ट्रेशन झाल्याची तारीख २०/०९/२०१३ आहे. ही कार गाडी माझे पती वासुदेव सिताराम शिंदे त्यांच्या नावावर होती, त्यांचे निधन झाल्यामुळे त्यांचे वारसदार म्हणून त्यांच्या पत्नी नीता वासुदेव शिंदे त्यांचा आधार नंबर 815056404644 असा आहे. त्यांच्या पाठीमागे मुलगा सुन आहेत त्यांनी आम्हाला वारस नोंद म्हणून गाडी माझ्या नावावर करण्यासाठी सहमती दिलेली आहे. यात काही बदल नाही माझ्या नावावर म्हणजेच नीता वासुदेव शिंदे यांचे नावे करावी.

शिक्का

सही
नीता वासुदेव शिंदे
केशवनगर
मुंढवा, पुणे ३६
मोबाईल नंबर : ९७६२१४२११५

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेला फ्लॅट **मेघवर्षा को-ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड** या सोसायटी चे सभासद म्हणून **श्री. अनंत मोरेश्वर चितळे व सौ. मिना अनंत चितळे** रा. पुणे यांनी धारण केलेला असून, तो निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याचा भरवंसा देवून, आता सदर फ्लॅट आमचे अशिलांस कायमखुष खरेदीने देण्याबाबत वाटाघाटी चालू केलेली आहे. तरी सदर फ्लॅट वर कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबध व अधिकार असल्यास त्यांनी सदर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसांत आमची खालील पत्यावर समक्ष भेट घेवून कागदपत्रांसह खात्री करुन द्यावी व तशी लेखी पोहोच घ्यावी, अन्यथा सदर फ्लॅट वर कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीव पूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार करतील. तदनंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, कृपया यांची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

तुकडी पुणे, पोट तुकडी व तालुका हवेली, मा. दुय्यम निबंधक हवेली यांचे कार्येक्षेत्रातील तसेच पुणे महानगरपालिका यांचे हददीतील मौजे वारजे येथील सर्व्हे नं. 119 / 2 व 119 / 3 या मिळकतीवर उभ्या असलेल्या **मेघवर्षा को-ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड** या सोसायटी मधील इमारत क्र. अ मधील सातव्या मजल्यावरील फ्लॅट नं. 702 यांसी क्षेत्र 97.37 चौ.मी बिल्टअप व टेरेस क्षेत्र 25.63 चौ. मी. बिल्टअप व कार पार्किंग नं. 50 यांसी क्षेत्र 8.92 चौ.मी तसेच इतर समाईक सुखसुविधांसह काही एक राखुन न ठेवता.

ठिकाण :- पुणे

दिनांक :- १३/०४ /२०२५

शिक्का

चेतन गांधी, ॲडव्होकेट
7/ ए,
अत्रेय को.ऑपरेटीव्ह
हौसिंग सोसायटी, गोखलेनगर
रोड, ऑफ सेनापती बापट रोड,
शिवाजीनगर, पुणे : 411016
मो.नं. 9822281577

जागतिक पातळीवर अमेरिका निर्विवाद महासत्ता आहे. त्यांचे डॉलर हे चलन जागतिक व्यापारामध्ये महाशक्तिमान आहे. अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या दुसऱ्या कारकिर्दीमध्ये सुरु केलेले जागतिक पातळीवरील "टॅरिफ युद्ध" अंगलट येण्यास प्रारंभ झाला असून ही स्थिती महाशक्तिमान अमेरिका व डॉलरच्या अंताचा प्रारंभ करणारी ठरू शकते. यामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य परिस्थितीचा घेतलेला हा वेध.

महाशक्तिमान 'अमेरिका 'व 'डॉलरच्या' अंताचा प्रारंभ?

आर्थिक
प्रा. नंदकुमार काकिर्डे
राष्ट्रसंचार

अमेरिका जागतिक पातळीवर एक महान लोकशाही मूल्य असणारा व आर्थिक दृष्ट्या शक्तिशाली महासत्ता आहे यात शंका नाही. विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या दुसऱ्या कारकिर्दीच्या प्रारंभीच पूर्वी घोषित केल्यानुसार 'अमेरिका फर्स्ट' हे धोरण राबवण्यास प्रारंभ केला. हे करताना त्यांनी नुकतेच अनाकलनीय 'टॅरिफ युद्ध ' घोषित केले. अर्थात हे युद्ध एकांगी अमेरिकन धोरणाचा परिपाक असून त्यांच्याच अर्थव्यवस्थेचे धिंडवडे उडवणारे ठरणार आहे. या घटनेनंतर अमेरिकेसह जागतिक पातळीवरील सर्व प्रमुख शेअर बाजार गेल्या काही दिवसात साफ कोसळले. अमेरिकेतील विविध राज्यांमध्ये जागोजागी ट्रम्प अर्थव्यवस्थेबद्दल नाराजी व आंदोलने करण्यात आली. एवढी प्रतिकूल परिस्थिती निर्माण केल्यानंतर ट्रम्प महाशयांना थोडीशी जाग आल्याने त्यांनी स्वतःच्याच आदेशाला ९० दिवसांची स्थगिती दिली. त्यामुळे सर्व शेअर बाजारांची होणारी घसरण काही प्रमाणात थांबली व त्यात थोड्या प्रमाणात सुधारणा होत असल्याचे दिसले.

अत्यंत गर्विष्ठ,हट्टी, एकाधिकारशाहीचा बादशहा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या विक्षिप्त अध्यक्षाच्या आगामी चार वर्षाच्या काळात अमेरिकेच्या वर्चस्वाचा अंत होण्यास प्रारंभ होण्याची दाट शक्यता आहे. त्याचप्रमाणे जागतिक पातळीवरील विविध चलनांमध्ये असलेले डॉलरचे महत्व हळूहळू कमी होताना दिसणार आहे. त्यामुळेच जगभरातील सर्व देश म्हणजे युरोपातील प्रत्येक देश, चीन व अन्य काही देश या एकतर्फी टॅरिफ युद्धामुळे होरपळले जाण्याची शक्यता आहे. त्याचवेळी चीन सारखी जागतिक पातळीवरील दुसरी बलाढ्य शक्ती अमेरिकेला जशास तसे उत्तर देण्यास तयार असून त्यांनी युरोपियन महासंघाची दोस्ती करण्याची चाचपणी सुरू केलेली आहे. शत्रूचा शत्रू हा नेहमीच व्यापार व्यवसायात मित्र असतो. चीनच्या सत्ताधीशांनी हे गमक ओळखलेले असून गेले काही दिवस त्यांनी अमेरिकेच्या सर्व व्यापारी शत्रूंना चुचकारण्यास प्रारंभ केलेला आहे. जर ट्रम्प बाबाने त्याचा हेका सोडला नाही व अमेरिकेला मातीत घालण्याचाच निर्णय कायम केला तर मात्र आगामी काळामध्ये संपूर्ण जग एका बाजूला व अमेरिका एका बाजूला पडण्याची दाट शक्यता आहे. ही परिस्थिती लक्षात घेतली तर अमेरिकेच्या महासत्तेच्या वर्चस्वाला निश्चित धक्का पोहोचणार आहे. अमेरिकेची मस्ती ही आज त्यांचे डॉलर हे चलन अत्यंत बळकट व जागतिक व्यापारातील महत्त्वाचे चलन असल्याने निर्माण झाली आहे. परंतु एकदा का अन्य सर्व देशांनी एकवटून या डॉलरची वाट लावायचे ठरवले तर त्याला फार काळ लागणार नाही. खुद्द अमेरिकेची आर्थिक परिस्थिती या टैरिफ युद्धामुळे बिकट होत जाणार असून त्यांच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होणार आहे यात शंका नाही.

१९५६ मध्ये सुवेझ कॅनॉल संकटामध्ये इंग्लंडचे पौंड चलन कायमचे हरले त्याच मार्गावर आत्ताचा अमेरिकन डॉलर जात आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनेही गेल्या वर्षी एका अहवालात मध्यवर्ती बँका व सरकारच्या गंगाजळीत डॉलरचे प्रमाण घटत असल्याचे स्पष्टपणे नमूद केले होते. डॉलर ऐवजी या बँका सोन्यामध्ये गुंतवणूक वाढवत आहेत. अमेरिकेने सातत्याने रशिया, क्युबा, चायना व अन्य देशांवर आर्थिक निर्बंधांचे शस्त्र मनमानी करून वापरले आहे. त्याचा परिणाम डॉलरच्या व्यवहारांवर होत आहे. एवढेच नाही तर अमेरिकेचे एकूण कर्ज आणि अंदाजपत्रकातील तूट लक्षणीय रित्या वाढत आहे. ती मर्यादेच्या बाहेर गेल्याचेही स्पष्ट झाले आहे. अमेरिकन अर्थव्यवस्थेला हा भार परवडणारा नाही. जगभरात आर्थिक व्यवहार पूर्ण करण्याच्या अद्ययावत व नवनव्या तंत्रज्ञानामुळे 'डॉलर बाजाराच्या' बाहेर व्यापारी व्यवहार पूर्ण होत आहेत. ही डॉलर साठी धोक्याची घंटा आहे.

एका बाजूला अमेरिका फर्स्ट हे जरी ब्रीदवाक्य चांगले वाटले तरी आज अमेरिकेतील सर्व ग्राहक वर्ग हा आयात केलेल्या उत्पादनांवर अवलंबून आहे. अमेरिकेत खुद्द उत्पादनाची असलेली गुणवत्ता, पातळी, व प्रमाण हे अत्यंत प्रतिकूल आहे. तेथील कामगार वर्ग उत्पादकतेमध्ये अकार्यक्षम आहे एवढेच नाही तर तेथील ग्राहकांमध्ये परदेशी वस्तूंचे विशेषतः युरोपातील व चीनमधील उत्पादनांचे मोठ्या प्रमाणावर आकर्षण आहे. या टॅरीफ युद्धामुळे त्यांची आयात प्रचंड महाग होणार असल्यामुळे तेथील ग्राहकांना जास्त भुर्दंड पडणार आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणामुळे अमेरिकेतील स्थानिक उद्योगांना संरक्षण देण्याचा हा एक प्रयत्न आहे. यामुळे अनुचित व्यापार प्रथांना बराचसा आळा बसण्याची शक्यता आहे व त्याद्वारे स्थानिक उत्पादनाला व नोकऱ्यांना प्राधान्य देण्याची विद्यमान अध्यक्षांची कल्पना आहे. एवढेच नाही तर अमेरिकेत आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवर लादण्यात येणाऱ्या एकतर्फी आयात शुल्कामुळे अमेरिकेच्या महसुलामध्ये प्रचंड वाढ होणे अपेक्षित आहे. अशी वाढ झाली तर त्यामुळे तेथील नागरिकांकडून बसून जाणाऱ्या कराचे प्रमाण कमी होऊ शकते आणि सार्वजनिक कार्यक्रमासाठी चांगला निधी उपलब्ध होऊ शकतो. एवढेच नाही तर या वाढवलेल्या आयात शुल्कामुळे अमेरिका प्रत्येक देशाची व्यापार करार करताना अमेरिकेचा लाभ कसा वाढेल यावरच लक्ष केंद्रित करेल. परिणामतः अमेरिकेतील आयातीवर होणारा खर्च हा लक्षणीय रित्या कमी होऊ शकतो.

एका बाजूला काही अनुकूल गोष्टी जाणवत असल्या तरी अमेरिकेतील ग्राहकांना आयात करण्यात आलेल्या उत्पादनामुळे महागाईला तोंड द्यावे लागेल. विशेषतः आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये जे व्यवसाय व व्यापार अवलंबून आहेत त्यांना या टॅरिफ युद्धाचा मोठा फटका बसणार आहे. एवढेच नाही तर आज अमेरिकेतून अनेक देशांमध्ये निर्यात केली जाते. चीन सारख्या महाशक्तीने जशास तसे म्हणून अमेरिकेने जेवढे टेरिफ लावले आहे तेवढेच टेरिफ चीनने अमेरिकेवर लावलेले आहे. चीनने गेल्या काही महिन्यात त्यांचे 'डिजिटल करन्सी युवान' चलन व्यवहारासाठी पंधरा-सोळा देशांबरोबर सुरु केलेले आहे. यामुळे अमेरिका प्रणित चलन व्यवहाराची स्विफ्ट पद्धतीला बगल देता आलेली आहे. अमेरिकेवरील विश्वास ढासळण्यास प्रारंभ झाला असल्याने त्याचा प्रतिकूल परिणाम त्यांच्या अर्थव्यवस्थेवर होणार आहे ही काळ्या दगडावरची रेघ आहे. यामुळेच नव्या जागतिक व्यापार युद्धाची ठिणगी पडणार असून त्यामुळे जागतिक पातळीवरील पुरवठा साखळी आणि आर्थिक विकास यावर प्रतिकूल परिणाम होणार आहे. भारताचा विचार करायचा झाला तर आपल्या एकूण निर्यातीपैकी १८ टक्के निर्यात ही केवळ अमेरिकेत होते. या युद्धामुळे ही टक्केवारी कमी होईल व आपली अमेरिकेतील निर्यात मार खाईल अशी शक्यता आहे. गेले दोन महिने अमेरिका व भारत यांच्या दरम्यान व्यापार विषयक चर्चा सुरू आहे त्याच्यावरही प्रतिकूल परिणाम होऊ शकतो व आपले व अमेरिकेचे संबंध काही प्रमाणात ताणले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. भले मोदी आणि ट्रम्प हे मित्र असले तरी ट्रम्प यांचा आजवरचा इतिहास एककल्लीपणा, हट्टी स्वभाव लक्षात घेता ते कितपत मुरुड घालतील हे आगामी काही महिन्यातच लक्षात येऊ शकते.

ट्रम्प यांनी जरी त्यांच्या आदेशाला ९० दिवसाची स्थगिती दिलेली असली तरी संबंधित सर्व राष्ट्रांनी अमेरिकेबरोबर वाटाघाटी करून नवीन व्यापार यंत्रणा निर्माण करावी अशी त्यांची अपेक्षा आहे. यामुळेच जागतिक पातळीवरील व्यापारामध्ये अस्थिरता आणि अनिश्चितता निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. याचा प्रतिकूल परिणाम एकूण गुंतवणूक आणि आर्थिक प्रगती यावर होऊ शकते. गेल्या काही दिवसात सोन्यात चांदीच्या दारात झालेली घसरण व अमेरिकेच्या कर्जरोख्यांची उडालेली दाणादाण लक्षात घेतली तर अमेरिकन रोख्यांचा सर्वाधिक साठा असलेला चीन अमेरिकेचे नाकच नाही तर गळा ही दाबू शकतो हे लक्षात घेणे आवश्यक आहे. चीनच्या कृतीमुळे अमेरिकन रोख्यांची बाजारपेठ हेलकावे खाऊ शकते व त्याचा परिणाम गुंतवणूकदारांवर होऊ शकतो हे गेल्या दोन-तीन दिवसात लक्षात आले आहे. चीन त्यांची गुंतवणूक अन्य देशांकडे वळवू शकते व अन्य जागतिक चलनामध्ये ते गुंतवणूक करू शकतात. असे झाले तर डी डॉलरिझेशनच्या म्हणजे डॉलर चे महत्व कमी होण्याच्या प्रक्रियेस चालना मिळू शकते. अर्थात जागतिक व्यापार हा अत्यंत गुंतागुंतीचा विषय आहे त्यात प्रत्येक देशाचे लष्करी व आर्थिक सामर्थ्य लक्षात घेण्याची गरज आहे. रशिया व युक्रेन यांच्या युद्धाचे चटके जगाला बसलेले आहेत. अशा प्रतिकूल परिस्थितीत डोनाल्ड ट्रम्प यांनी माथेफिरूसारखे नजीकच्या काळात चीनवर आर्थिक निर्बंध घातले तर अमेरिकन महासत्तेचा व डॉलरच्या मस्तीचा अंत होण्यास फार वेळ लागणार नाही. त्यासाठी पुढील अध्यक्षांची वाट पाहण्याची अमेरिकेवर वेळ येणार नाही.

भारतावरही प्रतिकूल परिणाम

या टॅरिफ युद्धाचा भारतावरही लक्षणीय प्रतिकूल परिणाम होणार आहे. यात शंका नाही कारण आपला व अमेरिकेचा आयात निर्यात व्यापार हा लक्षणीय आहे. आपल्या निर्यातीवर या अतिरिक्त टॅरिफचा निश्चित परिणाम होणार आहे.विशेषतः औषध निर्मिती, वाहन उद्योग, पोलाद व कॉपर या चार उद्योगांना त्याचा फटका बसणार आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आज दुसरी आर्थिक महासत्ता असलेल्या चीनला शिंगावर घेणे हे ट्रम्प ना परवडणारे नाही. एवढेच नाही तर युरोपातील बहुतेक सर्व राष्ट्रांची त्यांचे संबंध बिघडत असल्यामुळे एकाच वेळेला अनेक शत्रू निर्माण करण्याची ऐतिहासिक कामगिरी ट्रम्प यांनी निर्माण केली आहे.

शुल्कवाढीचा भूकंप, अमेरिकेतही तरंग

ट्रम्पशाहीमुळे अलिकडेच अवघ्या जगाची झोप उडाली. भारताच्या अर्थव्यवस्थेवर या नव्या व्यापारयुद्धाचा कसा परिणाम होणार, याची चर्चा सुरु झाली. मात्र भारताप्रमाणेच अमेरिकेवरही ताज्या शुल्कवाढीचा परिणाम झाला असून नागरिकांनी तिथे वस्तू खरेदी करण्यासाठी गर्दी केल्याची परिस्थिती पहायला मिळाली. या लक्षवेधी बातम्यांप्रमाणेच 'रिलायन्स'ने 'गुगल'ची झोप उडवल्याची बातमीही बहुचर्चीत ठरली.

आंतरराष्ट्रीय
महेश देशपांडे,
अर्थतज्ञ
राष्ट्रसंचार

सरत्या आठवड्यात अनुभवायला मिळालेल्या ट्रम्पशाहीमुळे अवघ्या जगाची झोप उडाली. त्यानंतर भारताच्या अर्थव्यवस्थेवर या नव्या व्यापारयुद्धाचा कसा परिणाम होणार, याची चर्चा सुरु झाली. मात्र भारताप्रमाणेच अमेरिकेवरही ताज्या शुल्कवाढीचा परिणाम झाला असून नागरिकांनी तिथे वस्तू खरेदी करण्यासाठी गर्दी केल्याची परिस्थिती पहायला मिळाली. या लक्षवेधी बातम्यांप्रमाणेच 'रिलायन्स'ने 'गुगल'ची झोप उडवल्याची बातमीही बहुचर्चीत ठरली.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यापार भागीदारांवर शुल्क लादल्यामुळे जागतिक अनिश्चितता वाढत आहे. त्यामुळे भारताच्या सर्वात मोठ्या निर्यात बाजारपेठेतील संभाव्य मंदीची चिंता वाढली आहे. त्याचा परिणाम भारताच्या आर्थिक वाढीवरही होऊ शकतो. या आर्थिक वर्षात भारताची आर्थिक वाढ 2026 च्या कमी श्रेणीच्या जवळपास असेल, अशी आशा वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. एका अधिकाऱ्याने सांगितले, की आम्हाला विकास दर 6.3 ते 6.8 टक्क्यांच्या दरम्यान राहण्याची अपेक्षा आहे. तथापि, ते कमी मर्यादेच्या जवळ राहण्याची शक्यता जास्त आहे. आणखी एका अधिकाऱ्याने सांगितले की मागणी कमी होत असताना अमेरिकेत प्राप्तिकर कपातीचे आश्वासन काही प्रमाणात दिलासा देऊ शकते. ते म्हणाले की इंधनाच्या कमी किमती हीदेखील भारताच्या विकासासाठी चांगली बातमी आहे. सध्या ब्रेंट क्रूड घसरून प्रति पिंप 65 डॉलरच्या खाली आले आहे. क्रूडची ही किंमत जवळपास चार वर्षांमध्ये सर्वात कमी आहे. 'गोल्डमन सॅच'ने 2025 साठी ब्रेंट क्रूडच्या सरासरी किंमतीचा अंदाज प्रति पिंप 69 डॉलरपर्यंत कमी केला आहे. 'जे. पी मॉर्गन चेस अँड कंपनी'ने सांगितले की अमेरिकेची अर्थव्यवस्था या वर्षी मंदीत जाण्याची शक्यता आहे. बँकेचे मुख्य अर्थशास्त्रज्ञ मायकेल फेरोली यांनी सांगितले की, आम्ही अमेरिकेचा जीडीपी टॅरिफमुळे कमी होण्याची अपेक्षा करतो आणि संपूर्ण वर्षासाठी वास्तविक जीडीपी वाढ -0.3 टक्के अपेक्षित आहे.

अर्थशास्त्रज्ञांनी अंदाज वर्तवला आहे की 2025-26 या आर्थिक वर्षामध्ये भारताच्या विकासदरावर 30 ते 60 बेस पॉइंट्सचा परिणाम संभवतो. एचडीएफसी बँकेच्या मुख्य अर्थतज्ज्ञ साक्षी गुप्ता यांनी सांगितले की 2026 साठी 6.6 टक्के वाढीच्या अंदाजात परिस्थिती 30 बेसिस पॉईंट घसरण्याचा धोका आहे. आमचा अंदाज मुख्यत्वे देशांतर्गत मागणी परिस्थितीतील सुधारणांवर अवलंबून आहे. यासाठी पुढे आर्थिक आणि वित्तीय समायोजन हे दोन्ही वाढवावे लागेल. देशांतर्गत मागणीमध्ये मजबूत पुनर्प्राप्ती नसल्यास किंवा जागतिक अर्थव्यवस्थेत अधिक तीव्र मंदी नसल्यास आम्हाला 2025-26 साठी आमचा विकास दर अंदाज लक्षणीयरीत्या कमी करावा लागेल. ट्रम्प यांच्या प्रत्युत्तर शुल्काच्या घोषणेपूर्वी अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या नवीनतम मासिक आर्थिक आढाव्यात म्हटले आहे की भौगोलिक राजकीय तणाव, व्यापार धोरणांमधील अनिश्चितता, आंतरराष्ट्रीय वस्तूंच्या किमती आणि आर्थिक बाजारातील अस्थिरता वाढीच्या संभाव्यतेसाठी महत्त्वपूर्ण जोखीम निर्माण करतात. त्यात म्हटले आहे की खासगी क्षेत्राने भारतीय अर्थव्यवस्थेत गुंतवणूक वाढवली तर जोखीम बऱ्याच प्रमाणात नियंत्रित करता येऊ शकते. अहवालात म्हटले आहे की वैयक्तिक प्राप्तिकर रचनेतील बदलामुळे मध्यमवर्गाला अधिक डिस्पोजेबल उत्पन्न मिळेल. त्यामुळे उपभोगाची मागणी सुधारेल अशी अपेक्षा आहे.

अमेरिकेची अर्थव्यवस्था धोक्यात

दरम्यान, अमेरिकेत आजकाल खरेदीसाठी प्रचंड गर्दी होत आहे. फर्निचरपासून उपकरणे आणि दारूपर्यंत मोठ्या प्रमाणात खरेदी केली जात आहे. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शुल्कवाढीच्या धोरणामुळे घाबरलेल्या लोकांच्या मनात महागाईची भीती शिरली आहे. त्यामुळे लोक किमती वाढण्यापूर्वी वस्तू खरेदी करून साठेबाजी करत आहेत. वाढीव शुल्कामुळे दैनंदिन वस्तूंच्या किमती वाढण्याची अपेक्षा असल्याचे अर्थतज्ज्ञांचे मत आहे. अमेरिकेची अर्थव्यवस्था मंदीत जाण्याची भीती काही अर्थतज्ज्ञ व्यक्त करत आहेत. वाहन विक्री 11.3 टक्क्यांनी वाढली आहे. कारण ट्रम्प यांनी परदेशी वाहने आणि ऑटो पार्टसवर 25 टक्के दर लागू करण्याची घोषणा करताच, डीलरशिपवर लोकांची गर्दी झाली आहे. क्वीन्स, न्यूयॉर्क येथे राहणारे 50 वर्षीय नोएल पेग्युरो म्हणाले की, गेल्या आठवड्यात त्यांनी कारचे भाग, इलेक्ट्रॉनिक्स आणि बागकामाच्या वस्तूंवर सुमारे 3,500 डॉलर खर्च केले. त्यांनी आपल्या मुलासाठी 40 इंचाचा हायसेन्स टेलिव्हिजन आणि मॅकबुक लॅपटॉपदेखील विकत घेतला. ते अनेक दिवसांपासून या वस्तू खरेदी करण्याचा विचार करत होते; परंतु अचानक भाव वाढल्याच्या शक्यतेमुळे आता त्या खरेदी करण्याचा निर्णय घेतला. आता परस्पर काही गोष्टी खरेदी करून ठेवणे शहाणपणाचे असले, तरी अधिक साठा भरताना कर्जापासून दूर राहणेही महत्त्वाचे असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

15 जीबीपेक्षा जास्त स्टोरेज झाल्यावर 'गुगल सर्व्हिस'चा वापर करता येत नाही. त्यानंतर मेल येणेसुद्धा बंद होते. जीमेल, फोटोज किंवा ड्राइव्ह रिकामे करावे लागते. अन्यथा, गुगलचा तीनपैकी एक प्लॅन विकत घ्यावा लागतो. लाइट, बेसिक आणि स्टँडर्ड प्लॅनसाठी शुल्क आहे. 'लाईट प्लॅन'साठी पहिले दोन महिने 15 रुपये लागतात. त्यानंतर 59 रुपये दर महिन्याला लागतात. 'लाइट प्लॅन'मध्ये 30 जीबी स्टोरेज मिळते. 'बेसिक प्लॅन'मध्ये 100 जीबी स्टोरेज दिले जाते. त्यासाठी पहिले दोन महिने 35 रुपये तर तिसऱ्या महिन्यापासून 130 रुपये लागतात. 'स्टँडर्ड प्लॅन'मध्ये 200 जीबी स्टोरेज मिळते. त्यात पहिल्या दोन महिन्यांसाठी 50 रुपये तर तिसऱ्या महिन्यापासून 210 रुपये द्यावे लागतात. अंबानी यांच्या 'जिओ'ने 'फाईव्ह जी नेटवर्क'मध्येही देशात आघाडी घेतली आहे. 'रिलायन्स जिओ'चा फाईव्ह जी डाउनलोडिंग स्पीड 158.63 एमबीपीएस आहे. 'एअरटेल'चा वेग 100.67 एमबीपीएस आहे. 'व्हीआय'चा डाउनलोडिंग स्पीड 21.60 एमबीपीएस आहे तर 'बीएसएनएल'चा डाउनलोडिंग स्पीड 7.18 एमबीपीएस आहे.

विदेशी योगदान (नियमन) कायदा (एफसीआरए) अंतर्गत सरकारने विदेशी निधी प्राप्त करणाऱ्या संस्थांची कडक तपासणी सुरू केली आहे. यामुळे अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात परवाने रद्द केले जात आहेत. परिणामी, नागरी समाज गट, गैर-सरकारी संस्था आणि धोरण संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात चिंता निर्माण होत आहे. त्यांना आता 'एफसीआरए'ची मंजुरी मिळवताना किंवा परवान्याचे नूतनीकरण करताना अनेक नियामक आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. गृह मंत्रालयाच्या वार्षिक अहवालातील आकडेवारीवर नजर टाकल्यास नियामक दृष्टिकोनातील बदल दिसून येतो.

'जिओ' 'फाईव्ह जी नेटवर्क'मध्येही देशात आघाडी

रियायन्स उद्योगसमूहाचे अध्यक्ष मुकेश अंबानी देशातील सर्वात श्रीमंत उद्योजक आहेत. त्यांनी 'जिओ'साठी एक गजब रणनीती तयार केली. जिओ यूजर्सना त्याचा फायदा झाला; परंतु त्यामुळे 'गुगल'ची झोप उडाली. 'रिलायन्स जिओ'कडून कोट्यवधी प्रीपेड आणि पोस्टपेड यूजरना मोफत 'क्लाउड स्टोरेज' दिले जात आहे. 'गुगल यूजर्स'ना अकाऊंट बनवल्यानंतर क्लाउडवर 15 जीबी डाटा स्टोरेजची मोफत सुविधा दिली जात आहे; परंतु अंबानी यांनी 'जिओ'वर ही मर्यादा तिप्पट केली आहे. 'गुगल'च्या 15 जीबी मर्यादेमध्ये यूजरला जीमेल, गुगल ड्राइव्ह आणि गुगल फोटोज आदी ॲप्सचा वापर करावा लागतो. गुगल ड्राइव्ह स्टोरेजसाठी यूजरला वेगळे स्टोरेज मिळत नाही. 15 जीबीच्या स्टोरेजमध्ये हे काम करावे लागते. जीमेलमध्ये जास्त स्टोरेज वापरल्यावर ड्राइव्हवर कमी स्टोरेज मिळते; परंतु अंबानी यांनी 'प्रीपेड यूजर्स'ना 299 रुपयांच्या प्लॅनवर मोफत 50 जीबी 'क्लाउड स्टोरेज'ची ऑफर दिली आहे. 'प्रीपेड प्लॅन'च नाही तर पोस्टपेड प्लॅनमध्येही 'क्लाउड स्टोरेज'चा फायदा दिला जातो. 50 जीबी स्टोरेजची ऑफर मिळते.

प्रत्येकाचे आयुष्य हे परमेश्वराचे जीवन आहे. ते चैतन्याचे स्फुरण आहे. त्या स्फुरणाला कारणीभूत असणाऱ्या चैतन्याची आठवण करीत जगणे म्हणजे जीवन. चैतन्याची चिरंतन स्मृती संतांनी केली. श्रीकृष्णाच्या भाषेत 'संत' म्हणजे जे काम, क्रोध, मोह, माया, मत्सर, हवे-नको च्या पलीकडे गेलेत ते, म्हणजेच योगी! म्हणून वारंवार भगवद्गीतेत श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, तू योगी हो आणि हा योग मी सूर्याला सांगितला आहे. त्यानंतर तो विश्वाकुला, ऋषीमुनींना सांगितला त्यालाच कर्मयोग म्हणतात. नित्यकर्मात आपण असलो पाहिजे. ते सोडून चालणार नाही. परमेश्वर आपणास भेटणार नाही म्हणून ओंकार प्रसवला आणि त्यानंतर 'ओम' ने सूर्य पूजा सुरू झाली. सर्व शक्तीचा, चैतन्याचा कारक तो सूर्य ! म्हणून आर्य-अनार्य पासून त्याची पूजा सूर्योपासक करीत राहिले ते आज पावेतो. कारण भगवान श्रीकृष्ण आपल्या विभूती अर्जुनाला सांगत असताना म्हणतात, भुतांच्या अंतरी असणारा आत्मा मी आहे, त्यांचा आदि-अंत व मध्यही मी आहे आदित्यापैकी विष्णू, तेजस्व्यामध्ये सूर्य मरुतामध्ये मरिची मी आहे. याचा अर्थ सूर्य हा मानवाच्या जीवनात एक कारक शक्ती आहे त्यामुळे सूर्यनमस्काराला ध्यान धारणा, आसन, प्राणायाम यात सर्वश्रेष्ठत्व आहे. तो हा सूर्यनमस्कार.

सर्वांगसुंदर उत्तम व्यायाम 'सूर्यनमस्कार'

पुस्तक परीक्षण
ॲड. बी. एस. (आण्णा) पाटील
अध्यक्ष, योग विद्याधाम, इस्लामपूर
राष्ट्रसंचार

योगामध्ये त्याची अनेक अंगे ऋषीमुनींनी सांगितली आहेत आणि मग आपण पातंजली ऋषींना योगाचे जनक मानून कार्यरत राहतो. प्रसन्नतेची प्रभात झाली,योग सूर्य हा उदयी आला. सकाळची प्रसन्न वेळ ही या योगाला व ज्याचा अंतर्भाव योग (आसन, प्राणायाम) साधनेमध्ये झाला, त्याची सुरुवात झाली. त्यामुळे योगाच्या नियमित वर्गात सूर्यनमस्काराने सुरुवात होऊ लागली. सूर्यनमस्कार ही कृती योगामध्ये उशिरा समाविष्ट झाली, कारण सूर्यनमस्कार हा व्यायाम प्रकार म्हणून ज्ञात होता. पण सम चित्त होऊन सूर्यनमस्कार घातले तर ते शरीर व मनही बळकट करते असा अनुभव प्राप्त झाला. लेखिकेने तो उत्तमपणे पायरी पायरीने मांडला आहे. हे सूर्यनमस्कार कोणत्या पद्धतीने घालावेत की ज्यामुळे शरीर व मनाचा विकास होईल. बलोपासना

व शरीर उपासना यामध्ये श्री हनुमान आणि श्री सूर्यदेव हे महत्त्वाचे! शारीरिक व्यायाम एवढ्यापुरते त्याचे महत्त्व न राहता त्यांच्या परिणामांची कक्षा मानवी जीवनाच्या अनेक अंगांना स्पर्शन गेली आहे. त्यामुळे सूर्यनमस्काराची व्यापकता खूप वाढली आहे, त्याबद्दल लेखिकेने केलेले विवेचन व विचार वाचकास स्फ र्ती देणारे ठरतात.

योग साधनेतील काही आसने साखळीप्रमाणे जोडून सूर्यनमस्काराची निर्मिती ही मोठी व्याबहारिक व शरीर स्वास्थ्यासाठीची महत्त्वाची बाब आहे. त्याला मंत्र शास्त्राची जोड दिल्याने तिचे स्वरूप उपासनेत होत जाते. त्यामुळे त्याला दैनंदिन जीवनात धार्मिकता प्राप्त झाली आहे, म्हणजे सूर्यनमस्कारात प्राणायामाची साधना, सूर्याची उपासना आणि आसनांची व्यापकता असा त्रिवेणी संगम झाला आहे याचे सविस्तर वर्णन लेखिकेने सहाव्या प्रकरणामध्ये अत्यंत सुंदर व विवेचनात्मक केलेले दिसते. लहान मुलांपासून वयाच्या ८० वर्षापर्यंत सूर्यनमस्कार घालावेत ही सूचना खूप काही सांगून जाते. लेखिकेने स्त्रियांच्या साठ सूर्यनमस्काराचे फायदे खूप चांगल्या पद्धतीने मांडले आहेतच. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी या नियती तत्त्वाप्रमाणे त्यांच्यासाठीचे सूर्यनमस्कारातील महत्त्व विषद केले आहे, ते खूप महत्त्वाचे वाटते.

सूर्यनमस्काराचा अभ्यास, त्याचे महत्त्व व तंत्र लक्षात घेऊन प्रत्येकाने तो करावा हे तत्त्व या ग्रंथ निर्मितीमध्ये भरभरून राहिले आहे. या अभ्यासाने आपणास काय साधावयाचे आहे यावरून त्यातल्या कोणत्या अंगाचा आवश्यकतेनुसार अभ्यास करावा हे साधकाने ठरवायचे आहे. आपली प्रकृती, वय यानुसार पद्धती ठरवावी लागेल, लागते. मग पुढे प्रश्न आला, पोशाख कसा असावा, वेळ कुठली असावी आणि जागा कशी असावी. तसा हा एक स्वतंत्र विषय होऊन जाईल. सूर्यनमस्कारासाठी बंधने नक्की आहेत. पण ती तंतोतंत पाळता येणार नाहीत हे जरी खरे असले तरी ती पूर्ण मोडू नयेत हेही खरे. सर्व बाबतीत तडजोड हाच उपाय उत्तम असतो. म्हणून, 'अल्पारंभः क्षेम करः' हे सूत्र अवलंबबावे. आता हा एक योगाभ्यास म्हणून आपण विचार केला तर सलग आसने होत असल्याने त्याचा फायदा वेगळाच होत असतो. या सलगतेमुळे खूप वेळ वाचतो. स्थूलता निघून जाते व चपळता जिवनी नांदते.

याबरोबरच 'शरीर स्वास्थ्यम। खल धर्मसाधनम ।।' या उक्तीप्रमाणे स्थूलता असेल, मधुमेह असेल, संधिवात असेल, अपचनासारखे विकार असतील त्याच्यावरही हे सूर्यनमस्कार खात्रीने उपयोगी होतात हेही महत्त्वाचे. या सर्व बाबी लेखिकेने उत्तम प्रकारे या छोट्याशा ग्रंथात समाविष्ट केल्याने लेखनाची उंची वाढली आहे. लेखनातील प्रवाहीपणा हा सूर्यनमस्काराच्या कृती आणि प्रवाही कृती प्रमाणेच नियम सांगून जाते. एकूण हे पुस्तक २५ प्रकरणामध्ये समाविष्ट आहे. एका वेगळ्या पुस्तकाची निर्मिती वाटणे साहजिक आहे, कारण त्यात भाषेचा ओघवतेपणा व शास्त्र, वैद्यकीय आवश्यकता, उत्तम शरीरासाठी योग आणि सूर्यनमस्कार असा प्रपंच मांडला गेल्याने, हे पुस्तक इतर सर्व योग आणि सूर्यनमस्कार, ध्यानधारणा वगैरे पेक्षा वेगळे वाटते, हे याचे खरे-खुरे वैशिष्ट्य आहे.



लेखिका स्वतः व्यायामाच्या सर्व कक्षा पार करणारी एक उच्चशिक्षित जीवनातल्या धडाडीच्या कार्यांना आव्हान देणारी सूर्यपुत्री आहे. 'साद देती हिम शिखरे' या उक्तीला परिपूर्णतेकडे नेणारी ती एक अत्यंत धाडसी व जगप्रसिद्ध सूर्यमंदिराची उभारणी करणारी कृतिशील सबल महिला आहे. माझ्या मते, तिच्या जीवनाला, कार्यकर्तृत्वाला आभाळ हीच मर्यादा आहे. (Sky is the limit) या तिच्या पुस्तक लेखनाला वाचक भरभरून साहाय्यभूत होतील हे मात्र नक्की !

मंडे ब्लूज?
ऑफिससाठी ब्राइट कलर ट्राय कर!

सोमवारच्या सकाळी उठताच मनात एक विचार येतो – “आजचं ओओटीडी काय असावं?” कामाच्या दिवशी, जेव्हा आपलं मूड थोडं मंद पडतं आणि ‘मंडे ब्लूज’ वाटू लागतं, तेव्हा आपला लूकही त्या मूडचा प्रतिबिंब असतो. पण चला, याला बदलूया... आज आपण ऑफिसमध्ये ब्राइट कलर ट्राय करून कसा फॅशनचा धमाका करू शकतो याची चर्चा करूया. हे फक्त कपड्यांचा प्रश्न नाही, तर आपल्या आत्मविश्वासाचा, एनर्जीचा आणि व्यक्तिमत्त्वाचा देखील प्रश्न आहे. चला तर मग रंगांची जादू उलगडू या !

फॅशन
ज्योती हांडगे, पुणे
राष्ट्रसंचार

रंगांचा महत्त्वाचा संदेश...

- रंग फक्त बाह्य सौंदर्य वाढवत नाहीत, तर आपला आत्मविश्वासही उंचावतात. ऑफिसमध्ये नेहमीच नेउट्रल शेड्स वापरल्याने आपला लूक क्लासिक वाटू शकतो, पण थोडं ब्राइट कलर घातल्याने तो मूड लगेच बदलतो. पेस्टल पिंक, टरकॉईज ब्लू, कोरल, मस्टर्ड यांसारखे रंग आपल्या दिवसभराच्या कामात उत्साह आणि पॉझिटिव्ह एनर्जी आणतात.
- उदाहरणार्थ, जर आपण एखादा ब्राइट शर्ट किंवा टॉप घातला, तर तो फक्त एक कपडा नसून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा हिशोब उंचावतो. रंगांनी आपली व्यक्तिमत्त्वे बोलतात – “मी आनंदी, आत्मविश्वासी आणि तयार आहे!”

ऑफिसमध्ये ब्राइट कलर वापरण्याचे फायदे:

- **मूड लिफ्टिंग :** मंडेला नेहमी ‘ब्लूज’ वाटण्याचा एक मुख्य कारण म्हणजे आपला मूड थोडा कमी उंचावलेला असतो. पण जर आपण ब्राइट कलर वापरलं, तर त्याचा परिणाम म्हणजे आपला आत्मविश्वास आणि ऊर्जा दोन्ही वाढतात. सकाळी उठताच थोडेच ब्राइट कलरचे आउटफिट निवडलं की, संपूर्ण दिवसात तुमच्या चेहऱ्यावर स्माईल दिसते.
- **स्टायलिश आणि प्रोफेशनल :** ऑफिस ड्रेस कोडची काही मर्यादा असली तरी, स्मार्टली निवडलेले ब्राइट कलर्स ऑफिसच्या प्रोफेशनल वातावरणाशी जुळतात. उदाहरणार्थ, एक हलका पेस्टल ब्लू शर्ट किंवा पिंक ब्लाउज, ब्लॅक पॅन्टसह किंवा नेव्ही ट्राउझरसोबत सहज प्रोफेशनल दिसतो, पण त्यात तुमचं अनोखं ‘टच’ देखील येतो.
- **इंटरनल क्रिएटिव्हिटी:** रंग आपल्याला फक्त बाह्य रूपात नव्हे तर आतूनही बदल करतात. तुमचा लूक जितका ब्राइट असेल, तितकं तुमचं विचारही उजळ असतं.
- ऑफिसमध्ये नवनवीन कल्पना आणि क्रिएटिव्ह विचार सुटतात, आणि हा सकारात्मक बदल तुमच्या कामावरही परिणाम करतो.

ब्राइट कलर निवडताना काही टिप्स:

- **मेन इन कलर्स :** एखाद्या दिवशी तुम्ही संपूर्ण आउटफिटमध्ये ब्राइट कलर वापरण्याऐवजी, एक किंवा दोन मुख्य रंग निवडा. उदा. – ब्राइट शर्टसह सोबत सोबर ट्राउझर किंवा स्कर्ट, ज्यामुळे आउटफिट संतुलित आणि प्रोफेशनल दिसेल.
- **एक्सेसरीजमध्ये कलर:** जर कपड्यांचा रंग जरा साधा वाटला, तर एक्सेसरीजद्वारे तुमचा लूक फुलवू शकता. कलरफुल बॅग, इअररिंग्स किंवा स्कार्फचा वापर करा. या छोट्या छोट्या गोष्टी तुमच्या स्टाइलला आणखी उठाव देतील.
- **सॉफ्ट आणि कलरफुल मेकअप :** मेकअपमध्येही हलका आणि नेचरल लुक ठेवा, पण लिपस्टिक किंवा आयशॅडोमध्ये ब्राइट टोन वापरा. ह्या मुळे तुमचा लूक आणखी फ्रेश आणि यंग दिसेल.
- **फॅब्रिक आणि टेक्स्चर:** प्रत्येक रंगाची चमक वाढवण्यासाठी, योग्य फॅब्रिक निवडणे महत्वाचे आहे. हलके, आरामदायक आणि नेचरल फॅब्रिक तुमच्या मूडला साजेसं ठरतात. उदा. – कॉटन, लिनन किंवा हलके रॉयन, जे ऑफिसमध्ये आरामदायक आणि स्टायलिश दिसतात.

फॅशनमध्ये एक महत्त्वाचं सूत्र:

- रंग घाला, रंगात राहा! : कारण फॅशन म्हणजे केवळ कपडे नसतात, तर ती तुमची ओळख, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्वाचं प्रदर्शन आहे. ऑफिसमध्ये ब्राइट कलर वापरून तुम्ही केवळ दिसण्यातच बदलता, तर तुमचा आत्मविश्वास देखील वाढतो आणि सगळ्यांच्या नजरेत एक वेगळी छाप उमटते.
- मंडे ब्लूजला निरोप द्या आणि ऑफिसमध्ये तुमच्या लूकला ब्राइट कलरची स्पर्श द्या.
- तुम्ही जेव्हा रंग वापरता, तेव्हा केवळ कपड्यांमध्ये नव्हे तर तुमच्या मनामध्येही नवीन ऊर्जा निर्माण होते. आता तुमचं ओओटीडी फक्त एक आउटफिट नसून तुमचं व्यक्तिमत्त्व व्यक्त करतं – आणि ते व्यक्तिमत्त्व सर्वांना प्रेरित करतो!

हॉस्पिटल माफियांची गोळ्यांमागची गोम

औषधात साखर नाही, पण बिलात जास्तीचं गोड!"

"काय म्हणता? २ दिवस ॲडमिट होतो, पण बिल मात्र दोन लाखांचं आलं!" असं ऐकून हल्ली कोणाचंही BP वाढू शकते – डॉक्टरशिवायच! आजकाल हॉस्पिटल म्हणजे उपचाराचं ठिकाण कमी, आणि ‘उपचाराची संधी’ पाहणाऱ्या माफियांचं मार्केट जास्त वाटायला लागलंय. कारण प्रत्येक इंजेक्शन, गोळी, सलाईन, आणि इथेपर्यंत की कॉटनसुद्धा – बिलात आपली एन्ट्री ठोकून जाते!

1. व्हिसिट चार्जेसचा व्हायरस!

- डॉक्टरांची 'व्हिसिट' म्हणजे हल्ली पंचांगात लिहून ठेवावा असा खर्च.
- २ मिनिटं बसून, "काय झालय?" एवढंच विचारलं तरी रिसेप्शनवर तुमचं बिल तयार झालेलं असतं – ₹1200+ GST!
- जर तुमची ही पहिली भेट असल, तर वेलकम चार्जेस! दुसऱ्या दिवशी पुन्हा आलात? मग ते 'फॉलोअप'चं बिल वेगळंच!
- डॉक्टरांच्या भेटींपेक्षा व्हिसिटिंग चार्जेसचा डेटा बँकेत ‘क्रेडिट’ होत असतो.

2. "औषधं आवश्यकच आहेत..." – पण किती आणि कुठली?

- तुमचं आजाराचं निदान झालं आणि लगेच प्रिस्क्रिप्शनमध्ये १५ गोळ्यांचा पाऊस!
- काहीतरी अँटीबायोटिक
- २ मल्टीविटॅमिन – एक झोप येण्यासाठी आणि उरलेल्या सगळ्या "पुश" केलेल्या ब्रँडेड औषधांच्या गोळ्या
- पण गंमत अशी की, ही औषधं मेडिकलमध्ये घेतल्यावर, वापरली नाहीत तरी परत देता येतात! याचे कारण मेडिकलवाले आधीच ‘संपर्कात’ असतात हॉस्पिटलशी. औषधं परत आली की ती पुन्हा विकली जातात – अगदी तुमच्याच नंतर आलेल्या पेशंटला!

सामाजिक कार्यकर्ते
- किरण काळे,
राष्ट्रसंचार

3. इंजेक्शनपेक्षा इंजेक्शन चार्ज मोठं!

- "सलाईन लावलं होतं" – एवढं सांगितलं की तुमच्या बिलात खालील गोष्टी तयार असतात:
- कॅन्युला
- सलाईन सेट
- सिरिंज
- ग्लोव्हज
- नर्सिंग चार्ज
- सलाईन चार्ज
- ॲडमिनिस्ट्रेशन चार्ज : म्हणजे ‘सलाईन’ लावणं म्हणजे नुसतं पाणी नाही, पैशाचा नळच सुरू होतो!

4. हॉस्पिटल म्हणजे ट्रीटमेंटचं ठिकाण की ट्रान्सॅक्शनचं?

- पूर्वी म्हणायचे – "रुग्ण दवाखान्यात जातो" आता वाटतं – "ग्राहक हॉस्पिटलमध्ये जातो!" इंश्युरन्स असेल, तर मग सगळंच मोकळं मैदान! बिलं वाढवून देणं, "फ्लेमिंगो पॅड वापरलाय म्हणून ₹850" असं स्पेशल चार्जिंग आणि असं सगळं, कारण आपला ग्राहक माघारी विचारत नाही... कारण त्याला फक्त डिस्चार्ज पाहिजे.

5. मेडिकल माफिया : नको ती गोळी, हवी ती कमिशन!

- डॉक्टर, मेडिकल, MR आणि हॉस्पिटल – या चौकटीत एक गोष्ट कॉमन असते – कमिशन! MR (Medical Representative) दर महिन्याला नवीन औषधं "पुश" करतो. डॉक्टर ती लिहितो – पेशंट घेतो – मेडिकल विकतो – हॉस्पिटल बिल करतं आणि मग त्या न विकलेल्या गोळ्या पुन्हा ‘मेडिकल’कडे परत जातात! हा सगळा खेळ अगदी ‘सर्क्युलर इकोनॉमी’प्रमाणे – पण पैशाचं सर्क्युलेशन जास्त, औषधांचं काम कमी.

6. गोरखधंद्याचं चक्र – आणि त्यातून बाहेर पडायचं कसं?

- हो, हे खूप धक्कादायक आहे, पण अजून उशीर झालेला नाही.
- काही साध्या गोष्टी वापरून आपण या माफियांकडून स्वतःला वाचवू शकतो:
- दुसरं मत घ्या (Second Opinion): एकच हॉस्पिटल सत्य नाही
- जनरिक औषधं मागा: तेच कंपाऊंड, पण भाव ५०% कमी
- सरकारी हॉस्पिटल किंवा ट्रस्ट हॉस्पिटलचा पर्याय तपासा
- बिल मागताना तपशीलवार विचारणा करा
- इंश्युरन्स असूनही, खर्चाचं स्पष्टीकरण घ्या

7. शेवटी, आजारापेक्षा मोठी चिंता : ‘बिल’ लागलंय!

- आपल्या देशात आरोग्यसेवा म्हणजे "सेवा" न राहता, व्यवसाय झालाय.
- पेशन्टला आराम मिळेना, पण हॉस्पिटलचं बिल बघून उरलेलं रक्त तापतं!
- एका आजीबाईंना आठ दिवस ॲडमिट केलं, आणि डिस्चार्जच्या दिवशीदोन बॅग औषधं देऊन म्हणाले – "हे घरात लागतील!" कसं काय ठरवलं, की त्या गोळ्या घरात लागणारच?

(विचार करा...तुमचं आरोग्य विकत घेतलं जातंय का?)

जास्त कपड्यांचा हव्यास, पर्यावरणाचा ऱ्हास

पूर्वी दिवाळी, वाढदिवसाला कधी तरी नवे कपडे घालायला मिळायचे. दोन-तीन ड्रेस म्हणजे चंगळ असायची; पण आता अनेकांची आर्थिक परिस्थिती बदलली आहे. आता मनात येइल तेव्हा नवे कपडे घेतले जातात. मात्र हा नवा चंगळवाद निसर्गाच्या, पर्यावरणाच्या मुळावर येत आहे. जामदा कपडे घेण्याची हौस नकळत पर्यावरणाचे नुकसान करत आहे, हे अनेकांना माहीत नाही.

पर्यावरण
मिलद बेंडाळे, पर्यावरण तज्ज्ञ
राष्ट्रसंचार

जादा कपडे खरेदी करणे पर्यावरणाला घातक असल्याची चर्चा राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू झाली आहे. कपड्यांची साठवणूक ही तत्त्वानुसारच व्हायला हवी, असे मत व्यक्त केले जात असले, तरी तरी दिखाव्याच्या या जगात रोज आपल्या पोशाखात नवनवीन बदल करून प्रवाहात राहणे आणि फास्ट फॅशनच्या नावाखाली मिळणारे स्वस्त कपडे बदलणे हीच सर्वात सोपी गोष्ट आहे. कपडे बनवताना प्लास्टीकचा वापर मोठ्या प्रमाणात होतो हे आपल्यापैकी बहुतेकांना माहीत नाही. पूर्वी फक्त कापसाच्या धाग्याचा वापर कपडे बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला जात होता. आज त्याची जागा कृत्रिम धाग्यांनी घेतली आहे. सुती कपडे आर्थिकदृष्ट्या सक्षम लोकांपुरते मर्यादित राहिले आहेत. कपड्यांचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना दायित्वाशी संबंधित कोणताही कायदा लागू नाही. प्लास्टीकचा वापर कपडे तयार करण्यासाठी केला जात असल्यामुळे प्लास्टीकच्या तंतूंनी बनवलेले प्रदूषित कपडेदेखील नियमांच्या कक्षेत असले पाहिजेत. नियम आणि कायदे नसल्याचा फायदा घेत मोठमोठी औद्योगिक घराणीही वेगवान फॅशनच्या शर्यतीत सामील झाली आहेत. वास्तविक पाहता सुरुवातीच्या टप्प्यातच नियम बनवून उत्पादन आणि अंमलबजावणीवर प्रभावी नियंत्रण स्थापित करणे योग्य ठरेल. त्याचबरोबर पर्यावरणाची थेट हानी होत असल्याबाबत सर्वसामान्यांमध्ये जनजागृती केली पाहिजे. अन्यथा, एकदा ही समस्या गंभीर झाली की त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रचंड संसाधने खर्च केली जातील; पण सवयीमुळे जनतेला कपड्यांच्या आसक्तीपासून वेगळे करणे कठीण होईल.

आज बाजारपेठा शहरी नियोजनाच्या कक्षेबाहेर जात आहेत. भारत आणि इतर विकसित आणि विकसनशील देशांमध्ये पुरातन काळापासून कपडे फाटेपर्यंत वापरण्याची परंपरा होती; परंतु आता ती काळाबरोबर लोप पावत आहे. अहमदाबादमधील दिल्ली दरवाजा, काही दक्षिण अमेरिकन आणि आफ्रिकन शहरांमधील सेकंड-हँड मार्केटमध्ये सेकंडहँड कपड्यांची विक्री अजूनही मोठ्या प्रमाणावर होते. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे देश कोणताही असो, सेकंडहँड कपड्यांच्या बाजारपेठेत तथाकथित अशिक्षित, ग्रामीण आणि मागासलेल्या महिलांचे वर्चस्व आहे. या अनौपचारिक बाजारपेठा मुळात महिलांमध्ये स्वयंरोजगाराचे एक प्रमुख माध्यम होते. त्यातून या महिलांमध्ये प्रचलित असलेली नैसर्गिक व्यावसायिक प्रतिभा व्यक्त होत होती; पण हे बाजार नगर नियोजनाच्या कक्षेबाहेर जात आहेत. भारतात पारंपारिकपणे, भांडी आणि घरगुती वस्तूंची देवाणघेवाण ही एक सामान्य प्रथा होती. ती प्रत्येकाच्या आवडीची होती. जगभरात सेकंडहँड कपड्यांचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्याच्या मोहिमेसोबतच यासंदर्भात जनजागृती करण्याचे कामही केले जात आहे. आपले भविष्य डोळ्यासमोर ठेऊन तरुण पिढीला सतत खरेदी करणे थांबवणे, पर्यावरणपूरक कपडे निवडणे आणि कुटुंबातील सदस्यांच्या एकत्रित वापराला प्रोत्साहन देणे असे संकल्पही घ्यावे लागतील.

2015 मध्ये जयपूरमध्ये एका तरुण उद्योजकाने ब्रँडेड कपडे भाड्याने देण्यासाठी पुढाकार घेतला होता; परंतु दहा वर्षांपूर्वीचा हा उपक्रम कदाचित अकाली आणि समजण्याच्या पलीकडे होता. सध्याच्या काळात विश्व टिकवण्यासाठी असे पर्याय नितांत आवश्यक आहेत. आताच खबरदारी न घेतल्यास कचऱ्याचे ढीग वाढतच जातील आणि ते कमी करणे अशक्य होईल. कापड उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यावर पाणी, रसायने आणि ऊर्जा यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. त्याचा पर्यावरणावर खोलवर परिणाम होतो. संशोधनानुसार, जागतिक कार्बन उत्सर्जनात फॅशन उद्योगाचा वाटा दहा टक्के आहे, जो 2030 पर्यंत सतत वाढण्याची शक्यता आहे. फॅशन उद्योग 92 दशलक्ष टनांपेक्षा जास्त कचरा निर्माण करतो आणि दर वर्षी 1.5 ट्रिलियन टन पाणी वापरतो. बदलत्या जीवनशैलीचा आणि विचारांचा पर्यावरणासह अनेक स्तरांवर परिणाम झाला आहे. यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्याकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही. बदलत्या फॅशनच्या मागणीमुळे बऱ्याच समस्यांकडे दुर्लक्ष केले गेले आहे. त्यात पर्यावरणीय समस्यादेखील समाविष्ट आहेत.

एका संशोधनानुसार, हवामान बदलामध्ये फॅशन उद्योगाचा वाटा तब्बल दहा टक्के आहे. त्यामुळे भूजलाला सर्वात मोठा धोका निर्माण झाला आहे. कापड उत्पादक कंपन्या भूजलाचे सर्वाधिक शोषण करतात. बांगलादेश हा जगातील दुसरा सर्वात मोठा कापड निर्यातदार देश आहे. आकडेवारीनुसार, बांगलादेशमधील कापड उद्योग दर वर्षी पृथ्वीवरील 1,500 अब्ज लिटर पाण्याचे शोषण करतो. एक किलो डेनिम धुण्यात 250 लिटर पाणी वाया जाते. तसेच एक किलो सुती कापड धुण्यासाठी आणि रंगवण्यासाठी 200 लिटर पाणी वापरले जाते. यामुळेच बांगलादेशमधील भूजल पातळी सातत्याने खाली जात आहे.

वस्त्रोद्योगामुळे या देशाचे जेवढे पाणी वाया जाते, तेवढे पाणी पिण्यासाठी वापरल्यास सुमारे दोन कोटी लोकांना दहा महिने पिण्याचे पाणी मिळू शकते. फॅशनमुळे पर्यावरण प्रदूषण, जलसंकट, रासायनिक प्रदूषण, कार्बन उत्सर्जन, कचरा या समस्या वाढत आहेत. वस्त्रोद्योग हा जगातील सर्वाधिक प्रदूषण करणाऱ्या उद्योगांपैकी एक आहे. फॅशनेबल आणि टिकाऊ कपड्यांमध्ये नायलॉन, पॉलिस्टर आणि स्पँडेक्ससारख्या कृत्रिम तंतूंचा वापर केला जातो. ते कपड्यांच्या उत्पादनात वापरले जातात. त्यामुळे कपडे खराब होत नाहीत. त्याचप्रमाणे, रेयॉन, लाकडाच्या लगद्यापासून बनवलेले फॅब्रिक, जंगलतोड वाढवते आणि नैसर्गिक अधिवास आणि जैवविविधतेच्या नाशासाठी अत्यंत हानिकारक ठरते. आजकाल असे स्वस्त कपडे बाजारात मुबलक प्रमाणात मिळतात, जे निकृष्ट दर्जाचे असतात. लोक ते लवकर टाकून देतात. अशा कपड्यांनी जागतिक कचरा समस्येला हातभार लावला आहे.

फॅशनच्या पर्यावरणीय प्रभावाबद्दल आता जागरूकता वाढायला लागली आहे. त्यामुळे टिकाऊ कपड्यांच्या उत्पादनात वाढ झाली आहे. अशा कपड्यांची मागणी जसजशी वाढत जाईल, तसतसे अशा उद्योगांमध्ये गुंतलेल्या कामगारांना चांगल्या कामाची परिस्थिती, उत्तम दर्जाचे कपडे आणि उत्तम कारागीरांना चांगले काम आणि मजुरी मिळेल.

भारतीय कापड उद्योग कुशल कारागीरांसाठी ओळखला जातो. त्यात भरतकाम आणि अलंकार यांचा समावेश आहे. पर्यावरणाच्या समस्या निर्माण करणाऱ्या उद्योगांना पर्यावरणपूरक बनवण्याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. भारतात लोकप्रिय असलेला कपड्यांचा ब्रँड बाजारात इतका प्रचलित होतो की तो विकत घेताना पर्यावरणाला हानी पोहोचत आहे की नाही याचा विचार कोणी करत नाही. त्याऐवजी पर्यावरणस्नेही ब्रँड्सच्या टिकाऊ कपड्यांबाबत लोकांची आवड वाढल्यास वस्त्रोद्योगामुळे निर्माण होणाऱ्या समस्या कमी होऊ शकतात. फॅशन ही समाजाची गरज आहे; पण समस्या निर्माण करत असते, तेव्हा तिचे समर्थन करता येत नाही. ब्रिटन, अमेरिका, स्वीडन आणि फिनलंडमध्ये फॅशन इंडस्ट्री किंवा टेक्सटाईल इंडस्ट्रीमध्ये केलेल्या अलीकडील अभ्यासातून फॅशनचा पर्यावरणासह अनेक क्षेत्रांवर परिणाम होतो, असे दिसून आले आहे. त्याचा पृथ्वी आणि तिच्यावर राहणारे प्राण्यांशी खोल संबंध आहे. अभ्यासानुसार, कापड आणि फॅशन उद्योगाची पुरवठा साखळी लांब आहे. ती कृषी आणि फायबर उत्पादनापासून पुरवठा, उत्पादन आणि किरकोळ विक्रीपर्यंत पसरलेली आहे. कापड उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यात प्रचंड प्रमाणात पाणी, रसायने आणि ऊर्जा वापरली जात असल्याचे संशोधकांना आढळून आले आहे. त्याचा पर्यावरणावर खोलवर परिणाम होतो. फॅशन आणि कापड उद्योग मोठ्या प्रमाणावर असलेल्या देशांमध्ये पर्यावरणीय प्रदूषण आणि पाण्याची कमतरता इतर देशांपेक्षा खूप जास्त आहे. गेल्या वीस वर्षांमध्ये नवीन फॅशनकडे लोकांची आवड प्रचंड वाढली आहे. पूर्वी लोक कोणत्याही सण किंवा लग्न समारंभाच्या निमित्ताने कपडे खरेदी करायचे. आता नवीन फॅशनच्या कपड्यांची खरेदी सतत सुरू असते. यामुळेच स्वस्त असूनही वस्त्रोद्योग तोट्यात रहात नाही.

'विश्वरत्न' डॉ. बाबासाहेब आंबेडकर

जगातील सर्वात श्रेष्ठ असणाऱ्या भारतीय संविधानाच्या माध्यमातून स्वातंत्र्य,समता आणि बंधुता या मूल्यांच्या आधारावर सर्वांना एकत्र जोडणारे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

अभिवादन
शशिकांत जाधव
राष्ट्रसंचार

लष्करात सुभेदार मेजर राहिलेल्या रामजी सकपाळ आणि भीमाबाई यांच्या पोटी १४ एप्रिल,१८९१ रोजी मध्य प्रदेशातील 'महू 'येथे बाबासाहेबांचा जन्म झाला.प्राथमिक शिक्षण दापोली आणि सातारा येथे त्यांनी घेतले. लहानपणापासूनच ते अभ्यासात हुशार होते. माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी मुंबईतील एल्फिन्स्टन हायस्कूल व कॉलेजमध्ये घेतले.मॅट्रीकची डिग्री त्यांना मिळाली तेव्हा प्रभावित होऊन कृष्णाजी केळूस्कर या शिक्षकांनी 'बुद्ध चरित्र' हे पुस्तक बाबासाहेबांना भेट म्हणून दिले.त्या पुस्तकाचा त्यांच्या जीवनावर मोठा प्रभाव पडला.बडोदा संस्थानची शिष्यवृत्ती मिळाल्याने उच्च शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले. तेथे अर्थशास्त्रावर पी.एच.डी. केली.भारतात परत आल्यावर त्यांनी बडोदा संस्थानात नोकरी धरली पण तेथे त्यांचे मन रमले नाही.त्यांनी अस्पृश्यता निर्मुलनासाठी संघटना उभी करून चळवळ सुरू केली.याच दरम्यान त्यांनी 'मूकनायक' आणि 'बहिष्कृत भारत' नावाचे वृत्तपत्रे सुरु केली.अस्पृश्य समाजातील मुलांनी शिक्षणाच्या प्रवाहात यावे तसेच शैक्षणिक,सामाजिक,आर्थिक प्रगती व्हावी यासाठी त्यांनी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली.' शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र त्यांनी दिला.आज समाजातील सर्व घटकातील मुले - मुली उच्च शिक्षण घेऊन आपले राष्ट्राप्रती कर्तव्य बजावत आहेत.

भारत स्वतंत्र झाल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पहिल्या मंत्रिमंडळात कायदे मंत्री म्हणून निवड करण्यात आली. पुढे त्यांची भारतीय संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली होती. २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारताचे संविधान सभेत संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून ते अर्पण केले.हे संविधान स्वातंत्र्य,समता आणि बंधुता या मूल्यावर आधारीत सर्वांना एकत्रित करणारे आहे. आज जगातील सर्वात श्रेष्ठ संविधान म्हणून भारतीय संविधानाची ओळख आहे. याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जाते.

डॉ.आंबेडकर यांनी आपल्या जीवनात गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा ज्योतिराव फुले यांना आपले गुरू मानले. या तीनही युगपुरूषांचा त्यांच्या जीवनावर प्रभाव पडलेला दिसून येतो. मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, समता प्रबुद्ध भारत ही वृत्तपत्रे सुरु केली.वृत्तपत्रांच्या माध्यमातून समाज जागृती करण्याचा त्यांनी अखेरपर्यंत प्रयत्न केला. नाशिकचे काळाराम मंदिर तसेच महाडचे चवदार तळे येथे आंदोलने करून समाजातील जातिभेद निर्मूलन करून न्याय हक्क मिळवून दिले. सामाजिक विषमतेविरूद्ध सातत्याने लढा दिला.त्यांचे २२ ग्रंथ आणि पुस्तिका, १० शोधनिबंध,लेख आधी त्यांचे साहित्य प्रसिद्ध आहे.अशा महानायकाचे ६ डिसेंबर,१९५६ रोजी निधन झाले.मुंबईतील दादर येथे त्यांच्यावर अग्निसंस्कार करण्यात आले.याच ठिकाणी त्यांचे भव्य समाधी मंदिर आहे. त्याला आपण 'चैत्यभूमी 'म्हणूनओळखतो.भारतीय घटनेचे शिल्पकार असलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त

विनम्र अभिवादन !

पोटाच्या तक्रारी दूर करण्याचे १३ प्रभावी उपाय

■ डॉ. सुनील इनामदार,

- १) रोज जेवणानंतर दालचिनीची पावडर मधात मिसळून घ्या.
- २) १०० मि. लि. पाण्यात एक चमचा मेथी दाणे उकळून हे पाणी जेवणाआधी एक तास प्यावे व जेवणानंतर हे मेथीचे दाणे चाऊन खावे, याने सकाळी पोट साफ होते.
- ३) भाजलेले जिरे पूड जेवणानंतर पाण्यासोबत घ्या.
- ४) मनुका दुधात उकळून रात्री झोपण्यापूर्वी चावून खावे.
- ५) रात्री झोपण्यापूर्वी एक चमचा भरून गुलकंद खाऊन त्यावर एक कप भरून दूध घ्यावे.
- ६) दूधात दोन तीन अंजिर उकळून मग अंजिर खावे आणि वरून दूध घ्यावे.

- ७) एक ग्लास पाण्यात २ चमचे कोरफड गर मिसळून घ्यावे.
- ८) रात्री झोपण्यापूर्वी एक कप पाण्यात एक ते दोन चमचे साजूक तुप व किंचित सैंधव मीठ घालून घ्यावे. याने सकाळी पोट साफ होईल.
- ९) रोज सकाळी दोन खजुर साजुक तुपासोबत खाल्ल्यास पोट साफ होते.
- १०) ताजी कोरफड मंद गॅसवर भाजून, नंतर साल काढून, यातिल गर मलमलच्या कपड्यात गाळून, त्यात मध मिसळून घ्यावे. याने सकाळी पोट साफ होते.
- ११) रात्री झोपण्यापूर्वी एक चमचा भरून ओवा खावा, याने पोट साफ होते.
- १२) रात्री झोपण्यापूर्वी एक चमचा भरून एरंडेल तेल घ्यावे, याने सकाळी पोट साफ होते.
- १३) त्रिफळा चूर्ण मातीच्या भांड्यात भिजवून मग सकाळी हे गाळून घ्यावे. याने पोट साफ होते.

'हे' पाच ब्युटी प्रॉडक्ट्स हवेच

जसं बाहेरील वातावरण बदलतं तसा त्वचेवर त्याचा चांगला वाईट परिणाम होत असतो. हिवाळ्यात त्वचा कोरडी पडते तर उन्हाळ्यात त्वचा काळवंडते. वयाची तिशी गाठताच आजकाल एजिंगच्या खुणा, जुनाट व्रण, फाईन लाईन्स, सुरकुत्या त्वचेवर दिसू लागतात. कामाचा ताण आणि चिंता काळजीमुळे डोळ्याखाली काळी वर्तुळे जमा होतात. म्हणूनच नियमित स्कीन केअर रूटीन त्वचेसाठी फार गरजेचं आहे. यासाठी प्रत्येक स्त्रीकडे हे पाच ब्युटी प्रॉडक्ट असायलाच हवे.

सौंदर्य कला
रचना मोरे
राष्ट्रसंचार

फेसवॉश

त्वचा स्वच्छ आणि नितळ राहण्यासाठी अंघोळ करताना फक्त चेहरा धुणं पुरेसं नाही. यासाठी तुम्ही दिवसातून कमीत कमी दोन वेळा त्वचेवर एखादं चांगलं क्लिझर अथवा फेसवॉश वापरायला हवा. मात्र फेसवॉश अथवा क्लिंझर्सची निवड करण्यापूर्वी तो तुमच्या स्कीन टाइपला सूट करणारा आहे का हे आधीच तपासा. आजकाल त्वचेच्या प्रकारानुसार विविध प्रकारचे फेसवॉश बाजारात सहज मिळतात.

फेस स्क्रब

फेश वॉश आणि क्लिंझर्सप्रमाणे आठवड्यातून एक ते दोन वेळा चेहऱ्यावर चांगला स्क्रब लावणे गरजेचं आहे. त्वचा एक्सफोलिएट करण्यासाठी स्क्रबर फायद्याचे ठरतात. कारण यामुळे त्वचा मुळापासून स्वच्छ होते. त्वचेचे बंद झालेले पोअर्स मोकळे होतात आणि त्वचेला पुरेसा ऑक्सिजन मिळतो. ज्यामुळे त्वचा पुन्हा टवटवीत दिसू लागते.

मॉइस्चराइझर

त्वचा स्वच्छ करताना त्वचेवरील नैसर्गिक तेल निघून जातं. ज्यामुळे त्वचा कोरडी आणि निस्तेज पडण्याची शक्यता असते. कोरड्या त्वचेवर वेळेआधीच एजिंगच्या खुणा दिसू लागतात. यासाठी त्वचेवर लगेच चांगलं मॉइस्चराइजर वापरायला हवं. मॉइस्चराइझरमुळे त्वचा मऊ आणि हायड्रेट राहण्यास मदत होते. तुम्ही तुमच्या त्वचेच्या प्रकारानुसार मॉइस्चराइझरची निवड करू शकता. तसंच ऋतूमानानुसारही मॉइस्चराइझरमध्ये आवश्यक बदल करायला हवेत.

सनस्क्रीन

लोकांचा असा समज आहे की सनस्क्रीन फक्त उन्हाळ्यात अथवा दुपारी घराबाहेर पडताना वापरावं. मात्र असं मुळीच नाही तुम्हाला घरात असतानाही सनस्क्रीन लावण्यास काहीच हरकत नाही आणि प्रत्येक ऋतूमध्ये त्वचेला सनस्क्रीनची गरज असू शकते. यासाठी त्वचेचं जास्तीत जास्त संरक्षण करणारं म्हणजे एसपीएफ 50 पेक्षा जास्त असलेलं सनस्क्रीन असायला हवं.



अंडर आय क्रीम

डोळ्यांखालील त्वचा मऊ आणि एकसमान दिसण्यासाठी तुम्ही नियमित चांगलं अंडर आय क्रीम वापरायला हवं. कारण जर तुमच्या डोळ्याखाली काळी वर्तुळं निर्माण झाली तर सगळ्यांचं तिकडे पटकन लक्ष जातं. तुमच्या सौंदर्यात याची बाधा निर्माण होते. चिरतरूण राहण्यासाठी नियमित अंडर आय क्रीम वापरणं तुमच्या नक्कीच फायद्याचं ठरेल.

विकासकामांबाबत हलगर्जीपणा नको

आमदार ज्ञानेश्वर कटकेंनी महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांना कडक शब्दात सुनावले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

वाघोली : सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून प्रश्न जाणून घ्या, नागरिकांशी सौजन्याने वागा वाघोलीतील विकास कामांबाबत हलगर्जीपणा चालणार नाही अशा कडक शब्दात सूचना देऊन सूनावून आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी वाघोली येथील कामांबाबत शुक्रवारी (दि.११) पुणे महापालिका अधिकारी, कर्मचारी यांच्यासोबत नागरिकांच्या आयोजित बैठकीत दिल्या.

वाघोली येथे पुणे महानगरपालिका क्षेत्रीय कार्यालय नगर रोड येथील उपायुक्त व सर्व विभागातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांची वाघोलीतील नागरिकांसमवेत आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके यांनी बैठक घेतली.वाघोलीतील नागरिकांच्या समस्या मांडण्यासाठी व मांडलेल्या समस्या सोडून घेण्यासाठी आजच्या बैठकीचे आयोजन केले होते. यामध्ये आरोग्य, विद्युत, पथ, पाणीपुरवठा, घनकचरा, ड्रेनेज, सुरक्षा, अतिक्रमण या सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांशी आमदार यांच्याशी चर्चा केली.वाघोली हे पुणे शहराचे प्रवेशद्वार असून वाघोली चा विकास कसा करता येईल यावर चर्चा करून अधिकाऱ्यांना जबाबदारीने लक्षपूर्वक कामे करण्यासाठी आवाहन केले.

आरोग्य विभागामध्ये विविध योजना लोकांपर्यंत कशा पोहोचतील आणि त्या योजनांचा लाभ लोकांना जास्तीत जास्त कसा घेता येईल यावर चर्चा केली वाघोली मध्ये संपर्क अधिकारी नियुक्त करण्यासंदर्भात आमदार साहेबांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

विद्युत विभागामध्ये जिथे जिथे लाईटची कमतरता आहे त्या ठिकाणी अधिकाऱ्यांनी सर्व्हे करून योग्य ते कामे सुचवावेत.

शाळा परिसर,उद्यान परिसर, चौका-चौकात सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत. खांबावरील बल्ब हे जास्त काळ टिकावेत म्हणून चांगल्या दर्जाचे बसवावेत. आणि गरज असेल तिथे अंडरग्राउंड लाईटचे नियोजन करावे.

पथ विभाग अंतर्गत येणाऱ्या रस्त्यांच्या दोन्ही बाजूला ब्लॉक बसविणे, होणाऱ्या रस्त्यांची गुणवत्ता राखणे आवश्यक त्या ठिकाणचे रस्ते हे प्रथम प्राधान्याने घ्यावेत. त्याचबरोबर पाणीपुरवठा मध्ये पाण्याच्या टाक्या या वेळोवेळी साफ करण्यात याव्यात.वॉलमेन बदलून प्रत्येक विभागाला समान पाणी सोडावे. पाणी सोडण्यासाठी मोटारची क्षमता वाढविणे गरजेचे आहे.महापालिकेचे पाणी ज्या ज्या ठिकाणी पोहोचत नाही तिथे तात्काळ टँकर सुविधा सुरू करण्यात याव्यात तसेच पाणी स्वच्छतेकडे विशेषतः लक्ष देण्याच्या सूचना आमदार साहेबांनी अधिकाऱ्यांना केल्या.

घनकचरा व्यवस्थापनासाठी कामगार वाढवावेत व कचरा उचलण्यासाठी गाड्या वाढवाव्यात ज्या ज्या भागात कचरा उचलण्यासाठी गाडी जात नसेल त्या त्या ठिकाणी सर्व्हे करून उपाययोजना कराव्यात. शाळा,उद्याने,स्मशानभूमी, मंदिर या ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमवावेत. गायरान जागेवरील अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावेत व जागेची मोजणी करून म.न.पा.च्या ताब्यात घेण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना आमदार कटके यांनी केल्या.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राष्ट्रीय पुरस्काराने नाथाभाऊ शेवाळे सन्मानित

रांजणगाव गणपती : जनता दल सेक्युलर पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी धर्मपीठ यांच्यातर्फे 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राष्ट्रीय पुरस्कार २०२४' ने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या सामाजिक व राजकीय जीवनातील आजवरच्या कार्यासाठी अहिल्यादेवी होळकर राष्ट्रीय पुरस्कार समितीने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली. वाय. बी. चव्हाण सेंटर, मुंबई या ठिकाणी तेलंगणाचे राज्यपाल महामहीम जिष्णु देव वर्मा जी यांच्या हस्ते त्यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पुरस्कार सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद प्रा. राम शिंदे,ज्येष्ठ साहित्यिक, मा. अध्यक्ष, त्रिपुरा राज्य विद्युत मंडळ डॉ. मुरहरी केळे , अध्यक्ष - भामला फाउंडेशन, मुंबई आसिफ भामला,आयोजक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राष्ट्रीय पुरस्कार समिती सागर धापटे पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

दुचाकीवरून जाणाऱ्या एकास टँकरची धडक

महाळुंगे : चाकण-आंबेठाण रस्त्यावरील बिरदवडी चौक,वाय जंक्शन येथे आपल्या दुचाकीवरून जाणाऱ्या एकास टँकरची पाठीमागून धडक बसल्याने वृद्धाचा त्यात जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अपघातात राघु ज्ञानोबा कड (वय.५७) वर्षे,रा.संतोषनगर,भाम,ता.खेडअसे मृत्युमुखी पडलेल्याचे व्यक्तीचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीवरून फिर्यादी सचिन अरुण कड (वय.३५वर्ष,रा.संतोषनगर, भाम) यांनी महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चालकावर गुन्हा दाखल केला आहे. राघू कड हे (दि.१२) च्या सुमारास सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास आपल्या स्वतःच्या दुचाकी (क्रमांक,एम.एम.१४/एचए ५९३७) वरून सुदवडी (ता.मावळ)येथे कामानिमित्ताने चाकण - आंबेठाण रस्त्यावरील बिरदवडी (ता.खेड) येथील वाय जंक्शन येथून जात होते. त्याचवेळी पाठीमागून पाण्याचा टॅक्टर नंबर (एमएच.१२,एचडी १३६४) वरील अज्ञात चालकाने वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करत टँकर चालकाने भरधाव वेगाने चालवत दुचाकीस मागून जोराची धडक दिली. धडक बसल्याने राघू कड हे टँकरचे पुढील चाकाखाली आल्याने गंभीर दुखापत होऊन त्यात राघू कड यांचा दुर्दैवी अंत झाला.

शिक्रापुरात युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

शिक्रापूर : येथील आकाश काळजे हा कुटुंबियांसह जेवण करुन रात्रीच्या सुमारास घरात झोपलेला होता, सकाळी सर्वजण उठले तरी आकाश बाहेर येत नसल्याने आकाश झोपला असावा म्हणून कोणी आवाज दिला नाही मात्र अकरा वाजले तरी आकाश बेडरूमचा दरवाजा उघडत नसल्याने कुटुंबीयांनी त्याच्या मोबाईलवर फोन लावला असता फोनची रिंग वाजत असून देखील आकाश फोन उचलत नसल्याने त्याच्या कुटुंबीयांनी खिडकीतून पाहिले असता आकाशने पंख्याला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले, दरम्यान त्याला उचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी आकाश उद्धवराव काजळे वय २७ वर्षे रा. पाटवस्ती शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले, याबाबत अजय उद्धवराव काजळे वय २७ वर्षे रा. पाटवस्ती शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे खबर दिल्याने पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोलीस करत आहे.

शिक्रापुरात आरोग्य शिबिराने महात्मा फुलेंना अभिवादन

शिक्रापूर : येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन व वृक्षारोपण करुन सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य विषयक जनजागृती उपक्रम घेऊन महात्मा फुलेंना अभिवादन करण्यात आले आहे. शिक्रापूर ता. शिरुर येथील त्रिआ प्रिन्स टाऊन सोसायटी व स्माईल फाउंडेशन यांच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी नागरिकांचे रक्तदाब, रक्तातील साखर, हिमोग्लोबिन, वजन मोजणी आणि सामान्य वैद्यकीय तपासणी करत योग्य सल्ला देऊन आवश्यक औषधे मोफत देब्यात आले असून यावेळी ६० नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आले, सदर शिबिर यशस्वी होण्यासाठी सामुदायिक आरोग्य अधिकारी के. एम. सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली चिकित्सा अधिकारी डॉ. कोमल राठोड, अनुष्का दोरगे, प्रियांका मोहिते, गुलाबराव आंधळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

वनपुरी येथे टाळ मृदुंगाच्या जयघोषात श्री हनुमान जन्मोत्सव उत्साहात संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

सासवड : "अंजनीच्या सुता तुला रामाच वरदान, एकमुखाने बोला, जय जय हनुमान " असा सुरु असलेला नाम घोष, टाळ मृदुंगाचा गजर, विधिवत महापूजा आणि मंत्रोपच्चार, मूर्तीवर केलेली पुष्पवृष्टी तसेच महा आरती त्यानंतर सर्वात शेवटी उपस्थित भाविकांना सुंठवडा आणि भंडाऱ्याचा महाप्रसाद देवून श्री हनुमान जन्मोत्सवाची उत्साहात सांगता करण्यात आली.

दरम्यान वनपुरी येथे श्री विठ्ठल प्रासादिक भजनी मंडळाच्या वतीने पहाटे साडेचार पासून टाळ मृदुंगाच्या जयघोषात हरिनामाचा गजर सुरु होता. ग्रामस्थांच्या वतीने मूर्तीस अभिषेक करून महापूजा करण्यात आली. सकाळी ६. ३० वाजता महाआरती घेवून उपस्थितांना सुंठवडा वाटप करण्यात आला. यावेळी गावातील ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डोंगराच्या कुशीत सुतारमाळ येथे वसलेली श्री हनुमान मूर्ती " उघडा मारुती म्हणून प्रसिद्ध असून सभोवताली झाडांची दाटी, हरीण, ससे, कोल्हे, लांडगे, तरस तसेच इतर प्राण्यांच्या कायमच सहवासात राहणारी हि विलोभनीय अशी मूर्ती आहे. वर्षानुवर्षे हि मूर्ती उघडीच असून येथे कोणत्याही स्वरूपाचे मंदिर नाही, भर उन्हात, पावसात, थंडीत आपले अस्तित्व टिकवून असलेली हि मूर्ती आहे. याठिकाणी सुतार समाजाच्या वतीने माजी उपसरपंच तुकाराम महामुनी, माजी सदस्य संभाजी महामुनी तसेच बाळासाहेब महामुनी यांच्या हस्ते मूर्तीस महाभिषेक घालण्यात येवून आरती घेण्यात आली. तसेच उपस्थित भाविकांना भंडार्याचा महाप्रसाद म्हणून बुंदी आणि भात, आमटी देण्यात आली.

याप्रसंगी माजी सरपंच नामदेव कुंभारकर, उपसरपंच सुजित कुंभारकर, गावचे पुजारी जगन्नाथ रूढ, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष माणिकराव कुंभारकर, भैरवनाथ तरुण मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र कुंभारकर, लंकेश महामुनी, प्रकाश गायकवाड, दादासो कुंभारकर, मुरलीधर कुंभारकर, सुरेश महामुनी, शिवाजी महामुनी, बाळासो कुंभारकर, अशोक कुंभारकर, भगीरथ कुंभारकर, दादासो कुंभारकर, संतोष कुंभारकर, स्वप्नील कुंभारकर, दत्तात्रय कुंभारकर, मधुकर कुंभारकर, शांताराम कुंभारकर तसेच महिला आणि भाविक उपस्थित होते.

खानवडीला पर्यटन स्थळाचा दर्जा द्या -लक्ष्मण हाके

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

सासवड : महात्मा ज्योतिराव फुले यांच्या मृत्युपत्रांमध्ये खानवडीचा उल्लेख आहे त्याप्रमाणे खानवडी मध्ये असणाऱ्या स्मारकाकडे शासनाने कोणतीही लक्ष दिले नसून खानवडीला पर्यटन स्थळाचा शासनाने दर्जा घ्यावा त्याचबरोबर शासनाने खानवडीच्या स्मारकाकडे लक्ष देऊन सुधारणा कराव्यात अशी मागणी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केली.

खानवडी (ता पुरंदर) येथील महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मारकामध्ये लक्ष्मण हाके यांनी भेट दिली यावेळी दौंड, बारामती, पुरंदर या तालुक्यातील ठिकाणांच्या तरुणांनी आणलेल्या ज्योतींचे दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनील धिवार यांनी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांचे संविधानाची प्रत देऊन स्वागत केले.

त्याचबरोबर जिल्हा परिषदेच्या शाळेची पाहणी हाके यांनी केली. हाके पुढे म्हणाले, जिल्हा परिषदेच्या वतीने सीएसआर फंडामधून उभी राहत आहे ती शाळा अतिशय लाजवाब आहे. खानवडीला पर्यटन स्थळाचा दर्जा मिळाला तर स्मारकाचा विकास होऊ शकतो.

यावेळी सरपंच स्वप्नाली होले, बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनिल धिवार, माजी सरपंच चंद्रकांत फुले, रवींद्र फुले, दत्ता होले, संदीप टिळेकर, संतोष डुबल, जयंवत होले, भाऊ खोमणे, रविकिरण होले, श्यामकुमार मेमाणे, ग्रामसेवक अनिल जगताप, तलाठी प्रवीण जोजारे, संतोष म्हेत्रे, युवराज होले, मीरा कुंजीर, वर्षा खोमणे, ज्योती होले, शुभांगी होले उपस्थित होते.

खानवडी येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मारकात लक्ष्मण हाके यांचा सन्मान करण्यात आला

धामणीच्या श्री म्हाळसाकांत खंडोबा मंदिरात सप्तशिवलिंगावर चंदनउटी सोहळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

लोणी-धामणी : धामणी (ता.आंबेगांव) येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा मंदिरात सहाणेवर उगाळलेल्या चंदनाच्या उटीने सजवलेले स्वयंभू सप्तशिवलिंग आणि पंचधातूच्या मुखवट्यावर करण्यात आलेला सुवासिक केशरमिश्रित चंदनाचा लेप स्वयंभू सप्तशिवलिंगाच्या पाठीमागे असलेल्या म्हाळसाकांत खंडोबा, म्हाळसाई, बाणाईच्या सजवलेल्या विलोभनीय सर्वांगसुंदर मूर्ती, मोगऱ्याच्या व अत्तराच्या सुंगधाने दरवळून गेलेला धामणीच्या श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान मंदिर परिसर व मंदिराच्या आवारात ढोलकी, डफडे, ताशा, संबळ, सनई, तुतारीच्या पारंपारिक वाद्याचा सुरु असलेला गजर कपाळभर उटी व भंडारा लावून "सदानंदाचा येळकोट"चा जयघोष करणारे खंडेरायाचे भाविक आणि आबालवृध्द महिलांचा उस्फूर्त सहभाग हे सारे भक्तिमय वातावरण वासंतिक चंदनउटीच्या सोहळ्याच्या निमित्ताने धामणी येथील पुरातन श्री म्हाळसाकांत खंडोबा मंदिरात शनिवारी चैत्र पौर्णिमेला (दिं.१२) रोजी भल्या पहाटे पाहावयास मिळाले. चैत्र महिण्यात उष्णतेचा दाह वाढू लागलेला असल्यामुळे तिव्र उन्हापासून देवाला शीतलता मिळावी यासाठी चैत्री पाडव्यापासून मृग नक्षत्राने पावसाळ्याची सुरुवात होईपर्यत चंदनउटी घालण्याची परंपरा आहे.ठिकठिकाणच्या प्रमुख तिर्थक्षेत्राच्या देवस्थान मंदिरामधून देवाच्या मूर्तीला चंदन उटी भक्तिमय वातावरणात केली जाते.यंदाही सगळीकडे उटीचंदनाचा व उटीच्या भजनाचा गुडीपाडव्यापासून प्रारंभ झालेला आहे. चंदनउटीच्या सोहळ्याच्या दिवशी धामणीच्या पुरातन खंडोबा मंदिरात पंचरास मंडळीच्या पारंपारिक वाद्याच्या गजराने व जय मल्हारच्या जयघोषाने मंदिर व परिसरात आनंदी वातावरण दिसून आले.धामणी येथील खंडोबा देवस्थान मंदिरात चैत्र पौर्णिमेच्या दिवशी पहाटे शनिवार (दि.१२) पांच वाजता सूर्यकांत जाधव, शंकुतला जाधव, संदीप भुमकर, चित्रा भुमकर, कैलास वाघ, विठाबाई वाघ,बाळासाहेब लालजी बढेकर, दिपाली बढेकर, मनोज तांबे, सुप्रिया तांबे. शांताराम रोडे, सुरेखा रोडे. सुरेश बढेकर, भारती बढेकर, बाळासाहेब महादू बढेकर, उषा बढेकर, गणपत भांडारकर, रुपाली भांडारकर या नऊ जोडप्यांच्या हस्ते सप्तशिवलिंगाचा अभिषेक व वसंतपूजा करण्यात आली. त्यानंतर खंडोबा,म्हाळसाई,बाणाई व उत्तरमुखी असलेल्या खंडोबाच्या बहिणीच्या जोगेश्वरीचे विशाल देखण्या मूर्तींना वस्त्रालंकार घालण्यात येऊन त्यानंतर भाविकांच्या उपस्थितीत खंडोबाची महाआरती झाल्यानंतर सेवेकऱ्यांनी व मानकऱ्यांन आणलेल्या पुरणपोळी, साजूक तूप,दूध व खसखशीची खीर,सार व भात कुरडई पापडी या पंचपक्वानांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला.

मुद्रांक शुल्क उत्पन्नातील

पन्नास टक्के हिस्सा ग्रा.पं.ना मिळावा : प्रदिप कंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

वाघोली : पुणे जिल्हातील पुणे जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या मुद्रांक शुल्कच्या उत्पन्नातील ५० टक्के हिस्सा पूर्वीप्रमाणे ग्रामपंचायतला मिळावा, अशी मागणी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा पिडीसीसी बँकेचे संचालक प्रदीप कंद, दौंडचे आमदार राहुल कुल व यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या मागणीला मुख्यमंत्री फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. यामुळे जिल्ह्यातील आठशे ग्रामपंचायतीना मुद्रांक शुल्क निधीचा फायदा होणार आहे.

मुद्रांक शुल्क उत्पन्नातील ५० टक्के हिस्सा हा पुणे जिल्हा परिषद व ५० टक्के हिस्सा हा संबंधित ग्रामपंचायतला देण्याची तरतूद होती. पुणे महानगर क्षेत्राच्या विकासासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (पीएमआरडीए) स्थापना झाल्यानंतर त्यांना कोणताही उत्पन्नाचा स्रोत नसल्याने ५० टक्के हिस्सा हा पुणे जिल्हा परिषद, २५ टक्के हिस्सा हा संबंधित ग्रामपंचायत व २५ टक्के हिस्सा पीएमआरडीए अशी तरतूद करण्यात आली होती. जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची आर्थिक स्थिती पाहता व पीएमआरडीएकडे वाढलेल्या उत्पन्नाचा स्त्रोत पाहता,या २५ टक्के हिस्स्याची आवश्यकता पीएमआरडीएला नसल्याने सदर तरतूद रद्द करून पुणे जिल्हातील मुद्रांक शुल्कच्या उत्पन्नातील ५० टक्के हिस्सा पूर्वीप्रमाणे ग्रामपंचायतला मिळण्याची आवश्यकता आहे.

पुणे जिल्ह्यातील पुणे जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या मुद्रांक शुल्कच्या उत्पन्नातील ५० टक्के हिस्सा पूर्वीप्रमाणे ग्रामपंचायतला मिळण्याबाबत संबंधितांना आदेश व्हावेत, असे या मागणीचे निवेदन आमदार राहुल कुल व प्रदीप कंद यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना दिले. त्यावर याबाबत अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात येतील,असे फडणवीस यांनी सांगितले.

पुणे महानगर प्रादेशिक प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीत आठशे ग्रामपंचायतींचा समावेश होतो.

वेदना मांडणारी कविता चिरंतन टिकते

पुणे : 'कविता वेदनेतूनच जन्म घेते आणि जी कविता समाजाच्या वेदना मांडून नवा आशेचा किरण दाखवू पाहते, ती काळाच्या पटलावर चिरंतन राहते,' असे मत प्रसिद्ध अभिनेत्री व कवयित्री मधुराणी गोखले-प्रभुलकर यांनी व्यक्त केले. या संमेलनात निमंत्रित म्हणून धनश्री देशपांडे-गणात्रा, डॉ. मृदुला कुलकर्णी, डॉ. मुझफ्फर शेख, विजया देव, प्रा. डॉ. के. जी. पठाण, तान्हाजी बोऱ्हाडे, नीलेश शीला नामदेव यांनी सादर केलेल्या कवितांनी बहार आणली. विभागाचे प्रमुख डॉ. संजय तांबट, फाउंडेशनच्या अध्यक्षा सुवर्णा इंदोरे याप्रसंगी उपस्थित होते. संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागातील प्रतिक्षा गव्हाणे, ओमकुमार वाघमोडे, क्रांती यादव, सचिन करचे, आदिती गायकवाड, चंद्रकांत कांबळे, महेश बदने, वैष्णवी सुळके, अजिंक्य एकाड, ओंकार राख या उदयोन्मुख कवी-कवयित्रींनीही कविता सादर करून संमेलनात रंगत आणली. फाउंडेशनचे सचिव ॲड. ज्ञानेश्वर इंदोरे यांनी प्रास्ताविक केले. वंदना कोटींकर यांनी सूत्रसंचालन केले, तर सुनयना सोनवणे यांनी आभार मानले.

तुळशीबाग श्रीराम मंदिरात हनुमान जयंती सोहळा

पुणे : मारुतीराया बलभीमा, भजनालागी द्या प्रेमा... श्रीराम-लक्ष्मण-जानकी... जय बोलो हनुमान की... अशा शब्दांत हनुमानाच्या चरित्राचे वर्णन करीत हनुमान जन्माचे कीर्तन पेशवेकालीन तुळशीबाग राममंदिरात पार पडले. श्रीराम-लक्ष्मण-सीतेच्या मूर्तीसमोर असलेल्या पाषाणातील उभ्या हनुमानाच्या मूर्तीला हनुमान जयंतीनिमित्त रेशमी वस्त्रे व दागिने घालण्यात आले होते. तर, मंदिरावर आकर्षक फुलांची सजावट देखील करण्यात आली. श्री रामजी संस्थान तुळशीबाग च्यावतीने श्रीराम जन्मोत्सवानिमित्त तुळशीबाग येथील राम मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याची सांगता हनुमान जयंतीच्या दिवशी झाली. संस्थानचे कार्यकारी विश्वस्त भरत तुळशीबागवाले, विश्वस्त डॉ. रामचंद्र तुळशीबागवाले, कोटेश्वर तुळशीबागवाले, रामदास तुळशीबागवाले, श्रीपाद तुळशीबागवाले, राघवेंद्र तुळशीबागवाले यांसह तुळशीबागवाले परिवार उपस्थित होता.

डॉ.आंबेडकर जयंती दिनी आझम कॅम्पसची मिरवणूक

पुणे : महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटी (आझम कॅम्पस)च्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.पी.ए.इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१४ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता आझम कॅम्पस(पुणे कॅम्प) येथून या मिरवणुकीला प्रारंभ होणार आहे.मिरवणुकीने जाऊन महात्मा गांधी रस्त्यावरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात येणार आहे.संस्थेचे विश्वस्त,पदाधिकारी,प्राचार्य,प्राद्यापक-शिक्षक,कर्मचारी,विद्यार्थी या मिरवणुकीत सहभागी होतील.महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्रा.इरफान शेख यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.

हुल्लडबाजांवर कारवाई करण्याची मागणी

खडकवासला : किल्ले सिंहगडावर न्यूझीलंड वरून आलेल्या पर्यटकाबरोबर काही तरुणांनी गैरव्यवहार केल्याची व्हिडीओ क्लिप समाज माध्यमांवर प्रसिद्ध झाली आहे. या तरुणांनी किल्ल्याचे पावित्र्य भंग केले आहे. तसेच या पर्यटकाला मराठी भाषेतील अश्लाघ्य शब्द बोलण्यास सांगितले. त्याचे भाषेबद्दल असलेल्या अज्ञानाचा गैरफायदा घेतला. या तरुणांना शोधून काढून त्यांचे वर गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्यात यावी. याप्रसंगी इतिहास संशोधक डॉ. नंदकिशोर मते, विधानसभा प्रमुख नितीन वाघ, विभागप्रमुख महेश पोकळे, संघटक तानाजी गाढवे, केतन शिंदे, महेश विटे, कल्पेश वाजे,आकाश कुमावत, सिंहगड ट्रेकरचे किरण पाटील, ॲड. प्रकाश केदारी, बाळासाहेब मंडलिक, आशिष पार्टे, वेद बुटाला आणि इतर सामाजिक संघटना व राजकीय पक्षाचे पदाधिकारी देखील उपस्थित होते.

विद्यापीठ चौकातील समतल विलगकास मान्यता

वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अफलातून उपाय; खर्चही कमी होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : गणेशखिंड रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उड्डाणपूल, मेट्रोचे काम आता अंतिम टप्प्याकडे जात असताना महापालिकेने आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आचार्य आनंद ऋषिजी चौकात (पुणे विद्यापीठ चौक) 'समतल विलगक' (ग्रेड सेप्रेटर) बांधले जाणार असून, त्यासाठीच्या ७० कोटीच्या खर्चाला पूर्वगणनपत्रक समितीने (इस्टिमेट कमिटी) आज (ता. ११) मंजुरी दिली. शिवाजीनगरकडून औंधकडे जाणाऱ्या विलगकाची लांबी कमी केल्याने ३० कोटी रुपयांची बचत होणार आहे. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत यास मान्यता देण्यात आली.

असा आहे 'समतल विलगक'

- हा समतल विलगक शिवाजीनगरकडून औंधच्या दिशेने जाण्यासाठी बांधला जाणार आहे.
- याची लांबी २१० मीटर आणि रुंदी ८ मीटर (दोन लेन) असेल.
- या कामाला अंदाजे ७० कोटी रुपये खर्च येणार असून, दोन वर्षांत ते पूर्ण होईल.

खर्चामध्ये होणार बचत

- महापालिकेच्या पूर्वीच्या नियोजनानुसार हा समतल विलगक शासकीय शासकीय तंत्रनिकेतन संस्थेपासून सुरु होणार होता.
- त्यामुळे केवळ गणेशखिंड रस्त्यावरील नागरिकांचा त्याचा वापर करता येणार होता.
- महापालिकेने या समतल विलगकाची लांबी ३०० मीटरने कमी केल्याने बापट रस्त्यावरील वाहतुकीसाठी तो वापरता येईल.
- यामुळे३० कोटी रुपयांची बचत होणार आहे

प्रकल्पाचे महत्त्व

- गणेशखिंड रस्त्यावर नेहमीच वाहतूक कोंडी होते. विद्यापीठ चौकात दुमजली उड्डाणपूल बांधण्याचे काम सुरू आहे, ते लवकरच पूर्ण होईल.
- यामुळे पाषाण आणि बाणेरकडे जाणाऱ्या लोकांना मोठा दिलासा मिळणार आहे.
- उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर समतल विगलकाचे काम सुरू होईल.
- गणेशखिंड रस्ता आणि सेनापती बापट रस्त्यावरून औंधकडे जाणाऱ्या वाहनांना या विगलकाचा वापर करता येईल.
- नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून हे काम लवकर पूर्ण करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.

पर्यावरणपूरक जीवनशैली ही काळाची गरज - दत्तात्रय भरणे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : पर्यावरणाची हानी करून मानवी विकास करणे हितावह ठरणार नसून विकास आणि पर्यावरण या दोन्ही गोष्टी साध्य करण्यासाठी पर्यावरणपूरक जीवनशैली आत्मसात करणे ही काळाची गरज आहे, असे मत राज्याचे क्रीडा, युवक अल्पसंख्यांक विकासमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केले.

रोटरी इंटरनॅशनलने पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी प्रकल्प राबवण्यास कायमच प्रथम प्राधान्य दिले आहे. या अनुषंगाने रोटरी क्लब ऑफ पुणे विझडम आणि सिनर्जी क्लब्ज ऑफ रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ तर्फे आयोजित दोन दिवसयी ग्रीन एक्स्पोचे उद्घाटन आज राज्याचे क्रीडा, युवक अल्पसंख्यांक विकासमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर किशोर पंप्सचे चेअरमन आणि कार्यकारी संचालक किशोर देसाई, डिस्ट्रीक्ट गव्हर्नर शीतल शहा, रोटरी पर्यावरण समितीचे संचालक वसंतराव माळुंजकर, ग्रीन एक्स्पोचे प्रकल्प संचालक केशव ताम्हनकर, रोटरी क्लब ऑफ पुणे विझडमचे अध्यक्ष नीलेश धोपाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

रविवारी सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत ग्रीन एक्स्पो नागरिकांसाठी विनामूल्य खुला आहे. हा ग्रीन एक्स्पो यशस्वी करण्यासाठी रोटरी बरोबरच पुणे मेट्रो, टाटा ग्रीन बॅटरिज, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघ, श्रॉफ फौंडेशन आणि सनगेट सोलार यांचे सहकार्य लाभले आहे.

यावेळी बोलताना राज्याचे क्रीडा, युवक अल्पसंख्यांक विकासमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, पर्यावरण जागृतीसाठी विविध संस्था आणि नागरिकांनी पुढे येऊन ग्रीन एक्स्पोसारखे उपक्रम राबविणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपल्या वैयक्तीक जीवनात पर्यावरणाला प्राधान्य दिले, तर अनेक प्रश्न मार्गी लागू शकतील.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोटरी क्लब ऑफ पुणे विझडमचे अध्यक्ष नीलेश धोपाडे यांनी केले. रोटरी क्लब ऑफ पुणे विझडमच्या स्वाती यादव यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रशांत आकलेकर यांनी आभार मानले.

रोटरी इंटरनॅशनलने पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी प्रकल्प राबवण्यास कायमच प्रथम प्राधान्य दिले आहे. या अनुषंगाने रोटरी क्लब ऑफ पुणे विझडम आणि सिनर्जी क्लब्ज ऑफ रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ तर्फे गणेश कला क्रीडा रंगमंच येथेआयोजित दोन दिवसीय ग्रीन एक्स्पोचे आज उद्घाटन केल्यानंतर मार्गदर्शन करताना राज्याचे क्रीडा, युवक अल्पसंख्यांक विकासमंत्री दत्तात्रय भरणे.

मग आम्हालाही रस्त्यावर उतरावे लागेल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : अभिनेता प्रतिक गांधी आणि अभिनेत्री पत्रलेखा हे फुले या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या सिनेमात प्रतिक महात्मा फुले यांच्या भूमिकेत आहे, तर पत्रलेखा सावित्रीबाई फुले यांच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. या सिनेमातून फुले दाम्पत्यांच्या संघर्षमय इतिहास पाहायला मिळणार आहे.

या सिनेमावर लक्ष्मण हाके यांनी महात्मा ज्योतिबा फुले हयात असताना पाखंडी लोकांनी विरोध केला आज ही काही पाखंडी लोकं आहेत. इतिहास कोणी पुसणार नाही, विरोध जर केला तर आम्हाला सुद्धा रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी दिला.

आज महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती असल्याने त्यांना अभिवादन करण्यासाठी अनेक नेते मंडळी पुण्यात दाखल झाले आहेत. समता परिषदेचे अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी महात्मा फुले वाड्याच्या जमिनीच्या अधिग्रहाणाबाबत पालिकेतील अधिकार टोलवाटोलवी करत असल्याचे सांगितले. यावर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी देखील आपली स्पष्ट भूमिका जाहीर केली आहे.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती कार्यक्रमाला अनेक नेते त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी आले होते. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी देखील महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीला अभिवादन केले. यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी ओबीसी आरक्षणावर भाष्य केले. तसेच भिडे वाड्याच्या प्रश्नावर सरकारने ॲक्शन मोडमध्ये आलं पाहिजे, असे देखील ते म्हणाले.

महापालिकेत लोकनियुक्त माणसे नाहीत. स्थानिक स्वराज्य निवडणुका होत नाहीत. महामानवांच्याबाबत त्यांना काय पडलं आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ओबीसीचे आरक्षण वाचवा आणि लवकर निवडणुका घ्या, अशी मागणी त्यांनी केली. जनतेच्या प्रश्नावर, भिडे वाड्याच्या प्रश्नावर सरकारने ॲक्शन मोडमध्ये आलं पाहिजे, असे देखील हाके यांनी सांगितले. ओबीसी आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर सरकारकडे इम्पेरिकल डेटा गोळा करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे करत आहेत.

बंधुतेचा विचार मानवी जीवनात समानता, सन्मान देणारा

डॉ. अश्विनी धोंगडे यांचे प्रतिपादन; २७ व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाचे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : "भवतालात अन्याय, अत्याचाराच्या घटना घडताहेत. महिला सुरक्षेचा मुद्दा दिवसेंदिवस गंभीर होतोय. जाती-धर्माच्या नावावर समाज विभागला जात आहे. आर्थिक विषमता वाढतेय. अशावेळी मानवी जीवनात समानतेचा धागा विणून प्रत्येक घटकाला सन्मान देणारा बंधुतेचा विचार अधिक व्यापक व्हायला हवा," असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिका डॉ. अश्विनी धोंगडे यांनी केले.

स्वांतत्र्य व समता आणण्यासाठी कायद्याचा उपयोग होऊ शकतो; मात्र, बंधुता काळजातून यावी लागते. त्यामुळे संविधान आदर्शवादी आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी करून प्रत्येक व्यक्तीला समान न्याय, स्वातंत्र्य आणि सन्मानाची वागणूक द्यायची असेल, तर त्याला बंधुतेच्या विचारांची जोड द्यावीच लागेल, असे प्रतिपादन २७ व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, ज्येष्ठ विचारवंत प्रा. सुभाष वारे यांनी केले.

विश्वबंधुता साहित्य परिषद, रयत शिक्षण संस्थेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय आणि काषाय प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २७ व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाच्या उद्घाटनावेळी डॉ. धोंगडे उद्घाटक म्हणून बोलत होत्या. ज्येष्ठ विचारवंत प्रा. सुभाष वारे यांच्या अध्यक्षतेखाली नवी पेठेतील एस. एम. जोशी फाउंडेशनच्या सभागृहात झालेल्या संमेलनात स्वागताध्यक्ष कृष्णकुमार गोयल, विश्वबंधुता साहित्य परिषदेचे अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे, कार्याध्यक्ष डॉ. विजय ताम्हाणे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण आंधळे, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. चंद्रकांत वानखेडे, कादंबरीकार शंकर आथरे आदी उपस्थित होते.

२७ व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाच्या उदघाटनप्रसंगी डावीकडून संगीता झिंजुरके, प्रा. डॉ. अरुण आंधळे, डॉ. विजय ताम्हाणे, डॉ. अश्विनी धोंगडे, प्रा. सुभाष वारे, बंधुताचार्य प्रकाश रोकडे, प्रा. चंद्रकांत वानखेडे, प्रा. शंकर आथरे.

दि. १९ व दि. २० रोजी ज्येष्ठ, युवा कलाकारांना ऐकण्याची पर्वणी

धायरीत घुमणार संगीत महोत्सवाचा 'ब्रह्मनाद'...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : ब्रह्मनाद कला मंडळ आणि धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठान, धायरी यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय २४ व्या ब्रह्मनाद संगीत महोत्सवाचे शनिवार, दि. १९ आणि रविवार, दि. २० एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ कलाकारांसह युवा कलाकारांचा सहभाग हे यंदाच्या महोत्सवाचे वैशिष्ट्य असणार आहे.

एकेकाळी 'सोन्याची पायरी' म्हणून ओळख असलेल्या धायरी या पुण्यातील उपनगरात किराणा घराण्याचे सुप्रसिद्ध गायक पंडित श्रीकांत देशपांडे यांच्या ईच्छेनुसार डॉ. पंडित संजय गरुड शास्त्रीय संगीताचा प्रचार व प्रसार करत आहेत. गेल्या २४ वर्षांपासून शास्त्रीय संगीताची बीजे रुजविण्याबरोबरच ब्रह्मनाद कला मंडळातर्फे संगीत महोत्सवाचे आयोजन केले जाते. या महोत्सवात अनेक ज्येष्ठ व नामवंत कलाकारांनी सादरीकरण केले आहे.

यंदाचा महोत्सव सायंकाळी ५.३० ते १० या वेळात कै. बंडोजी खंडोजी चव्हाण विद्यालयातील राजमाता जिजाऊ माँसाहेब बहुउद्देशिय सभागृहात होणार आहे. संगीत महोत्सवानिमित्त दिल्या जाणाऱ्या ह. भ. प. मारुतीराव गरुड स्मृती ब्रह्मनाद पुरस्काराने प्रसिद्ध शहनाईवादक डॉ. पंडित प्रमोद गायकवाड यांचा गौरव केला जाणार असल्याची माहिती महोत्सवाचे संयोजक, किराणा घराण्याचे प्रसिद्ध गायक डॉ. पंडित संजय गरुड आणि धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठानचे संचालक अनिकेत चव्हाण यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. ब्रह्मनाद कला मंडळाच्या संचालिका रागिणी गरुड, सुभाष चाफळकर, मिलिंद जोशी या वेळी उपस्थित होते. महोत्सव सर्वांसाठी खुला आहे.

महोत्सवाच्या पहिल्या दिवसाची (दि. १९) सुरुवात प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित डॉ. राम देशपांडे यांचे सुपुत्र आणि शिष्य गंधार देशपांडे यांच्या गायनाने होणार आहे. त्यानंतर पंडित तुळशीदास बोरकर यांचे शिष्य प्रसिद्ध संवादिनी वादक पंडित सुधीर नायक यांचे एकल संवादिनी वादन होणार असून पहिल्या दिवसाच्या महोत्सवाची सांगता प्रसिद्ध गायिका विदुषी पद्मा देशपांडे यांच्या गायनाने होणार आहे. विदुषी हिराबाई बडोदेकर आणि विदुषी सरस्वतीबाई राणे यांच्याकडून देशपांडे यांनी किराणा घराण्याच्या गायकीचे प्रशिक्षण घेतले आहे.

पुरस्कार वितरण सोडळ्यानंतर पंडित रघुनाथ खंडाळकर यांचे सुपुत्र आणि शिष्य सुरंजन व शुभम खंडाळकर यांची गायन जुगलबंदी होणार आहे. त्यानंतर विदुषी राजश्री पाठक यांचे गायन होणार असून महोत्सवाची सांगता डॉ. पंडित संजय गरुड यांच्या गायनाने होणार आहे. पाठक या विदुषी शोभा गुर्टू यांच्या शिष्या असून उपशास्त्रीय संगीतात त्यांचे विशेष प्राविण्य आहे. पंडित गरुड हे किराणा घराण्याचे सुप्रसिद्ध गायक पंडित श्रीकांत देशपांडे यांचे शिष्य आहेत. किराणा घराण्याची गायन परंपरा ते प्रवाहित ठेवत आहेत.

कलाकारांना उदय कुलकर्णी, माधव लिमये, तुषार केळकर (संवादिनी), पंडित अरविंदकुमार आझाद, रोहन पंढरपूरकर, ऋषिकेश जगताप (तबला), माऊली दुधाणे, माऊली फाटक (पखवाज) साथसंगत करणार आहेत. महोत्सव सर्वांसाठी खुला आहे.

डॉ. पंडित प्रमोद गायकवाड यांना 'ब्रह्मानंद' पुरस्कार

- महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी (दि. २०) सुप्रसिद्ध शहनाईवादक डॉ. पंडित प्रमोद गायकवाड यांचा २४वा ब्रह्मनाद पुरस्कार देऊन गौरव केला जाणार आहे. पंडित गायकवाड हे शहनाई आणि सुंद्री वादनाच्या परंपरा असलेल्या कुटुंबातून आले असून त्यांना वादनाचे प्रशिक्षण त्यांचे आजोबा सनईसम्राट शंकररावजी गायकवाड तसेच वडिल सुरमणी पंडित प्रभाशंकर गायकवाड आणि काका कृष्णा गायकवाड यांच्याकडून मिळाले आहे.

नाओमिकाने लक्ष वेधले

राजेश खन्ना आणि डिंपल कपाडिया हे मनोरंजनविश्वातील एक लोकप्रिय दांपत्य. त्यांना दोन मुली आहेत. त्यातील ट्विंकल खन्नाने काही बॉलिवूड चित्रपटांमध्ये काम केले पण अभिनय सोडून लेखिका बनली. दुसरी रिंकी खन्नाला अभिनयात यश मिळाले नाही. तशी ती कायमच प्रसिद्धीपासून दूर गेली. आजकाल तर रिंकी क्वचितच दिसते पण तिची मुलगी नाओमिका सरन मात्र सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. नाओमिका सरन ग्लॅमरस जगापासून दूर असली तरी ती कधीकधी आजी डिंपल कपाडियासोबत पार्टी किंवा कार्यक्रमात दिसते. प्रत्येक वेळी आपल्या अपूर्व सौंदर्याने ती लोकांचे लक्ष वेधून घेते. अलिकडेच ती डिंपल कपाडियासह 'मॅडॉक फिल्म्स'च्या २० व्या वर्धापन दिनाच्या पार्टीत सहभागी झाली होती. तिने अत्यंत स्टायलिश अवतारात एन्ट्री घेतली. यावेळी ६७ वर्षीय डिंपलने तपकिरी आणि पांढरा रंगाचा ड्रेस घातला होता. मोजक्या स्टेटमेंट ज्वेलरींमध्ये तीही सुंदर दिसत होती. आपल्या देखण्या आजीसह नाओमिका सरन काळ्या रंगाच्या बॉडी हगिंग ड्रेसमध्ये वावरत होती. सोनेरी स्टेटमेंट ज्वेलरी, काळी पर्स आणि काळ्या हिल्सने तिचा लूक सजला होता. मोकळ्या केसांनी आणि चमकदार मेकअपने तिचे सौंदर्य द्विगुणीत होत होते.

हा व्हिडिओ सोशल मीडियावर येताच लोकांनी नाओमिकाच्या सौंदर्याचे आणि हास्याचे कौतुक करायला सुरुवात केली. एकाने म्हटले, 'ती खूप गोंडस आहे' तर एकाने टिप्पणी दिली, 'तिला आजोबांचे डोळे वारशाने मिळाले आहेत.' एकाने तर म्हटले की, ती ट्विंकल खन्नासारखी दिसते. एकूणच लोक रिंकी खन्नाच्या मुलीचे कौतुक करत आहेत.

नाओमिका सरन लवकरच बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार असल्याचीही बातमी आहे. दिनेश विजन 'मॅडॉक फिल्म्स'च्या बॅनरखाली एक रोमँटिक-कॉमेडी चित्रपटाची निर्मिती सुरू असून त्यामध्ये नाओमिका मुख्य भूमिकेत असेल. अमिताभ बच्चन यांचा नातू अगस्त्य नंदा तिच्यासह या चित्रपटात बघायला मिळेल.

'भरत कुमार'ला भावपूर्ण श्रद्धांजली



गेल्या काही दिवसांपासून मनोरंजन विश्वातून सतत हृदयद्रावक बातम्या येत आहेत. प्रथम ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांच्या निधनाची बातमी आले. नंतर प्रसिद्ध अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस यांच्या आईचे निधन झाल्याचे समजले आणि नुकतेच प्रसिद्ध दिवंगत गायक, संगीतकार रवींद्र जैन यांच्या पत्नीनेही जगाचा निरोप घेतल्याची बातमी दु:ख वाढवून गेली. दिव्या जैन यांचे नुकतेच निधन झाले. या बातमीने पुन्हा एकदा इंडस्ट्रीत शोककळा पसरल्याचे दिसले.

ज्येष्ठ अभिनेते आणि दिग्दर्शक मनोज कुमार यांना शासकीय सन्मानाने अंतिम निरोप देण्यात आला. मुलगा कुणाल गोस्वामी यांनी, आपल्या वडिलांनी शांततेने जगाचा निरोप घेतल्याचे सांगितले. मनोज कुमार बऱ्याच काळापासून आरोग्याच्या समस्यांमुळे त्रस्त होते. बऱ्याच काळापासून त्यांना यकृत सिरोसिसचा आजार होता. प्रकृती बिघडल्यानंतर २१ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

रुपेरी पडद्यावर 'भारत कुमार' म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या या ज्येष्ठ अभिनेत्याने मुंबईतील कोकिलाबेन रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. 'उपकार', 'पूरब और पश्चिम', 'क्रांती' आणि 'रोटी-कपडा और मकान' यासारख्या सुपरहिट चित्रपटांसाठी प्रसिद्ध असणाऱ्या या अभिनेत्याच्या निधनाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शोक व्यक्त केला. मनोज कुमार यांना त्यांच्या चित्रपट कारकिर्दीत सात वेळा फिल्मफेअर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १९९२ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते तर २०१६ मध्ये दादासाहेब फाळके पुरस्काराने त्यांचा सन्मान केला होता. आता ते पंचतत्त्वात विलीन झाले असले तरी देशावर नितांत प्रेम करणाऱ्या या देखण्या अभिनेत्याच्या आठवणी कायमच आपल्यासवे राहतील.

'छोरी २'विषयी उत्सुकता शिगेला

'छोरी २' हा विशाल फुरिया दिग्दर्शित हॉरर चित्रपट प्रेक्षकांसमोर येत आहे. या चित्रपटात नुसरत भरुचा आणि सोहा अली खान मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. याशिवाय सौरभ गोयल, गश्मीर महाजनी, पल्लवी अजय, कुलदीप सरन, हार्दिका शर्मा हे कलाकारही चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकांमध्ये आहेत. चित्रपटाचे निर्माते भूषण कुमार, विक्रम मल्होत्रा, कृष्ण कुमार आणि जॅक डेव्हिस असून ३० नोव्हेंबर २०२२ रोजी घोषणा करण्यात आलेल्या या चित्रपटाची प्रेक्षकांना प्रतीक्षा होतीच. तेव्हा २०२१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'छोरी'चा दुसरा भाग कसा असेल हे लवकरच कळेल.

'छोरी २' अमेझॉन प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होत असून तो प्रेक्षकांना भयपट आणि सस्पेन्ससह एक रोमांचक अनुभव देईल. यामध्ये लिंगभेद दाखवला आहे. त्यात भावना आहेत तसेच भयानकताही आहे. ट्रेलरच्या सुरुवातीच्या दृश्यात एक महिला लहान मुलीला गोष्ट सांगताना दिसली आहे. त्यात ती म्हणते, 'एक खूप मोठे राज्य होते. एक राजा होता. त्याच्या घरी एका मुलीचा जन्म झाला. राजाला राग आला. त्यावर गोष्ट ऐकणारी मुलगी विचारते, 'तू का रागावलास?' तर रागाचे कारण म्हणजे राजाला मुलगा हवा होता असं महिला सांगते. मग मुलगी आश्चर्याने विचारते, 'पुढे काय झाले?' तर महिला सांगते, 'राजाने दासीला बोलावले...' एकंदर अशी रहस्य निर्मिती करुन चित्रपट कसा पुढे जातो, हे बघणे रंजक ठरेल. ट्रेलरमध्ये सोहा अली खान बुरखा घातलेली दिसली आहे. एकूणच ट्रेलर खूपच भयानक असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. त्यात दाखवलेली विहीर भीतीची खोल दाखवते. यावेळी कथा आणखी भयानक असल्याचा निर्मात्यांचाही दावा आहे. ट्रेलरला अनेकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने या चित्रपटाविषयी उत्सुकता वाढली आहे.

सुरू होणार नवीन अध्याय

सध्या टॉम क्रूझच्या चाहत्यांचा उत्साह प्रचंड वाढला आहे. बऱ्याच दिवसांपासून 'मिशन इम्पॉसिबल: द फायनल रेकनिंग' बद्दलचे अपडेट्स येत असल्यामुळे प्रेक्षकांच्या नजरा चित्रपटाच्या प्रदर्शन तारखेवर खिळल्या होत्या. आता निर्मात्यांनी चित्रपटाचा जबरदस्त ट्रेलर रिलीज केला असून तो सोशल मीडियावर ट्रेंड करत आहे.

'मिशन इम्पॉसिबल: द फायनल रेकनिंग' मध्ये टॉम क्रूझ पुन्हा एकदा इथन हंटच्या भूमिकेत जबरदस्त ॲक्शनसह परतताना दिसत आहे. या दोन मिनिटे १२ सेकंदांच्या ट्रेलरमध्ये साहस, थरार आणि भावनांचा परिपूर्ण समतोल दिसून येतो. ट्रेलरमध्ये टॉम क्रूझ पूर्ण ॲक्शन मोडमध्ये दिसतो. हाय-स्पीड बाईकचा पाठलाग, जबरदस्त स्टंट आणि प्राणघातक मोहिमा ही 'मिशन इम्पॉसिबल'ची ओळख म्हणावी लागेल. मनोरंजक गोष्ट म्हणजे या आयकॉनिक ॲक्शन फ्रँचायझीचा हा शेवटचा भाग मानला जात असल्याने चित्रपटात पूर्वीच्या काही महत्त्वाच्या पात्रांनाही आणले आहे. त्यामुळेच हा ट्रेलर केवळ ॲक्शनने भरलेला नाही तर प्रेक्षकांशी भावनिकदृष्ट्या जोडण्याचाही एक सर्वोत्तम प्रयत्न आहे. ट्रेलरमध्ये चित्रपटाची कथा उघड केलेली नाही. कथानकातील कोणताही मोठा ट्विस्ट किंवा क्लायमॅक्सची कल्पना याद्वारे देण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे. याद्वारे निर्मात्यांनी सस्पेन्स कायम ठेवला असून प्रेक्षकांना थिएटरकडे आकर्षित करण्यासाठी एक मजबूत आधार तयार केला आहे. हा ट्रेलर चाहत्यांसाठी आठवणींनी भरलेली भेट असून ती एका युगाच्या समाप्तीची झलक देते तर दुसरीकडे नवीन उंची गाठण्याचे आश्वासनही देते. हा चित्रपट २३ मे रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

ही आयकॉनिक ॲक्शन फ्रँचायझी खात्रीने चाहत्यांच्या हृदयात स्थान मिळवेल. ही मालिका १९९६ मध्ये सुरू झाली आणि तेव्हापासूनच प्रत्येक चित्रपटाने ॲक्शन, सस्पेन्स आणि थ्रिलची परिभाषा समोर मांडली. त्याच्या चौथ्या भागात बॉलिवूड अभिनेता अनिल कपूरनेही एक खास कॅमिओ केला होता. स्वाभाविकच याने भारतीय प्रेक्षकांना आकर्षित केले होते.

यानंतर फ्रँचायझीचा पाचवा चित्रपट २०१५ मध्ये आणि सहावा भाग २०१८ मध्ये प्रदर्शित झाला. प्रत्येक चित्रपटाबरोबर कथा आणि कृतीचा स्तर वाढत गेला. सातवा आणि आतापर्यंतचा नवीन अध्याय २०२३ मध्ये प्रदर्शित झाला आणि त्याला समीक्षक आणि चाहत्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. आता प्रेक्षक या मिशनच्या ग्रँड फिनालेची आतुरतेने वाट पाहत आहेत.

रसिकांना न रुचलेली एक्झिट

प्रसिद्ध संगीतकार आणि गायक विशाल दादलानी यांनी अखेर 'इंडियन आयडल'बरोबरचा त्याचा सहा वर्षांचा प्रवास संपवला आहे. या लोकप्रिय गायन रिॲलिटी शोमध्ये त्याने बराच काळ न्यायाधीश म्हणून काम केले. परंतु आता या सीझनच्या शेवटी इंस्टाग्राम पोस्टद्वारे त्याने चाहत्यांना भावनिक निरोप दिला आहे.

विशालने इंस्टाग्रामवर पोस्ट शेअर करून त्याच्या प्रवासाची आठवण काढली. त्यात गायकाने लिहिले, 'अलविदा मित्रांनो. मला या सीझन सहामध्ये आनंद मिळालाच पण त्यापेक्षा जास्त अनेक आठवणी दिल्या. या शो ने मला पात्रतेपेक्षा खूप जास्त प्रेम आणि आदर दिला आहे आणि याबद्दल मी नेहमीच आभारी राहीन.'

तो पुढे लिहितो,'मी इंडियन आयडल सोडण्याचे कारण म्हणजे आता मला वेळ परत हवा आहे. मी वर्षातील सहा महिने मुंबईत राहू शकत नाही. तेव्हा आता पुन्हा स्टेजवर येण्याची, संगीत देण्याची आणि लाईव्ह कॉन्सर्ट करण्याची वेळ आली आहे. यापुढे कदाचित पुन्हा कधीही मी मेकअप करणार नाही.'

विशाल दादलानी केवळ प्रसिद्ध संगीतकारच नाही तर 'विशाल-शेखर' जोडीचा भाग म्हणून त्याने 'ओम शांती ओम', 'चेन्नई एक्सप्रेस', 'बँग बँग' आणि 'वॉर' सारख्या बॉलिवूडमधील हिट चित्रपटांना संगीत दिले आहे. तसेच तो सामाजिक आणि राजकीय मुद्यांवर उघडपणे विचार व्यक्त करण्यासाठीही ओळखला जातो. विशालच्या शो मध्ये नसण्याने चाहते केवळ दुःखीच झाले नाहीत तर 'इंडियन आयडल'च्या जगात मोठी पोकळी निर्माण झाल्याचे अनेकजण मानतात. आदित्य नारायणने देखील विशालच्या निर्णयावर प्रतिक्रिया देताना 'एक युग संपत आहे. तुमच्याशिवाय इंडियन आयडल पूर्वीसारखे राहणार नाही' असे म्हटले आहे.

'इंडियन आयडल'चा हा सीझन संगीतप्रेमींसाठी संस्मरणीय ठरला. हा कार्यक्रम गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये सुरू झाला आणि देशभरातील हजारो गायकांनी त्यात नशीब आजमावले. अनेक महिन्यांच्या स्पर्धेनंतर आणि कठोर निर्णयानंतर अंतिम फेरीत मानसी घोष, सुभोजित चक्रवर्ती, स्नेहा शंकर, चैतन्य देवधे, प्रियांशु दत्ता आणि अनिरुद्ध सुस्वरम हे स्पर्धक होते.

सर्वांनीच उत्तम सादरीकरण केले असले तरी शेवटी मानसी घोषने शक्तिशाली आणि भावपूर्ण गायनामुळे या हंगामाची ट्रॉफी जिंकली. खऱ्या समर्पणाने आणि कठोर परिश्रमाने कोणतेही ध्येय साध्य करता येते, हेच या सगळ्यांच्या प्रवासाने सिद्ध केले.

एसीपी प्रद्युम्नला निरोप?

'सीआयडी' टीव्हीवरील सर्वात जास्त काळ प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांपैकी एक आहे. सस्पेन्स आणि थ्रिलने भरलेला हा शो गेल्या दोन दशकांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. तो गेल्या महिन्यात तब्बल सात वर्षांनी परतला पण आता एका बातमीने सर्वांनाच दुःख झाले आहे. एसीपी प्रद्युम्नची भूमिका 'सीआयडी २' मधून काढून टाकण्यात आली आहे. ही भूमिका प्रसिद्ध अभिनेते शिवाजी साटम यांनी साकारली होती. त्यांनी २० वर्षे प्रद्युम्नची भूमिका रंगवली. यातील त्यांचे संवाद खूप प्रसिद्ध, लोकप्रिय झाले. पण आता तरुण अभिनेता पार्थ समथान त्यांची जागा घेत आहे. तो या शोमध्ये एसीपी आयुष्मानची भूमिका साकारताना दिसणार आहे. पार्थ समथानने नवीन एसीपी म्हणून सीआयडीमध्ये सामील होण्याच्या वृत्ताला दुजोरा दिल्यापासून 'सीआयडी' हा हॅशटॅग सोशल मीडियावर ट्रेंड करत आहे. काही लोक पार्थच्या आगमनाचा आनंद साजरा करत आहेत तर काही एसीपी प्रद्युम्नच्या बदलीमुळे नाराज आहेत. एकूणच सोशल मीडियावर सीआयडीचे चाहते विभागले गेले आहेत. काही लोक निर्मात्यांवर राग काढत आहेत तर काहींना कदाचित त्यांचा लाडका अभिनेता पुन्हा शोमध्ये येण्याची आशा आहे. काही लोक तर पार्थऐवजी अभिजीत किंवा दया यांना नवीन एसीपी बनवायला हवे होते, असेही म्हणत आहेत.

वाद रंगला पण यश लाभले

'एल२ एम्पुरन' या ॲक्शनने भरलेल्या चित्रपटाची कथा प्रेक्षकांना खूपच आवडली आहे. मोहनलाल आणि पृथ्वीराज सुकुमारन यांच्या उत्तम अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात खास स्थान निर्माण केले आहे. त्याचा थेट परिणाम चित्रपटाच्या कलेक्शनवर दिसून येत आहे.

२१ कोटी रुपयांची ओपनिंग असणाऱ्या या चित्रपटाला रिलीजनंतर अनेक वादांना तोंड द्यावे लागले. पण 'कठोर परिश्रम करणारे कधीही हारत नाहीत' ही म्हण निर्मात्यांनी खरी करून दाखवली. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर सातत्याने उत्तम कलेक्शन करत आहे. चित्रपटाने रिलीजच्या

१२ व्या दिवशी १.५६ कोटी रुपये कमावले आहेत. त्यानंतरही प्रत्येक दिवशी चांगले कलेक्शन होत आहे. त्यामुळेच चित्रपटाचे एकूण कलेक्शन ९९.९१ कोटींच्या घरात पोहोचल्याचे कळते. याचा थेट अर्थ असा की, चित्रपटाने फक्त भारतातच १०० कोटी कमावले आहेत. मल्याळम चित्रपट उद्योगासाठी ही नक्कीच आनंदाची गोष्ट आहे. मोहनलालने त्याच्या इंस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करताना सांगितले की, 'या चित्रपटाने जगभरात २५० कोटींहून अधिक कमाई केली आहे.

'एल२ एम्पुरन' हा पृथ्वीराज सुकुमारन दिग्दर्शित २०१९ च्या ब्लॉकबस्टर चित्रपट 'लुसिफर'चा सिक्वेल आहे. या ॲक्शन थ्रिलरमध्ये राजकीय षडयंत्र, गुंड नाटक आणि जागतिक माफिया नेटवर्कची कथा प्रभावीपणे दाखवण्यात आली आहे. चित्रपटात मोहनलाल मुख्य भूमिकेत असून विवेक ओबेरॉय, मंजू वॉरियर आणि इतर दिग्गज कलाकारांची चांगली साथ मिळाल्यामुळे चित्रपटाची लोकप्रियता वाढत असून बॉक्स ऑफिसवर तो उत्तम कमाई करत आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे या चित्रपटाबद्दल आधी बराच वाद होता. २००२ च्या गुजरात दंगलींबद्दल बरेच काही दाखवण्यात आल्याने प्रेक्षकांचा एक गट या चित्रपटावर बंदी घालण्याचीही मागणी करताना दिसला. परंतु वादानंतर सीबीएफसीने मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आणि निर्मात्यांना चित्रपटात २४ कट करण्यास सांगितले. यानंतर मोहनलाल, पृथ्वीराज आणि निर्मात्यानेही या वादावर निवेदने जारी केली.

सुहास्य तुझे...!

अलिकडेच 'स्त्री २' चे दिग्दर्शक अमर कौशिक यांनी एका मुलाखतीमध्ये श्रद्धा कपूरच्या हास्याचे वर्णन चेटकिणीसारखे... असे केले होते. अर्थातच या कमेंटवर आता अभिनेत्रीने प्रतिक्रिया दिली आहे. अलिकडेच एका कार्यक्रमाच्या निमित्ताने ती अमर कौशिक यांना भेटली. तेव्हा आपल्या कॉमेंटवर कौशिक यांनी श्रद्धाची सर्वांसमोर माफी मागितली आणि या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

ही क्लिप व्हायरल झाली असून त्यात दोघेही पापाराझींसाठी पोझ देत मजा करताना दिसत आहेत. यावेळी अभिनेत्रीने मोठ्याने हसून अमरला चिडवल्याचे दिसत आहे. इतकेच नव्हे तर श्रद्धा कपूरने अमरला चिडवत म्हटले की, आजकाल तो खूप विनोद करतोय. श्रद्धाने असे म्हटल्यावर अमरने कान धरले आणि तिची माफी मागितली. त्यानंतर श्रद्धाने त्याला आणखी चिडवले आणि म्हणाली, 'चला याला आणखी थोडे घाबरवू या...' यानंतर दिग्दर्शकाने, 'मला भीती वाटते पण सर्वात जास्त भीती तुझ्या चाहत्यांची वाटते...' असे म्हणत खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा संपवण्याचा प्रयत्न केलेला दिसला. या कार्यक्रमात श्रद्धा कॅज्युअल लूकमध्ये दिसली. तिने पांढऱ्या टी-शर्टसोबत डेनिम जीन्स घातली होती. लूक साधाच ठेवला होता. अर्थातच कॅज्युअल लूकमध्येही ती खूप सुंदर दिसत होती.

अलिकडच्याच एका मुलाखतीत अमर कौशिक यांनी श्रद्धा कपूरला 'स्त्री'मध्ये का घेतले हे सांगितले. श्रद्धाच्या कास्टिंगचे श्रेय दिनेश विजान यांना जाते, असे ते यावेळी म्हणाले. एका फ्लाइटमध्ये भेटताच श्रद्धाला कास्ट करण्यास त्यांनी होकार दिला, असे यावेळी त्यांनी स्पष्ट केले. दिनेशला श्रद्धाचे हास्य विशेष आवडले होते. दिग्दर्शकाने असेही सांगितले की, पहिल्यांदा भेटला तेव्हा त्याने प्रथम श्रद्धाला हसण्यास सांगितले होते. अर्थात लोकांना त्यांचे हे विधान अजिबात आवडले नाही. त्यानंतर श्रद्धाच्या समर्थकांनी, चाहत्यांनी चांगलेच ट्रोल केले. परिणामी अमर कौशिक यांच्यावर माफी मागण्याची वेळ आली.

शिक्षकांच्या बनावट नियुक्त्या

शाळा संचालकांचे दणाणले धाबे; चालकांमध्ये घबराट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



नागपूर : शिक्षकांच्या नियुक्त्या करीत, त्याच्या बनावट शालार्थ आयडीच्या माध्यमातून शासनाला कोट्यवधीचा चुना लावणाऱ्या नीलेश वाघमारे याने आपल्या कार्यकाळात अनेक प्रताप केल्याची माहिती समोर आली आहे. सध्या वाघमारे निलंबित असतानाही आपल्या नेटवर्कच्या माध्यमातून त्याचे काम सुरूच असल्याची माहिती आहेत. विशेष म्हणजे, बोगस नियुक्त्यांचे प्रकरण समोर येताच, शाळा संचालकांचे धाबे दणाणले आहेत. त्यातूनच अनेकांनी अधिकाऱ्यांशी भेटीसाठी मुंबईच्या वाऱ्या सुरू केल्या आहेत.

खासगी शाळांमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बोगस नियुक्त्या करीत, त्यांच्या बनावट शालार्थ आयडीवरून वेतन काढून कोट्यवधीचा भ्रष्टाचार केल्याची बाब उघड झाली. वेतन आणि भविष्य निर्वाह निधी अधीक्षक नीलेश वाघमारे याला याप्रकरणी निलंबित करण्यात आले. गेल्या दहा वर्षांपासून नीलेश वाघमारे या ठिकाणी कार्यरत असताना, त्याने विभागातील येथील काही कर्मचाऱ्यांना हाताशी धरून अनेक घोटाळे केल्याची माहिती आहे.

त्यांच्यावर चौकशी समिती लावून उपसंचालक उल्हास नरड यांनी सायबर पोलिसांकडे तक्रार केली. या तक्रारीच्या चौकशीच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

- नेताम यांच्या काळात ५८० शिक्षकांच्या नियुक्त्या झाल्यात. त्यापैकी ३५ शिक्षकांच्या नियुक्तीची फाईल विभागात उपलब्ध आहेत.
- उर्वरित शिक्षकांच्या नियुक्तीची फाईल अद्याप विभागाकडे नाही.
- बनावट आयडीचा वापर करून त्या माध्यमातून शहर आणि इतर जिल्ह्यातील विविध ठिकाणातून त्या वापरण्यात आल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

कार्यालय बंद झाल्यावरही आयडीचा वापर

- शिक्षकांचे वेतन काढत असताना, शासकीय आयडीवरून कार्यालये बंद झाल्यावरही काम करण्यात आले असल्याचे तपासात उघड झाले आहे. त्यामुळे हा सायबर पोलिसांकडून त्या दिशेनेही तपास सुरू आहे. त्याबाबत संपूर्ण माहिती आल्यावर पोलिसांकडून कारवाई करण्यात येईल.

चौकशी सुरू, कागदपत्रांची मागणी

- भ्रष्टाचाराची दखल घेत शिक्षण विभागाने चौकशी सुरू केली आहे. त्यानुसार, संबंधित शाळांकडून कागदपत्रांची माती मागविण्यात आली आहे. त्यामुळे येत्या काळात संबंधित शाळांवर कारवाईची शक्यता नाकारता येत नाही.

निलंबनाचा आदेश

- नागपूर जिल्ह्यामध्ये सन २०१९ पासून सुमारे ५८० प्राथमिक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक मान्यतेचे तसेच, शालार्थ आयडी प्रदान करण्याच्या आदेशांची कोणतीही शहानिशा न करता, बनावट शालार्थ आयडी प्रदान करुन नियमबाह्य पद्धतीने वेतनास पात्र नसलेल्या शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वेतन अदा केल्याचे प्राथमिक चौकशीमध्ये शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. ज्याअर्थी, निलेश वाघमारे, अधिक्षक, वेतन व भ. नि.नि. पथक (प्राथमिक) जि.प. नागपूर यांचा उपरोक्त नमूद शासकीय निधीच्या अपहारामध्ये सहभाग असल्याचे चौकशीमध्ये आढळून आलेले आहे. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित आहे.

पावणेदोन लाखासाठी शेतकऱ्याची आत्महत्या

नांदेड : मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात अत्यंत धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना घडली आहे. धर्माबाद तालुक्यातल्या पाटोदा (थडी) येथील अल्पभूधारक शेतकरी हरिदास विश्वंभर बोंबले (वय ४०) यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली आहे. हरिदास बोंबले यांनी धर्माबाद तालुक्यातील संताजी आंबेकर यांच्या शेतातील एका बाभळीच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. शेतात सकाळी स्थानिकांनी त्यांचा मृतदेह पाहताच गावात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली असून पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आहे. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आला आहे.

शेतीसाठी घेतलेले १ लाख ८३ हजार रुपयांचे कर्ज थकवल्याने बँकेची थकबाकीची नोटीस आली. येत्या सात दिवसात व्याजासकट कर्ज फेडा अन्यथा कायदेशीर कारवाई करून कर्ज वसूल करू अशी नोटीस आल्याने एवढी रक्कम कशी फेडायची याच्या मानसिक ताणावाखाली येऊन शेतकऱ्याने हे टोकाचे पाऊल उचलले आहे.

मनरेगांतर्गत मंजूर अनेक कामे रद्द; कामांवर परिणाम

अहिल्यानगर : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील (मनरेगा) ३१ डिसेंबर २०२३ पूर्वी मंजूर केलेली; परंतु अद्याप सुरू न झालेली, तसेच यंदाच्या मंजूर आराखड्यातील कुशल खर्च प्रधान कामे थांबवण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. या आदेशामुळे जिल्ह्यात रोहयोमार्फत पूर्वी मंजूर झालेल्या काँक्रीट रस्ते, पेव्हर ब्लॉक, सिमेंट नाला बांध, वैयक्तिक, सार्वजनिक व सामूहिक लाभाच्या अनेक कामांवर परिणाम होणार आहे.

राज्य सरकारच्या या संदर्भातील आदेशात म्हटले आहे, की मनरेगांतर्गत अपूर्ण कामांची संख्या कमी करणे, कृषी संलग्न व नैसर्गिक संसाधनाच्या कामावरील खर्चाचे विहित प्रमाण राखणे, जिल्हा स्तरावरील कुशल खर्चाचे प्रमाण ४० टक्के मर्यादेत राखणे या अनुषंगाने मनरेगांतर्गत कुशल खर्चप्रधान कामे थांबवण्यात आली आहेत. त्यानुसार ३१ डिसेंबर २०२३ पूर्वी कुशल खर्चप्रधान शासनसंमत कामांपैकी जी कामे अद्याप सुरू झालेली नाहीत (हजेरी पत्रक निघालेली नाहीत) अशा कामांची शासनसंमती रद्द करण्यात येत आहे. अशी कामे सुरू करण्यात येऊ नयेत.

शेतकरी कर्जमाफीवर शेट्टी आक्रमक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : राज्यात पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दा तापला आहे, विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी महायुतीच्या नेत्यांकडून कर्जमाफीचे अश्वासन देण्यात आले होते. त्यानंतर राज्यात पुन्हा एकदा महायुतीची सत्ता आहे. महायुतीला राज्यात प्रचंड बहुमत मिळालं. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गट या तीन पक्षांचे राज्यात तब्बल २३२ उमेदवार विजयी झाले. तर महाविकास आघाडीला केवळ ५० जागांवरच समाधान मानावे लागले.

दरम्यान राज्यात आता महायुतीचं सरकार आले आहे, शेतकऱ्यांच्या नजरा कर्जमाफीकडे लागल्या आहेत. मात्र

अजूनही त्याबाबत कोणतीच हालचाल होताना दिसत नाही, दुसरीकडे महायुतीच्या नेत्यांकडून सातत्यानं सुरू असलेल्या वेगवेगळ्या वक्तव्यांमुळे शेतकऱ्यांमध्ये कर्जमाफीवरून संभ्रम निर्माण झाला आहे. याविरोधात आता प्रहार जनशक्ती पक्षाने चांगलीच आक्रमक भूमिका घेतली आहे. बच्चू कडू यांच्या प्रहारच्या कार्यकर्त्यांनी नेत्यांच्या घरासमोर जाऊन आंदोलनाला सुरुवात केली आहे. दरम्यान बच्चू कडू यांच्या या आंदोलनावर प्रतिक्रिया देताना शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी देखील मोठं वक्तव्य केलं आहे.

स्वाभिमानीचाही असाच निर्णय झालेला आहे, महायुतीने निवडणुकीच्या काळात सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. हमीभावाच्या २० टक्के अनुदान देण्याची घोषणा केली होती, या दोन्ही घोषणा हवेत विरल्या आहे. शेतकरी आक्रमक झालेला आहे.आणि सध्या आमचीही जनजागृती सुरू आहे. प्रहारने जसं सत्ताधाऱ्यांच्या घरी जाऊन आंदोलन केलं तसं आम्ही महायुतीच्या मंत्र्यांना कार्यक्रमात जाऊन जाब विचारणार आहोत, असा इशारा राजू शेट्टी यांनी यावेळी सरकारला दिला आहे.

> अजित पवार सांगतात आम्ही आता सातबारा कोरा करू शकत नाही, राज्याची तशी स्थिती नाही. मग महायुतीने खोटं अश्वासन का दिलं, शेतकऱ्यांना का गंडवलं? राज्याची आर्थिक स्थिती बिकट आहे तर, शक्तिपीठ सारखे खर्चिक प्रकल्प महाराष्ट्रावर का लादत आहात? त्यामुळे यापुढे महायुतीच्या नेत्यांना राज्यात फिरणं मुश्किल करू.
>
> **—राजू शेट्टी**

महाराष्ट्र तापला, तापमान पन्नाशीकडे !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

अमरावती : महाराष्ट्र सध्या प्रचंड तापलाय. तापमानाचा उद्रेक होत असून आता कमाल तापमान पन्नाशीकडे झेप घेत असल्याचे चित्र आहे. आज बहुतांश ठिकाणी कमाल तापमान ४० अंशांच्या वर गेले आहे. हवामान विभागाच्या विशेष तापमान अंदाजानुसार, शनिवारी नंदूरबारमध्ये तापमानाचा पारा तब्बल ४५.३ अंशांवर स्थिरावला आहे. जळगाव, अकोल्यात ४३.७ अंशांची नोंद झाली आहे. संपूर्ण राज्यात उष्णतेचा दाह वाढला आहे. दरम्यान, विदर्भात पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यात प्रचंड उष्ण आणि दमट हवामान राहणार आहे.

सूर्य तळपतोय ..

महाराष्ट्रात सध्या विदर्भ वगळता उर्वरित संपूर्ण राज्यात तापमानाचा उच्चांक झाला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भात पुढील चार दिवस वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. अमरावती,यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली या जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यात उष्ण आणि दमट हवामानाचा इशारा देण्यात आलाय. छत्रपती संभाजीनगरमध्ये आज ४२.५ अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेले. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात सामान्यहून अधिक नोंदवण्यात आले आहे. किमान तापमानही प्रचंड वाढल्यामुळे सकाळी साधारण ९ वाजल्यापासूनच उन्हाचा चटका बसू लागला आहे.

पाकिस्तानात ५.८ रिश्टरच्या भूकंपाने खळबळ

पाकिस्तान : शनिवारी पाकिस्तान मध्ये भूकंपाचे धक्के जाणवले, ज्यामुळे अनेक भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्याची तीव्रता रिश्टर स्केलवर ५.८ नोंदण्यात आली. भूकंप होताच लोक घाबरून घराबाहेर पळाले. अनेक भागात लोक ओरडत आणि मोकळ्या मैदानाकडे पळताना दिसले. सध्या, कोणत्याही मोठ्या नुकसानीची किंवा जीवितहानीबद्दल कोणतीही माहिती नाही. पाकिस्तानमध्ये झालेल्या भूकंपाचे धक्के काश्मीर खोऱ्यातही जाणवले.

शिवसेनेकडून भव्य संपर्क अभियान सुरू

मुंबई : मुंबईत शनिवारी पार पडलेल्या शिवसेनेच्या महत्त्वपूर्ण बैठकीत संपूर्ण महाराष्ट्रभर विस्तृत संपर्क अभियान राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे. हे अभियान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली कल्याण पश्चिमेतील ३८ प्रभागांमध्ये राबवले जाणार आहे, अशी माहिती आमदार विश्वनाथ भोईर यांनी दिली आहे.

पुढील आठवड्यापासून संपूर्ण महाराष्ट्रात संपर्क अभियान राबवण्याचा निर्णय शिवसेनेतर्फे मुंबईत झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. टिटवाळा येथील महागणपतीचे दर्शन घेऊन या संपर्क अभियानाला प्रारंभ होईल, असे विश्वानाथ भोईर म्हणालेत. तसेच या अभियानाला आपल्यासह पक्षाचे सर्वच प्रमूख पदाधिकारी उपस्थित असणार असल्याचे, भोईर यांनी स्पष्ट केलं. या अभियानाअंतर्गत दर दिवशी एक वॉर्ड, अशा पद्धतीने कार्यकर्ते आणि तेथील नागरिकांना एकत्रितपणे भेटण्याचा कार्यक्रम आम्ही आखू, असंही भोईर यांनी सांगितलं.

एकत्रितपणे भेटण्याच्या कार्यक्रमामुळे कार्यकर्त्यांना त्यांचे मनोगत, अडीअडचणी, पक्षवाढीसंदर्भात संवाद साधला जाईल. यासोबतच संबंधित प्रभागातील सामान्य नागरिकांनाही या संपर्क अभियानात सहभागी होऊन त्यांच्या नागरी समस्या आणि अडचणी शिवसेना पदाधिकाऱ्यांसमोर मांडता येणार असल्याचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी स्पष्ट केलं.

कल्याण पश्चिमेतील ३८ प्रभागांमध्ये पुढील आठवड्यापासून हे अभियान राबविण्यात येणार असून, ही एकप्रकारे आगामी महापालिका निवडणुकीची नांदी असल्याचे सूचक विधान त्यांनी यावेळी केले.

हनुमान जयंती निमित्त मंदिरात विविध उपक्रम

इंदिरानगर : श्री हनुमान जयंतीनिमित्त इंदिरानगर परिसरातील हनुमान मंदिरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. बजरंग सोसायटी येथील श्री बजरंग बहुउद्देशीय संस्थेतर्फे शेकडो वर्षांपूर्वीच्या युद्धात वापरलेली अस्सल 'गदा' सर्वांच्या दर्शनासाठी आणि उचलण्यासाठी प्रथमच ठेवण्यात आली होती. ही गदा म्हणजे शक्ती, पराक्रम आणि भक्तीचे प्रतीक असून हनुमान भक्त आणि रोज व्यायाम करणाऱ्या पहिलवानांसाठी ही एक दुर्मिळ संधी असल्याचे सुनील देसाई यांनी सांगितले. विनयनगर येथील पंचमुखी हनुमान देवस्थानतर्फे गर्जना प्रतिष्ठानच्या सहकार्याने संपूर्ण मंदिरावर आकर्षक रोषणाई करण्यात आली होती.

डोनाल्ड ट्रम्पचे दूत पुतिन यांच्या भेटीला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

मॉस्को : रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सतत झेलेन्स्की आणि पुतिन यांच्याशी चर्चा करत आहेत. परंतु पुतिन यांनी युद्धबंदीसाठी घातलेल्या अटींवर अजूनही सहमती झालेली नाही. त्यातच डोनाल्ड ट्रम्प यांचे दूत स्टीव्ह विटकॉफ यांनी राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्याशी बैठक घेतली. यांच पार्श्वभूमीवर, ट्रम्प यांनी,"जर ते त्यावेळी राष्ट्राध्यक्ष असते तर हे युद्ध कधीच सुरू झाले नसते" असे म्हणत अगोदरच्या राष्ट्रध्यक्षांवर निशाणा साधला.

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर,'रशियाने पुढे आले पाहिजे. अनेक लोक मरत आहेत. कधीही घडायला नको असलेल्या एका भयानक आणि निरर्थक युद्धात दर आठवड्याला हजारो लोक आपले प्राण गमावत आहेत. जर मी राष्ट्रपती असतो तर हे कधीच घडले नसते."

ट्रम्प यांचे हे विधान अशा वेळी आले आहे जेव्हा त्यांचे दूत स्टीव्ह विटकॉफ मॉस्कोच्या दौऱ्यावर आहेत. युद्ध रोखण्यासाठी पुतिन यांच्याशी चर्चा करण्यासाठी ते आले आहेत. ट्रम्प सत्तेत आल्यानंतर विटकॉफचा हा तिसरा रशिया दौरा आहे.

अमेरिका

शहरातील प्रतिष्ठित बालरूप हनुमान मंदिरात शनिवारी श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जयंती कार्यक्रम भव्य आणि दिव्य पद्धतीने साजरा करण्यासाठी मंदिर समितीने व्यापक तयारी केली होती. सर्व धार्मिक कार्यक्रमांमध्ये भाविक, अनुयायी आणि गुरु कुटुंबातील सदस्यांना सहभागी झाले होते.

मुंबई विद्यापीठ मुलींच्या वसतिगृहाची दुरवस्था

मुबई : विविध कारणांमुळे मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना मनःस्ताप सहन करावा लागत आहे. आता नरिमन पॉइंट येथील मुंबई विद्यापीठाच्या मादाम कामा मुलींच्या वसतिगृहात सोयी-सुविधांची वानवा असल्याचे समोर आले आहे. ठाकरे गटाच्या युवा सेनेच्या अधिसभा सदस्यांनी वसतिगृहाला भेट दिली आणि तेथील सोयी-सुविधांच्या अभावावर प्रकाशझोत टाकला. मात्र ही बाब मुंबई विद्यापीठ प्रशासनाने फेटाळली आहे. प्रशासनाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता, तसेच वसतिगृह अधिक्षीका नसताना मुलींच्या वसतिगृहाला पुरुष सदस्यांनी भेट देणे बेकायदेशीर असल्याचा दावा मुंबई विद्यापीठाने केला आहे.

नरिमन पॉइंट येथील मुंबई विद्यापीठाच्या मादाम कामा मुलींच्या वसतिगृहात उपाहारगृह व खानावळ सुरळीतपणे सुरू नाही, पिण्याच्या पाण्याची अपुरी व्यवस्था, पूर्णवेळ वसतिगृह अधिक्षक नसणे, कोलमडलेली अग्निशमन यंत्रणा, काही मजल्यावर विद्युत यंत्रणा कार्यान्वित नसणे आदी दुरावस्था असल्याचे ठाकरे गटाच्या युवा सेनेचे अधिसभा सदस्य शीतल देवरूखकर-शेठ, प्रदीप सावंत, शशिकांत झोरे आणि माजी अधिसभा सदस्य राजन कोळंबकर यांनी वसतिगृहाची पाहणी केल्यानंतर सांगितले.

अष्टविनायकसह ५ मंदिरात वस्त्रसंहिता लागू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : अष्टविनायक गणपतींपैकी मोरगावचा मोरेश्वर, थेऊरचा चिंतामणी, सिद्धटेकचा सिद्धिविनायक यांसह चिंचवडचा मोरया गोसावी संजीवन मंदिर आणि खार नारंगी मंदिरातील दर्शनासाठी पोशाखाची नियमावली जाहीर करण्यात आली आहे. ही पाच मंदिर ज्या ट्रस्टच्या अधिपथ्याखाली आहेत, त्या चिंचवड देवस्थान ट्रस्टकडून ही वस्त्रसंहिता लागू करण्यात आली आहे.

मात्र, ही सक्ती नाही तर मंदिराचे पावित्र्य राखण्यासाठी तोकडे कपडे परिधान करुन दर्शनासाठी न येण्याची विनंती करण्यात आल्याचेही चिंचवड देवस्थान ट्रस्टचे म्हणणं आहे. त्यामुळे यापुढे अष्टविनायकांपैकी पुणे जिल्ह्यातील पाचही गणपती मंदिरात आता परिपूर्ण आणि अंगभरुन पोशाख घालूनच भाविकांनी दर्शनाच्या रांगेत उभे राहिले पाहिजे.

मंदिर प्रवेशासाठी पोशाखाची नियमावली 'अशी'

- - पुरुषांनी पारंपरिक आणि सभ्य पोशाख परिधान करावा. शर्ट, टी-शर्ट आणि पूर्ण पँट किंवा धोतर, कुर्ता पायजमा असा मंदिराच्या पवित्रतेला साजेसा पोशाख परिधान करावा.
- - महिलांनी साडी, सलवार कमीज, पंजाबी ड्रेस किंवा अन्य पारंपरिक पोशाख परिधान करावा. मंदिराच्या पावित्र्यास अनुकूल असलेले आणि आदरयुक्त वस्त्र परिधान करावे.
- - कोणीही अति आधुनिक, अपारंपरिक, पारदर्शक, टोकदार, स्लीव्हलेस, फाटके, शरीरप्रदर्शन करणारे अथवा अनौपचारिक कपडे मंदिर प्रांगणात परिधान करू नये.

लखनौने रोखला गुजरातचा विजयरथ!

पूरन-मार्करमने झळकावले अर्धशतक, बिश्नोई-शार्दूलने घेतल्या २-२ विकेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

लखनौ : सलग चार विजयांची नोंद, गुणतालिकेत अव्वल स्थान.. असे असूनही गुजरात टायटन्सचा विजयरथ लखनौ सुपर जायंट्सने रोखला. घरच्या मैदानावर वर्चस्व राखताना एलएसजीने सहा सामन्यांतील चौथ्या विजयाची नोंद करून Point Table मध्ये उलटफेर केला. ८ गुणांसह अव्वल तीन क्रमांकात दाखल झाले आहेत. निकोलस पूरन (व एडन मार्करम यांच्या फटकेबाजीने मैदान दणाणून गेले.

साई सुदर्शन व शुभमन गिल यांच्या दमदार सुरुवातीनंतरही गुजरातला अपेक्षित धावसंख्या उभी करता आली नाही. आवेश खानने १३ व्या षटकात ही जोडी तोडली, तेव्हा त्यांनी यंदाच्या आयपीएलमधील सर्वोत्तम १२० धावांच्या भागीदारीची नोंद केली होती. गिल ३८ चेंडूंत ६ चौकार व १ षटकारासह ६० धावांवर बाद झाला. त्यानंतर रवी बिश्नोईने एकाच षटकात गुजरातला दोन धक्के दिले.

साई ३७ चेंडूत ७ चौकार व १ षटकारासह ५६ धावांवर झेलबाद झाला, पाठोपाठ वॉशिंग्टंन सुंदरही (२) त्याच षटकात माघारी परतला. जॉस बटलरला (१६) दिग्वेश राठीने शांत ठेवले. शेरफाने रुथरफोर्डला एक झेल रिषभ पंतने टाकला आणि गुजरातच्या या फलंदाजाने २२ धावा केल्या. शार्दूल ठाकूरने २०व्या षटकात त्याला बाद केले. राहुल तेवातियाला (०) पहिल्याच चेंडूवर शार्दूलने यंदाच्या पर्वात दुसऱ्यांदा हॅटट्रिकची संधी तयार केली, परंतु त्याला दोन्ही वेळेस हुलकावणी मिळाली. गुजरातने ६ बाद १८० धावा केल्या.

मिचेल मार्शच्या अनुपस्थितीत रिषभ पंत सलामीला आला आणि त्याने एडन मार्करमसह गुजरातच्या गोलंदाजांना झोडले. लखनौच्या सलामीवीरांना नशीबाचीही साथ मिळाली आणि दोघांचे झेल टाकले. ६.१ षटकांत ६५ धावांवर ही जोडी तुटली. रिषभ १८ चेंडूत ४ चौकारांच्या मदतीने २१ धावांवर प्रसिद्ध कृष्णाला विकेट देऊन परतला. पण, लखनौच्या धावांची गती काही थांबली नाही. एडन मार्करमसह फॉर्मात असलेल्या निकोलस पूरनने २३ चेंडूंत ५० धावांची भागीदारी पूर्ण केली.

निकोलसने साई किशोरने टाकलेल्या १०व्या षटकात ६,१,४,१,६,६ अशा २४ धावांची फटकेबाजी केली. लखनौने १० षटकांत १ बाद ११४ धावांचा टप्पा ओलांडून विजयाचा मजबूत पाया घातला. मार्करमनेही त्याचे यंदाच्या पर्वातील दुसरे अर्धशतक पूर्ण केले. तो ३१ चेंडूंत ९ चौकार १ षटकारासह ५८ धावांवर झेलबाद झाला. निकोलस गुजरातच्या गोलंदाजांना भीक घालत नव्हता आणि त्याने २३ चेंडूंत अर्धशतक झळकावले.

पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी अंतिम फेरीत

पुणे : चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक १६ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत पुनित बालन केदार जाधव क्रिकेट

अकादमी संघाने तीन विजयासह अंतिम फेरीत प्रवेश केला. व्हिजन क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत शौर्य दंड(४-१६) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर स्पोर्टस झोन क्रिकेट अकादमी संघाने एके स्पोर्ट्स संघाचा २२ धावांनी पराभव केला. दुसऱ्या सामन्यात सर्वेश थरवाल(२२ धावा व २-२०) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी संघाने पेस ॲथलिटस क्रिकेट अकादमी संघाचा १०३ धावांनी पराभव करत आगेकूच केली.

फुटबॉल विश्वकरंडकात आता ६४ देशांमध्ये जेतेपदासाठी झुंज?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली: फुटबॉल विश्वकरंडकात लवकरच ६४ देशांचा सहभाग असण्याची दाट शक्यता आहे. दक्षिण अमेरिकन फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष ॲलेक्झँड्रो डॉमिनगेझ यांच्याकडून ६४ देशांच्या सहभागाबाबत प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. २०३०मधील विश्वकरंडकात ६४ देशांचा सहभाग असायला हवा, असे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

२०३० हे फुटबॉल विश्वकरंडकाचे शतकमहोत्सवी वर्ष असणार आहे. फिफाकडून याचे औचित्य साधून २०३०मधील विश्वकरंडक दिमाखदार करण्याचा विचार सुरू आहे. त्यामुळे या स्पर्धेतील लढती तीन उपखंडांतील सहा देशांमध्ये खेळवण्यात येणार आहेत. उरुग्वे, पॅराग्वे, अर्जेंटिना, स्पेन, पोर्तुगाल व मोरोक्को या सहा देशांमध्ये २०३०मधील फुटबॉल विश्वकरंडकाच्या लढती रंगणार आहेत.

ॲलेक्झँड्रो डॉमिनगेझ याप्रसंगी म्हणाले, की फुटबॉल विश्वकरंडकाचे हे शंभरावे वर्ष आहे. त्यामुळे ही स्पर्धा तीन उपखंडातील देशांमध्ये पार पडणार आहे. यामध्ये ६४ देश असायला हवेत, असा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. यामुळे दक्षिण अमेरिका खंडातील प्रत्येक देशाला विश्वकरंडकात सहभागी होता येणार आहे. व्हेनेझुएला या देशाला अद्याप विश्वकरंडकात सहभागी होता आलेले नाही. त्यामुळे त्यांनाही या स्पर्धेमध्ये सहभागी होता येणार आहे. ६४ देशांच्या सहभागाला फिफा या जागतिक फुटबॉल संघटनेकडून हिरवा कंदील दाखवण्यात आला तर विश्वकरंडकात तब्बल १२८ सामने रंगतील. याआधीपर्यंत ६४ सामने होत होते.

रिस्क्राईब संघाने विजेतेपद पटकावले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : स्पोटर्सफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित लायन शंतनु सिद्धा स्मृतीप्रित्यर्थ तिसऱ्या 'लायन्स् प्रौढ करंडक' (४० वर्षावरील) टी-२० क्रिकेट स्पर्धेत वासिम शेख याने केलेल्या अष्टपैलु खेळीच्या जोरावर रिस्क्राईब संघाने दिक्षीत रॉयल्स् संघाचा ७ धावांनी पराभव करून स्पर्धेचे सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपद मिळवले.

येवलेवाडी येथील ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमी मैदानावर झालेल्या या अंतिम सामन्यामध्ये पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या रिस्क्राईब संघाने २० षटकात १९९ धावांचा डोंगर उभा केला. यामध्ये वासिम शेख याने १६ चेंडूमध्ये दोन चौकार आणि पाच षटकारांच्या सहाय्याने सर्वाधिक ४४ धावांची खेळी केली. याशिवाय अमित पार्ले (३२ धावा), अरविंद चव्हाण (२६ धावा), नितीन कुचेकर (२५ धावा) आणि देवदत्त देवोकर (२२ धावा) यांनीसुद्धा छोट्या खेळी करून संघाला मोठी धावसंख्या उभी करून दिली. या आव्हानाला उत्तर देताना दिक्षीत रॉयल्स्चा डाव १९२ धावांवर मर्यादित राहीला. विवेक देशमुख (४४ धावा), श्रीपाद भागवत (४० धावा) आणि श्रीनिवास सरवदे (३६ धावा) यांनी धावांचे योगदान देत दिक्षीत रॉयल्सकडून प्रतिकार केला. रिस्क्राईबच्या अमर खेडेकर आणि वासिम शेख यांनी प्रत्येकी तीन गडी तर, अरविंद चव्हाण याने दोन गडी बाद करून संघाच्या विजयात महत्वाची भुमिका निभावली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण स्पर्धेचे प्रायोजक आणि आयोजन समितीचे सदस्य यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पोटर्सफिल्ड मॅनेजमेंटचे सनी मारवाडी आणि अमित काळे आदि मान्यवर उपस्थित होते. विजेत्या रिस्क्राईब आणि उपविजेत्या दिक्षीत रॉयल्स् संघांना करंडक आणि मेडल्स् देण्यात आले. यावेळी झालेल्या शंतनु शुटर्स विरूद्ध शंतनु फायटर्स यांच्यातील प्रदर्शनीय सामन्यामध्ये शंतनु फायटर्स संघाने ४४ धावांनी विजय मिळवला. राजेश तांदळे हे सामन्याचे मानकरी ठरले व

पाच पराभवांनंतरही चेन्नई 'प्ले ऑफ'मध्ये जाणार?

चेन्नई : यंदाच्या आयपीएल स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्जचं प्रदर्शन अतिशय वाईट राहिलं आहे. त्यांना सलग पाच सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे गुणतालिकेतही चेन्नई सुपर किंग्ज ९व्या स्थानावर असून चेन्नईच्या प्लेऑफमध्ये जाण्याचा आशाही धुसर झाल्या आहेत. मात्र, अशा परिस्थितीतही सीएसकेचे फलंदाजी प्रशिक्षक मायकेल हसी यांनी प्लेऑफमध्ये जाण्याची आशा व्यक्त केली आहे. मायकल हसी म्हणाले, "आम्ही हार मानलेली नाही. आयपीएलसारख्या दीर्घकाळ चालणाऱ्या स्पर्धेत गती महत्त्वाची आहे. नक्कीच यंदा आमचं प्रदर्शन वाईट राहिलं आहे. आम्ही चांगली कामगिरी करू शकलो नाही, पण याचा अर्थ असा नाही की परिस्थिती बदलणार नाही. जर पुढचे काही सामने जिंकलो, तर नक्कीच आत्मविश्वास वाढेल आणि आम्ही प्लेऑफमध्ये स्थान मिळवू" पुढे बोलताना ते म्हणाले, "आमच्या खेळाडूंमध्ये अजूनही चांगले क्रिकेट खेळण्याची क्षमता आहे. ते त्यांचा नैसर्गिक खेळ करतात. त्यामुळे त्यांना त्यांच्या खेळात बदल करायला सांगणं योग्य नाही. आमच्याकडे अनेक अनुभवी खेळाडू आहेत. त्यांनी सीएसकेसाठी उत्तम कामगिरी केली आहे'

स्वरूप, सौरभ, मुर्तझा, धवल, प्रसाद परांडे, आरव संचेती, सैफुल खान, केदार सावंत यांची आगेकूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे जिल्हा बिलीयडर्स आणि स्नुकर संघटना (पीडीबीएसए) यांच्या मान्येतेखाली आणि क्यु कल्चर क्लब आणि ॲपेक्स् स्पोटर्स तर्फे आयोजित 'द क्यु कल्चर करंडक' खुली ९-बॉल पुल अजिंक्यपद स्पर्धेत स्वरूप पोकळे, सौरभ जाधव, मुर्तझा अझदार, धवल गढवी, प्रसाद परांडे, आरव संचेती, सैफुल खान आणि केदार सावंत यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली.

वानवडी येथील द क्यु कल्चर क्लब येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत क्यु क्लबच्या स्वरूप पोकळे याने अमर रायकर याचा ७-५ असा पराभव केला. क्यु कल्चरच्या सौरभ जाधव याने समर खंडेलवाल याचा ७-४ असा पराभव केला.

क्यु क्लबच्या प्रसाद परांडे याने ध्रुव के. याचा ७-४ असा तर, सैफुल खान याने प्रशांत पवार याचा ७-४ असा पराभव करून आगेकूच केली.

फिलिप्स दुखापतीमुळे आयपीएल मधून बाहेर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : गुजरात टायटन्सचा ग्लेन फिलिप्स दुखापतीमुळे आयपीएल-२०२५ मधून बाहेर पडला आहे. ६ एप्रिल रोजी सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यात त्याला पाठीला दुखापत झाली होती. यामुळे तो आगामी सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही. पीटीआयच्या वृत्तानुसार, फिलिप्स न्यूझीलंडला परतला आहे. २०२५ च्या आयपीएल मेगा लिलावात गुजरातने फिलिप्सला २ कोटी रुपयांना खरेदी केले.

६ एप्रिल रोजी खेळल्या गेलेल्या सामन्यात, हैदराबादच्या डावाच्या सहाव्या षटकात ग्लेन फिलिप्सला दुखापत झाली. प्रसिद्ध कृष्णाच्या षटकात थ्रो टाकताना त्याला स्नायूंचा ताण आला. नंतर फिजिओने त्याला मैदानाबाहेर नेले.

फिलिप्सने आतापर्यंत एकूण ८ आयपीएल सामने खेळले आहेत. या काळात त्याने ६५ धावा केल्या आहेत आणि दोन विकेट घेतल्या आहेत. २०२३ च्या आयपीएल हंगामात त्याला प्लेइंग-११ मध्ये संधी मिळाली नाही. आयपीएलच्या १८ व्या हंगामात, आज दिवसाच्या पहिल्या सामन्यात, लखनौ सुपर जायंट्स (एलएसजी) गुजरात टायटन्स (जीटी) विरुद्ध सामना करेल. हा सामना लखनौच्या एकाना स्टेडियमवर भारतीय वेळेनुसार दुपारी ३:३० वाजता खेळला जाईल. दोन्ही संघांनी त्यांचे मागील सामने जिंकले आहेत.

बंगळूरच्या खेळपट्टीवरून मेंटॉर दिनेश कार्तिक भडकला

बंगलुरू : कोलकाताप्रमाणे बंगळूर संघाचेही त्यांच्या घरच्या मैदानावरील क्युरेटरशी बिनसले असल्याचे स्पष्ट होत आहे. गुरुवारी दिल्लीविरुद्धचा सामना गमावल्यानंतर बंगळूर संघाचा मेंटॉर दिनेश कार्तिकनेही थेट क्युरेटरवर नाराजी व्यक्त केली. दोन दिवसांपूर्वी कोलकाता संघाचा कर्णधार अजिंक्य रहाणेनेही इडन गार्डनच्या क्युरेटरवर दुसऱ्यांदा टीका केली. आता दिनेश कार्तिकनेही चिन्नास्वामी स्टेडियमची खेळपट्टी अपेक्षेप्रमाणे नसल्याचे थेट पत्रकार परिषदेतच सांगितले. विराट कोहली हुकमी खेळाडू असलेल्या बंगळूर संघाने गतवर्षी आपल्या या घरच्या मैदानावर शानदार कामगिरी केली होती, यंदा मात्र आतापर्यंत त्यांचे दोन सामने झाले आहेत आणि त्यात त्यांची हार झाली आहे. बंगळूरची खेळपट्टी फलंदाजांसाठी नंदनवन असल्याचा इतिहास आहे, परंतु या वेळी जम बसल्यानंतर कोणत्याही क्षणी सामन्याला कलाटणी मिळत आहे. वास्तविक आम्ही चांगली खेळपट्टी तयार करा, अशी मागणी केली होती, परंतु प्रत्यक्षात मात्र फलंदाजी सोपी नसल्याचे स्पष्ट होत आहे. तरीही आम्ही त्यातून चांगला खेळ करण्याचा प्रयत्न केला.

आशियाई फुटबॉल करंडक आयोजनासाठी भारताचा प्रयत्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : भारताकडून २०३१मध्ये होत असलेल्या एएफसी आशियाई फुटबॉल करंडकाच्या आयोजनासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. या स्पर्धेच्या आयोजनासाठी आम्ही तयार असल्याचे अखिल भारतीय फुटबॉल संघटनेकडून कळवण्यात आले आहे; मात्र या स्पर्धेच्या आयोजनात भारतासमोर इतर सहा देशांचे आव्हान असणार आहे.

भारतासह इतर सहा देश एएफसी आशियाई फुटबॉल करंडकांच्या आयोजनासाठी तयार आहेत. यामध्ये ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरिया, संयुक्त अरब अमिराती, किर्गीस्तान, तजिकिस्तान व उझबेकिस्तान या देशांचा समावेश आहे. ऑस्ट्रेलिया, संयुक्त अरब अमिराती, दक्षिण कोरिया व कुवेत या देशांमध्ये याआधीही या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय फुटबॉल संघाने १९६४मध्ये पार पडलेल्या आशियाई फुटबॉल करंडकात उपविजेता होण्याचा मान संपादन केला होता. त्यानंतर मात्र १९८४, २०११, २०१९ व २०२३मध्ये साखळीतच गारद होण्याची नामुष्की भारतावर आली. १९५६मध्ये या स्पर्धेला प्रारंभ झाला होता.

१४ वर्षाखालील मुलांची आंतरक्लब क्रिकेट स्पर्धा

क्रिकस्टार रायझिंग, आर्यन्स् क्रिकेट संघांचे विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे क्रिकेट ॲकॅडमी आणि सागर कांबळे स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे आयोजित तिसऱ्या 'प्रशांतभाऊ शिंदे (पीएस) करंडक' १४ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेत क्रिकस्टार रायझिंग ॲकॅडमी आणि आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून गुणांचे खाते उघडले.

स्वारगेट येथील पंडीत जवाहरलाल नेहरू स्टेडियम मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत स्वरूप घनावत याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे क्रिकस्टार रायझिंग ॲकॅडमीने स्केलअप ॲकॅडमीचा १० धावांनी पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या क्रिकस्टार रायझिंग ॲकॅडमीने १९ षटकामध्ये १३६ धावांचे लक्ष्य उभे केले. श्रीदीप अधागळे याने नाबाद ६५ धावांची खेळी केली. त्याला दुसऱ्या बाजुने स्वरूप घनावत याने २० धावा करून साथ दिली. या लक्ष्याचा पाठलाग करताना स्केलअप ॲकॅडमीचा डाव १९ षटकात १२६ धावांवर मर्यादित राहीला. अभुदय गायकवाड (२६ धावा) आणि दक्ष राज (२३ धावा) यांनी धावा करून प्रतिकार केला. स्वरूप घनावत याने ११ धावात ३ गडी बाद करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

सार्थ बदाडे याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमीने २२ यार्डसचा ५८ धावांनी पराभव करून पहिला वि य मिळवला. आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमीने पहिल्यांदा खेळताना १३९ धावा धावफलकावर लावल्या. श्लेष पवार याने ५६ धावांची खेळी केली तर, श्रेयस कासार याने २३ धावांचे आणि सार्थ बदाडे याने नाबाद १६ धावांचे योगदान दिले. याला उत्तर देताना २२ यार्डसचा डाव ८१ धावांवर मर्यादित राहीला. किंजल सुत्रधार याने १५ धावांमध्ये ४ गडी टिपले. सार्थ बदाडे याने दोन धावा देत दोन गडी बाद केले आणि संघाला सहज विजय मिळवून दिला. सामनावीरः स्वरूप घनावत व सार्थ बदाडे.

#रा